नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

अनुक्रमणिका

युगवाणी
१९६५

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

र्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

र्च

१९६५

★

५० न. पैसे

या अंकात

* श्री. ल. पांढरीपांडे
* यादव मुकुंद पाठक
* कृष्णा चौधरी
* प्रा. के. रा. जोशी
* डॉ. वि. बा. प्रभुदेसाई
* प्रा. सुरेश म. डोळके
* प्रा. श्री. मा. कुलकर्णी
* सरला भोळे
* दिनकर साळशिंगीकर

शिवाय, संपादकीय

परिचय परामर्श, संघवार्ता इ०

संपादकः- प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र–

:: संपादक मंडळ ::

भा. श्री. परांजपे

व. कृ. वऱ्हाडपांडे

युगवाणी

संपादक:——श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १९] जाने.–फेब्रु.–मार्च १९६५ [अंक ९–१०–११

संपादकीय

स्वागत

विदर्भ साहित्य संघाची त्रैवार्षिक निवडणूक होऊन तीत एप्रिल १९६५ ते मार्च १९६८ या कार्यकाळा करिता अध्यक्ष म्हणून प्रा. वा. कृ. चोरघडे व कार्यकारी मंडळाचे सोळा सदस्य निवडले गेले आहेत. नवीन कार्यकारी मंडळ १ एप्रिलपासून अधिकारारूढ होईल. नव्या अध्यक्षांचे व नव्या कार्यकारिणीतील सर्व सदस्यांचे आम्ही अभिनंदन व स्वागत करतो.

नव्या कार्यकारिणीची बैठक होऊन तीत 'युगवाणी'चे संपादक म्हणून श्री. मा. नी. गलगलीकर यांची निवड झाली आहे. श्री. गलगलीकर यांचे आम्ही अभिनंदन करतो व त्यांच्या कार्यकाळात 'युगवाणी'ची आणखी प्रगति होवो असे इच्छितो.

सिंहावलोकन

एप्रिल १९६१ मध्ये 'युगवाणी'च्या संपादकत्वाची जबाबदारी मी स्वीकारली. प्रस्तुत अंक वाचकांच्या हाती देऊन १ एप्रिल १९६५ ला त्या जबाबदारीतून मी मुक्त होणार. आरंभी एका वर्षासाठी व नंतर तीन वर्षांसाठी ही जबाबदारी मी पत्करली. या नंतरच्या कार्यकाळात, माझ्या तर कामांच्या व्यापामुळे, ही जबाबदारी मधेच सोडण्याचा मला सतत मोह होत होता तरी घेतलेले काम मधेच सोडणे योग्य नव्हे या विवेकाने मी तो आवरला आणि आता कार्यकाल संपल्यानंतर हक्काने निवृत्त होताना मला समाधान वाटत आहे.

अनुक्रमणिका

ही जबाबदारी स्वीकारताना मी लिहिले होते (जून १९६१), "...ही जबाबदारी...मी स्वीकारली ते अनेक सुहृदांच्या, साहित्यिकांच्या व सुहृद-साहित्यिकांच्या सहकार्याच्या अपेक्षेने व विश्वासानेच होय." हे सहकार्य बऱ्याच प्रमाणात मला मिळाले आणि म्हणूनच मी जे कांही अल्पस्वल्प केले ते करू शकलो.

'युगवाणी' संबंधीच्या माझ्या अपेक्षा व्यक्त करताना याच अंकात मी लिहिले होते, "...'युगवाणी' हे विदर्भ साहित्य संघासारख्या मान्यता पावलेल्या साहित्य संस्थेचे मुखपत्र आहे. याला अनुसरूनच त्याचे स्वरूप साहित्यिक असावे व त्याला अखिल महाराष्ट्रात वाढती मान्यता व प्रतिष्ठा मिळावी अशी माझी इच्छा आहे." पुढे मी लिहिले होते की, "...ती फलद्रूप होणे हे सर्वांच्या विशेषतः साहित्यिकांच्या सहकार्यावर अवलंबून आहे...दर्जेदार साहित्याचा सतत पुरवठा होत राहण्यावरच कोणत्याहि मासिकाचा दर्जा अवलंबून राहणार हे उघड आहे." या इच्छेच्या साफल्यावावत, पहिल्या वर्षाच्या अखेर एप्रिल १९६२ च्या अंकात मी लिहिले होते, "...ही इच्छा कितपत सफल झाली हे सांगणे कठिण आहे. तथापि या ८–९ महिन्यात 'युगवाणी' विषयी अनेकांनी संतोषाचे, कौतुकाचे, प्रशंसेचे उद्‌गार काढले हे मात्र कृतज्ञतापूर्वक नमूद केले पाहिजे." त्याचवेळी मी नमूद केले होते की, "'युगवाणी'विषयी वाचकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. या वाढत्या अपेक्षा यथाशक्ति, यथामति पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे एवढेच माझ्या हांती आहे."

यानंतरच्या गेल्या तीन वर्षांत असा प्रयत्न अर्थातच मी केला. पण त्याला व्यक्तिगत आणि अन्यहि पुष्कळच मर्यादा पडल्या. साहजिकच त्या प्रयत्नांना यशहि मर्यादित मिळालं. 'युगवाणी'ला आता एक साहित्यिक दर्जा निश्चितच प्राप्त झालेला आहे आणि त्याचे साहित्यिक स्वरूपहि स्थिरपद झालेले आहे. याचा अर्थ आता विकासाला वाव नाही असा मुळीच नव्हे. माझ्याच कितीतरी कल्पना मी अमलात आणू शकलो नाही. 'युगवाणी'ला एक संहिताविभाग जोडणे व त्यात जुन्या अप्रकाशित वाङ्मयाला प्रसिद्धी देणे या एका कल्पनेचा येथे उल्लेख करता येईल. साहित्यविषयक चर्चा वा टीपांचं एक सदर सुरू करण्याची घोषणा करूनहि (पहा युगवाणी ऑगस्ट ६३) ते सुरू होऊं शकलं नाही. याहि गोष्टीचा येथे उल्लेख करता येईल. तेव्हां 'युगवाणी'ला नवंनवे वळण देण्याला व विकास घडवून आणण्याला वाव आहे, हे उघडच आहे. पण साहित्यसंस्थेच्या मुखपत्राला संपादकाने आपल्या लहरीप्रमाणे स्वरूप देणेहि शक्य व इष्ट नसते. त्याला कांही एक स्थिरता असावी म्हणजे हळूहळू विशिष्ट अभिरूचीचा वाचकवर्ग निर्माण होतो व त्या मासिकाचं एक जीवितकार्य

निश्चित होतं. साहित्य संस्थांच्या मुखपत्राचे स्वरूप, त्याच्या विशिष्ट अडचणी व त्याच्यावरील जबाबदाऱ्या या संबंधी जून १९६२ च्या अंकात मी आपले विचार व्यक्त केले होते. ते येथे उद्धृत करण्याचा मोह होत असला तरी स्थलसंकोचास्तव तसे करीत नाही. साररूपाने एवढेच सांगतो की साहित्य-संस्थांचे मुखपत्र हे धंदा म्हणून सुरू झालेले नसते व त्या दृष्टीने ते चालवायचेहि नसते. त्याची आर्थिक स्थिति बेताचीच असते. आणि म्हणून साहित्यिकांच्या निरपेक्ष लेखन–सहायावरच अशी मुखपत्रे जगू वाढू शकतात. त्याबरोबरच साहित्यसंस्थांनी–म्हणजेच त्या संस्थांच्या सभासदांनी व पदाधिकाऱ्यांनी त्या मुखपत्रांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करून दिले पाहिजे व त्या कामी सरकारचेहि सहाय्य घेतले पाहिजे. असो.

एप्रिल १९६२ च्या अंकात त्या अगोदरच्या वर्षात 'युगवाणी'ने वाचकांच्या हाती कोणते व किती साहित्य दिले याचा आढावा सादर केला होता. त्यानंतरच्या गेल्या तीन वर्षांत 'युगवाणी'ने केलेल्या सेवेचा तपशील येथे सादर करावयाचा. मे १९६२ ते एप्रिल १९६३ या वर्षात 'युगवाणी'चे एकूण ९ अंक निघाले. म्हणजेच त्यात तीन जोड अंक निघाले. या ९ अंकात मिळून १९ गंभीर लेख, ५ प्रवासवर्णनपर लेख, ४ चर्चा, १ व्यक्ति चरित्र, १ ललित लेख, २ टिपणे, २ कथा, १ संगीतिका व ४५ कविता असे साहित्य वाचकांना सादर केले. शिवाय लहान मोठी २१ पुस्तक–परीक्षणे देण्यात आली. एकूण मजकूर ४०७ पृष्ठांचा होता. त्या शिवाय संघवार्ता, वार्षिक अहवाल इत्यादींची ६० पृष्ठे वेगळी.

मे १९६३ ते अेप्रिल १९६४ या वर्षात ७ अंक निघाले. त्यात ५ जोड अंक होते. अेकूण पृष्ठसंख्या ३३६+५२ म्हणजे सुमारे ४०० इतकी होती. ६२–६३ पेक्षा ही संख्या ६० ने कमी होती. साहित्याचा तपशील असा–१८ गंभीर लेख ५ प्रवासवर्णनपर लेख, १ व्यक्तिचरित्र, २ कथा, ५० कविता व ९ पुस्तक–परीक्षणे.

मे १९६४ ते अेप्रिल १९६५ या वर्षात चालू अंक धरून ६ अंक निघाले. मे ६४ चा अंक निघाला नाही व अेप्रिल ६५ चा निघणार नाही. ४ जोड अंक निघाले. तथापि एकूण पृष्ठ संख्या ६३–६४ पेक्षा जास्त म्हणजे ३७५+८०= ४१५ इतकी भरते. यावर्षी २६ गंभीर लेख, ४ प्रवास वर्णने, २ व्यक्ति चरित्रे १ ललित लेख, १ भाषण, ३६ कविता व १० पुस्तकपरीक्षणे असे साहित्य पुरविले गेले.

गेल्या तीन वर्षात अनेक वेळा जोड अंक काढावे लागले. त्यामुळे नियमित-पणात खंड पडला. पण हे मुख्यतः आर्थिक कारणा साठीच करावे लागले. तथापि

सरासरीने ३२ ते ४० पृष्ठांचा मजकूर दरमहा वाचकांना मिळाला. तीन रुपये वार्षिक वर्गणीत अेवढे साहित्य–तेहि नामवंत साहित्यिकांचे–पुरविणे वि. सा. संघाच्या मुखपत्रालाच शक्य झाले. हे स्पृहणीय नसले तरी कौतुकास्पद नव्हे काय ?

ही आकडेमोड इयेच सोडून मी अंतरंगाकडे वळतो. या तीन वर्षात हे जे साहित्य युगवाणीतून प्रसिद्ध झाले ते निस्संशय उच्च दर्जाचे होते असे मी नि:संकोचपणे म्हणतो. प्रा. भ. श्री. पंडित यांचे टिळक, बालकवि, चंद्रशेखर या कवींवरील विस्तृत लेख संशोधन, विवेचन, रसिक समालोचन व मूल्यमापन या सर्व दृष्टींनी वैशिष्टयपूर्ण व आदर्श ठरावेत असेच आहेत. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांची 'कलामार्ग' ही लेखमाला व अन्यहि लेख त्यांच्या गाढ व्यासंगाची व मूलगामी दृष्टीची साक्ष देतात. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांचे 'वाङ्मयीन वादा' वरील लेख मननीय असून त्यांच्या कीर्तीला साजेसे व युगवाणीच्या कीर्तीत भर घालणारे असेच आहेत. जुन्या पिढीतील नामवंत लेखकांपैकी प्रा. पां. कृ. सावळापूरकर आणि अलीकडेच ज्यांच्या लेखांचा युगवाणीला लाभ झाला ते प्राचार्य श्री. ल. पांढरीपांडे यांच्या लेखांचाहि मी येथे निर्देश करतो. नव्या पिढीतील व्यासंगी व चिकित्सक लेखकांपैकी प्रा. भा. श्री. परांजपे, प्रा. दा. ल. अडोणी, प्रा. सुरेश डोळके, श्री. वसंत वरखेडकर आदि अनेकांचे लिखाण संग्राह्य व संस्मरणीय असेच म्हणावे लागेल. याशिवायहि प्रा. श्री. ना. बनहट्टी, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. श्री. शं. खानवेलर, प्रा. मा. गो. वैद्य, प्रा. प्र. रा. जोघ, प्रा. म. ना. लोही, श्री. दे. गो. लांडगे, प्रा. भ. प्र. मोहरीर, प्रा. म. बा. कुंडले, प्रा. कुमुदिनी घारपुरे, प्रा. प. श्री. पांढरीपांडे, डॉ. अनंत फाटक, प्रा. भास्कर कविमंडन, प्रा. वी. आर. आष्टीकर, प्राचार्य ना. बा. पराडकर, प्रा. श्री. गो. काशीकर, प्रा. व. शि. पुरोहित आदि जुन्या–नव्या पिढीतील व्यासंगी, चिकित्सक लेखकांचे लिखाण जे या तीन वर्षात युगवाणीतून प्रसिद्ध झाले ते कोणत्याहि उच्चदर्जाच्या मासिकात शोभून दिसेल असेच आहे.

ललित लिखाणापैकी सर्व वयोगटातील व सर्व क्षेत्रातील वाचकांना अत्यंत प्रिय झालेल्या, डॉ. गो. मा. कुलकर्णी यांच्या, प्रवासवर्णनपर लेखमालांचा सर्वप्रथम उल्लेख करावा लागेल. तसेच श्री. ना. रा. शेंडे, सौ. इंदुमती शेवडे, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे व सौ. ताराबाई शास्त्री यांच्या अभिरुचिसंपन्न कथा, सौ. सुमतिदेवी धनवटे, श्री. व. कृ. वऱ्हाडपांडे. प्रा. के. रा. जोशी यांचे प्रवासलेख, प्रा. भा. ज. कविमंडन व सौ. मन्दाकिनी कुलकर्णी यांचे लघुनिबंध आदि ललित साहित्यहि उल्लेखनीय आहे.

कवींच्या पैकीहि अनेक जुन्या–नव्या कवींचा उल्लेख येथे करता येईल. कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, प्रा. या. मु. पाठक, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. वसंत वऱ्हाडपांडे, सौ. उषा लिमये, बाबा मोहोड, श्री. रा. अ. काळेले, प्रा. हि. बे. चव्हाण, प्रा. गोविन्द जोशी, श्री. शं. श्री. वाशीकर, कृष्णा चौधरी, म. ना. श्रीखंडे, ना. धों. महारनोर, राजा महाजन, सुधीर देव, सरला भोळे, कुसुमानंद, भगवन्त क्षीरसागर, मधु जामकर, तु. ना. काटकर, शरद मुठे, सुखराम हिवराळे, माणिक भोयर, हिरा बनसोड, सौ. सरस्वती सुभेदार, मुकुंद बुटी आदि विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्रातीलहि अनेक कवींच्या विविध परीच्या कविता युगवाणीतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

'युगवाणी'तून आलेली पुस्तक समीक्षणे समतोल, निर्भीड व सौजन्यपूर्ण म्हणून संस्मरणीय ठरतील. डॉ. ब. स. येरकुंटवार, प्रा. भा. श्री. परांजपे, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे, प्रा. रू. पां. पाजणकर, डॉ. देवपुजारी, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. सुरेश डोळके, प्रा. या. मु. पाठक, प्रा. श्री. भा. वर्णेकर, श्री. रा. अ. काळेले, प्रा. मा. गो. वैद्य आदि समीक्षकांनी ही समीक्षणे लिहिलेली आहेत.

ही नामावलि कांहीशा विस्ताराने येथे देण्यात माझा हेतु दुहेरी आहे पहिला हा की त्यावरून किती विपुल व विविध प्रकारच्या साहित्यिकांनी 'युगवाणी'तून लिखाण केलं हे वाचकांच्या एकदम लक्षात यावं. आणि दुसरा अधिक महत्त्वाचा हा की त्या सर्वांच्या विषयी नामोल्लेखपूर्वक कृतज्ञता व्यक्त करावी. यांपैकी अनेकांचे लिखाण दुसरीकडे कुठेहि अगत्यपूर्वक प्रसिद्ध होऊ शकले असते. इतकेच नव्हे तर त्याबद्दल त्यांना आर्थिक मोबदलाहि मिळाला असता. पण अधिक प्रसिद्धी अगर मोबदला या कशाचीहि पर्वा न करता माझ्या स्नेहाखातर व युगवाणीवरील प्रेमामुळे त्यांनी ते 'युगवाणी'कडे पाठविले. या सर्वांचे (यात कांही नांवे सुटलीहि असतील) 'युगवाणी' वरील व मजवरील ऋण मी येथे प्रकटपणे मान्य करतो व त्यांनी निरपेक्षपणे केलेल्या या सहाया बद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. प्रा. भ. श्री. पंडित व प्रा. गो. मा कुलकर्णी यांनी केलेल्या विपुल सहाया बद्दल त्यांचा मी विशेष ऋणी आहे.

संपादक मंडळातील माझे सहकारी प्रा. भा. श्री. परांजपे, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे व प्रा. मा. गो. वैद्य यांचे त्यांनी केलेल्या सहायाबद्दल मी आभार मानतो.

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांनी 'युगवाणी'चे वेळोवेळी कौतुक करून मला प्रोत्साहन दिलं. संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी 'युगवाणी' विषयी सदैव आस्था व आपुलकी व्यक्त केली व सहाय केलं

या दोघांचेहि मी मन:पूर्वक आभार मानतो. सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर, चिटणीस (व आता सरचिटणीस) श्री. गो. स. देहाडराय व कोषाध्यक्ष कु. ताराबाई प्रधान यांनीहि 'युगवाणी'च्या संबंधात मला सतत मदत केली याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. कार्यकारिणीतील इतर सदस्यांचाहि मी आभारी आहे.

नागपुरातील एक ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार श्री. ग. त्र्यं. उर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांचं प्रोत्साहण व सहायहि प्रसंगी मला मिळालं, याचाहि येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो.

या चारहि वर्षांत 'युगवाणी'चे मुद्रण 'नागपूर टाईम्स प्रेस' मधे झाले. या काळात मुद्रक म्हणून नागपूर टाइम्सचे असि. मॅनेजर श्री. एम्. जी. सराफ व त्यांचे सहकारी श्री. सरोदे यांच्याशी माझा संबंध आला. 'युगवाणी'च्या मुद्रणाचे हे काम त्यांनी चांगले तर केलेच पण ते अत्यंत आपुलकीने व सौहार्दाने केले. याबद्दल त्यांचे मी अत्यंत मन:पूर्वक आभार मानतो.

'युगवाणी'च्या ज्या असंख्य वाचकांनी वेळोवेळी मजजवळ समक्ष वा पत्र-रूपाने 'युगवाणी'तील लिखाणाविषयी प्रशंसोद्‌गार काढले वा अनुकूल अभिप्राय कळविला त्या सर्वांचा मी अतिशय आभारी आहे.

सर्व लेखक, कवि, समीक्षक, मुद्रक, वाचक, हितचिंतक या सर्वांना धन्यवाद देऊन आणि त्यांनी मजवरील व 'युगवाणी' वरीलहि लोभ असाच कायम ठेवावा अशी त्यांना प्रार्थना करून त्यांचा निरोप घेतो.

दि. १४-३-१९६५ —श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

दासबोधातील प्रश्नोत्तरी

लेखांक २ रा

—श्री. ल. पांढरीपांडे

(पहिला लेखांक 'युगवाणी'च्या डिसेंबर, १९६४ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे——संपादक)

समर्थांनी 'सृष्टि कोटिगुणे मिथ्या' असे शिष्यांना ठासून सांगितले हे आपण मागील लेखात पाहिले. पण याने तुमच्या आमच्या प्रमाणेच शिष्यांचे समाधान झाले नाही. म्हणून ते पुन्हा स्वामींना त्याबद्दलच विचारतात. यावेळी ते समर्थांना दोन प्रश्न करितात. एक असा की सृष्टि जर मिथ्या आहे तर दिसते कां ?

दृश्य प्रत्यक्ष दिसतें । म्हणोनि सत्यचि वाटतें ।
यासि काय करावें तें । सांगा स्वामी ।। ६–६–५८

आणि दुसरा प्रश्न असा की सृष्टि मिथ्या आहे असे सांगूनहि "सगुण भजावा निश्चित" असे आपण म्हणाला होतां. तर हे कसे ? दृश्य जर मिथ्या आहे तर भजन कां करावे ?

ज्ञानें दृश्य मिथ्या झालें । तरी कां पाहिजे भजन केलें ।?
तेणें काय प्राप्त झालें । हें मज निरूपावें ।। ६–७–१

यांपैकी दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर समर्थांनी आधी (७ व्या समासात) दिले आहे व पहिल्याचे नंतर म्हणजे ८ व्या समासात दिले आहे. पण आपण पहिल्या प्रश्नाचे उत्तर आधी ऐकू. कारण आपण मागील लेखाच्या शेवटी त्याच शंकाजालात गुरफटलो होतो.

पहिल्या प्रश्नाला समर्थ उत्तर देतात की—

देखिलें तें सत्यचि मानावें । हें ज्ञात्याचें देखणें नव्हे ।
जड मूढ अज्ञान जीवें । हें सत्य मानिजे ।। ६–८–२

केवळ आपल्याला दिसते म्हणून कोटयवधि ग्रंथांच्या व संतमहंतांच्या वचनांना खोटे ठरविणे योग्य नाही. असे सांगून समर्थांनी 'दिसते ते अनेकदा मिथ्या कसे असते' हे दाखविण्याकरिता सुंदर सुंदर दृष्टांतांचा वर्षाव केलेला आहे. ते म्हणतात, 'मृगाने मृगजल पाहिले आणि तो धावू लागला,' 'रात्री स्वप्नात पुष्कळ द्रव्य मिळाले,' हे दिसले म्हणून खरे मानावे काय ?

अनुक्रमणिका

खेळतां नाटकें दशावतारी । तेथे येती सुंदर नारी ।।
नेत्र मोडिती कळाकुसरी । परि ते अवघे घटिंगण ।। ११
वरी पाहता पालथे आकाश । उदकी पाहता उताणे आकाश ।।
मध्ये चांदण्यांचाहि प्रकाश । परि ते अवघे मिथ्या ।। १४

तसेच पाण्यावर जितके बुडबुडे असतील तितक्यात रूपे दिसतात, एकच तोंड जितके आरसे हाती धराल तितक्या आरश्यात दिसते, नदीच्या काठावरून काही चालले असले की नदीत ते उलटे दिसते, हे खरे समजायचे काय ? अशीच राक्षसी माया. मारीचाने सुवर्णमृगाचे रूप घेऊन रामचंद्राला भुरळ पाडली होती, दैत्य पदार्थांची आणि फळांची रूपे घेऊन द्वारकेत शिरले होते, त्यांना कृष्णाने मारले, देवांना आपल्या मायेने जर्जर करणाऱ्या दैत्यांना शक्तीला अवतार घेऊन मारावे लागले. तेव्हा–

मनुष्यांची बाजेगिरी (फसवेगिरी) । राक्षसांची वोडंवरी (कपटविद्या),
भगवंताची नानापरी । विचित्र माया ।। ३३

म्हणून जे दिसते तेच खरे समजणे योग्य नाही. रत्नाची परीक्षा आपल्या दिसण्यावरून होत नाही. त्याबद्दल पारखी जवाहिऱ्याच्या मतालाच मान दिला पाहिजे."

इतके सांगून सुद्धा शिष्य शंकारहित झाले असे त्यांच्या तोंडाकडे पाहून स्वामींना वाटले नसावे. कारण केवळ दृष्टान्तांनी मुद्दा सिद्ध होत नाही. दृष्टान्त हे तर्काने व न्यायाने सिद्ध झालेल्या मुद्याचे स्पष्टीकरण करण्यासाठी असतात. शिवाय दृष्टान्त नेहमी एकांगीच असायचे. ते सर्वरवी लागू पडणे शक्य नसते उदाहरणार्थ वरील दृष्टान्तातील आभास किंवा कपट तेव्हाच किंवा लवकरच कळून येते व मग आपणच ते मिथ्या ठरवितो. पण या जगाचे तसे होत नाही. ते मिथ्या ठरविण्याकरिता जो प्रत्यय वा अनुभव आवश्यक असतो तो आपल्याला येत नाही.

ही शिष्यांची अडचण बहुधा लक्षात घेऊन स्वामी म्हणतात ही "भगवंताची नानापरी । विचित्र माया । साचासारिखीच दिसे । विचारिताचि निरसे । मिथ्याच, परी आभासे । निरंतर ।। ३४

साच म्हणावी तरी हे नासे । मिथ्या म्हणावी तरी हे दिसे ।
दोन्हीं पदार्थी अविश्वासें । सांगतां मन ।। ३५"

सृष्टि अशाश्वत अथवा विनाशी असेल. पण ती सतत दिसत असते, इंद्रियगोचर होत असते, तेव्हा तिला मिथ्या कसे म्हणावे, ही शिष्यांची अडचण स्वामींनी ओळखली. तेव्हा समर्थ सांगतात की ही अडचण तुला वाटते याचे कारण हे आहे की–

अनुक्रमणिका

दृश्यभास अविद्यात्मक । तुझाहि देह तदात्मक ।
म्हणोनि हा अविवेक । तेथे संचरला ।। ३८

दृष्टीने दृश्य देखिलें । मग भासावरी बैसलें ।
परी तें लिंगदेह झालें । अविद्यात्मक ।। ३९

तुझा देह अविद्येचा आणि सृष्टिहि अविद्येची. त्या देहाने तू सृष्टि पाहतोस. म्हणून ती तुझ्या डोळ्याला सत्य भासते. याशिवाय हा देह म्हणजेच मी असेहि तू समजतोस. म्हणून तुला ती सत्य भासते.

तेचि काया मी आपण । देहबुद्धीचें लक्षण ।
येणेंकरिता झालें प्रमाण । दृश्य अवघें ।। ४१

तेव्हा देहबुद्धीमुळे म्हणजे देहच मी आहे या बुद्धीमुळे सृष्टि सत्य भासते.

समर्थांच्या ह्या स्पष्टीकरणाने आपल्या मनात पूर्वी (पहिल्या लेखात शेवटी नमूद केलेली) जी शंका आली होती ती बऱ्याच अंशी दूर होते. आपली शंका अशी होती की सृष्टीचे सातत्य, नियमबद्धता व सार्वत्रिकता या गोष्टी सृष्टि-मिथ्यात्वाला सुसंगत आहेत काय ? [या प्रश्नाला उत्तर असे मिळाले की देहबुद्धि असलेल्या मनुष्याला सृष्टि मिथ्या नाही, सत्यच आहे. अशा प्रकारच्या सत्य सृष्टीशी तिच्या सातत्याचा, नियमबद्धतेचा व सार्वत्रिकतेचा विरोध उत्पन्न होत नाही, हे उघडच आहे.

पण येथे समर्थांनी एक मोठी अटक घालून ठेविली आहे. ती ही की देह-बुद्धीमुळे सृष्टि सत्य वाटते; पण देहबुद्धीचा तर त्याग केला पाहिजे. तसा त्याग केला किंवा तो साधला म्हणजे सृष्टि मिथ्याच वाटेल व मिथ्याच ठरेल. देहबुद्धि म्हणजे मी देहच आहे असे मानणे. मी म्हणजे वस्तुतः आत्मा. देहाहून आत्मा अथवा मी निराळा आहे हे तर उघडच आहे. कारण मरण आले म्हणजे देह असतो पण आपण नसतो. पण जीवंतपणी आपला व देहाचा संबंध अविभाज्य असतो. देहाच्या साधनानेच आपण पाहतो व आपणाला दिसते. तथापि असा अविभाज्य संबंध असला तरी आपल्या ठिकाणी अशी शक्ति आहे की एक तर आपण या साधनाचा उपयोगच म्हणजे पाहणेंच बंद करू शकतो; किंवा मी जीवंतपणी देखील देहाहून वेगळा आहे असे मानू शकतो. यांपैकी पहिला उपाय फारसा उपयोगी नाही. आपण डोळे बंद केले व पाहिलेच नाही, तरी सृष्टि मिथ्या ठरत नाही. फार झाले तर ती तशी आपल्यापुरती ठरेल. पण इतर पाहणारांना ती सत्यच राहील. आंधळ्याला प्रकाश मिथ्या असेल पण डोळसांना तो सत्यच असतो. आता दुसऱ्या उपायाचा विचार करायचा. हा उपाय असा आहे की देहाशी आपला संबंध असून म्हणजे देहात आपण असून देखील, आपला

खेळतां नाटकें दशावतारी । तेथें येती सुंदर नारी ॥
नेत्र मोडिती कळाकुसरी । परि ते अवघे घटिंगण ॥ ११
वरी पाहता पालथे आकाश । उदकीं पाहता उताणे आकाश ॥
मध्ये चांदण्यांचाहि प्रकाश । परि ते अवघे मिथ्या ॥ १४

तसेच पाण्यावर जितके बुडबुडे असतील तितक्यात रूपे दिसतात, एकच तोंड जितके आरसे हाती धराल तितक्या आरश्यात दिसते, नदीच्या काठावरून काही चालले असले की नदीत ते उलटे दिसते, हे खरे समजायचे काय ? अशीच राक्षसी माया. मारीचाने सुवर्णमृगाचे रूप घेऊन रामचंद्राला भुरळ पाडली होती, दैत्य पदार्थांची आणि फळांची रूपे घेऊन द्वारकेत शिरले होते, त्यांना कृष्णाने मारले, देवांना आपल्या मायेने जर्जर करणाऱ्या दैत्यांना शक्तीला अवतार घेऊन मारावे लागले. तेव्हा–

मनुष्यांची बाजेगिरी (फसवेगिरी) । राक्षसांची वोडंबरी (कपटविद्या),
भगवंताची नानापरी । विचित्र माया ॥ ३३

म्हणून जे दिसते तेच खरे समजणे योग्य नाही. रत्नाची परीक्षा आपल्या दिसण्यावरून होत नाही. त्याबद्दल पारखी जवाहिऱ्याच्या मतालाच मान दिला पाहिजे."

इतके सांगून सुद्धा शिष्य शंकारहित झाले असे त्यांच्या तोंडाकडे पाहून स्वामींना वाटले नसावे. कारण केवळ दृष्टान्तांनी मुद्दा सिद्ध होत नाही. दृष्टान्त हे तर्काने व न्यायाने सिद्ध झालेल्या मुद्याचे स्पष्टीकरण करण्यासाठी असतात. शिवाय दृष्टान्त नेहमी एकांगीच असायचे. ते सर्वस्वी लागू पडणे शक्य नसते. उदाहरणार्थ वरील दृष्टान्तातील आभास किंवा कपट तेव्हाच किंवा लवकरच कळून येते व मग आपणच ते मिथ्या ठरवितो. पण या जगाचे तसे होत नाही. ते मिथ्या ठरविण्याकरिता जो प्रत्यय वा अनुभव आवश्यक असतो तो आपल्याला येत नाही.

ही शिष्यांची अडचण बहुधा लक्षात घेऊन स्वामी म्हणतात ही "भगवंताची नानापरी । विचित्र माया । साचासारिखीच दिसे । विचारिताचि निरसे । मिथ्याच, परी आभासे । निरंतर ॥ ३४

साच म्हणावी तरी हे नासे । मिथ्या म्हणावी तरी हे दिसे ।
दोन्हीं पदार्थीं अविश्वासें । सांगतां मन ॥ ३५"

सृष्टि अशाश्वत अथवा विनाशी असेल. पण ती सतत दिसत असते, इंद्रियगोचर होत असते, तेव्हा तिला मिथ्या कसे म्हणावे, ही शिष्यांची अडचण स्वामींनी ओळखली. तेव्हा समर्थ सांगतात की ही अडचण तुला वाटते याचे कारण हे आहे की–

अनुक्रमणिका

दृश्यभास अविद्यात्मक । तुझाहि देह तदात्मक ।
म्हणोनि हा अविवेक । तेथे संचरला ।। ३८

दृष्टीने दृश्य देखिलें । मग भासावरी बैसलें ।
परी तें लिंगदेह झालें । अविद्यात्मक ।। ३९

तुझा देह अविद्येचा आणि सृष्टिहि अविद्येची. त्या देहाने तू सृष्टि पाहतोस. म्हणून ती तुझ्या डोळ्याला सत्य भासते. याशिवाय हा देह म्हणजेच मी असेहि तू समजतोस. म्हणून तुला ती सत्य भासते.

तेचि काया मी आपण । देहबुद्धीचें लक्षण ।
येणेकरिता झालें प्रमाण । दृश्य अवघें ।। ४१

तेव्हा देहबुद्धीमुळे म्हणजे देहच मी आहे या बुद्धीमुळे सृष्टि सत्य भासते.

समर्थांच्या ह्या स्पष्टीकरणाने आपल्या मनात पूर्वी (पहिल्या लेखात शेवटी नमूद केलेली) जी शंका आली होती ती बऱ्याच अंशी दूर होते. आपली शंका अशी होती की सृष्टीचे सातत्य, नियमबद्धता व सार्वत्रिकता या गोष्टी सृष्टि-मिथ्यात्वाला सुसंगत आहेत काय ? [या प्रश्नाला उत्तर असे मिळाले की देहबुद्धि असलेल्या मनुष्याला सृष्टि मिथ्या नाही, सत्यच आहे. अशा प्रकारच्या सत्य सृष्टीशी तिच्या सातत्याचा, नियमबद्धतेचा व सार्वत्रिकतेचा विरोध उत्पन्न होत नाही, हे उघडच आहे.

पण येथे समर्थांनी एक मोठी अटक घालून ठेविली आहे. ती ही की देह-बुद्धीमुळे सृष्टि सत्य वाटते; पण देहबुद्धीचा तर त्याग केला पाहिजे. तसा त्याग केला किंवा तो साधला म्हणजे सृष्टि मिथ्याच वाटेल व मिथ्याच ठरेल. देहबुद्धि म्हणजे मी देहच आहे असे मानणे. मी म्हणजे वस्तुतः आत्मा. देहाहून आत्मा अथवा मी निराळा आहे हे तर उघडच आहे. कारण मरण आले म्हणजे देह असतो पण आपण नसतो. पण जीवंतपणी आपला व देहाचा संबंध अविभाज्य असतो. देहाच्या साधनानेच आपण पाहतो व आपणाला दिसते. तथापि असा अविभाज्य संबंध असला तरी आपल्या ठिकाणी अशी शक्ति आहे की एक तर आपण या साधनाचा उपयोगच म्हणजे पाहणेच बंद करू शकतो; किंवा मी जीवंतपणी देखील देहाहून वेगळा आहे असे मानू शकतो. यांपैकी पहिला उपाय फारसा उपयोगी नाही. आपण डोळे बंद केले व पाहिलेच नाही, तरी सृष्टि मिथ्या ठरत नाही. फार झाले तर ती तशी आपल्यापुरती ठरेल. पण इतर पाहणारांना ती सत्यच राहील. आंधळ्याला प्रकाश मिथ्या असेल पण डोळसांना तो सत्यच असतो. आता दुसऱ्या उपायाचा विचार करायचा. हा उपाय असा आहे की देहाशी आपला संबंध असून म्हणजे देहात आपण असून देखील, आपला

अनुक्रमणिका

त्याच्याशी संबंध नाही, आपण वेगळे आहोत असे मानायचे. याला दृष्टान्त द्यायचा झाला तर तो असा होईल. घरात एखादा भाडेकरी असावा, घराच्या भिंतीला भेग गेली किंवा तिच्या विटा खचल्या तरी ते त्याच्या लक्षात येण्याचे कारण नाही. तो फक्त त्या घरात राहणारा. ते पडले तर तो दुसऱ्या घरात जाईल. तो त्या घराशी बांधलेला नाही. याप्रमाणे आपण देहात राहतो. पण देहाशी आपला संबंध नाही, आपण वेगळे आहोत. असे मानले तर देहाचे पाहणे हे आपले पाहणे होणार नाही. आपल्या म्हणजे आपण राहत असलेल्या देहाहून आपण वेगळे आहोत असे मानले तर आपला देह आणि दुसऱ्याचा देह यात फरक उरत नाही आणि दुसऱ्याचे पाहणे जसे आपल्याला दिसत नाही किंवा दुसऱ्याचे जेवण जसे आपल्या पोटात जात नाही, तसेच आपल्या देहाचे पाहणे आपल्याला दिसणार नाही. अर्थात देहापासून हे 'मी'चे म्हणजे आपले वेगळेपण मनासहित असले पाहिजे. मन जर शरीरातच राहिले तर शरीराचे पाहणे त्याला दिसेलचत पण मन तेथे नसले तर शरीराच्या डोळ्यात प्रतिबिंब पडूनहि मनाला दिसणार नाही. पण असे असले तरी शरीराची भूक, तहान भागविण्यासाठी मनाला शरीरात हाजरी द्यावीच लागेल व त्यावेळी अन्न व पाणी यांना मिथ्या म्हणून चालणार नाही. अन्नपाणी घेण्याचे हे त्याचे कार्य कदाचित तांत्रिक स्वरूपाचे होईल. त्यात त्याचे मन राहणार नाही, ते बाहेरच राहील. (मोठ्या कार्यात गढलेल्या पुरूषाचे मन जसे खाण्यापिण्यात नसते, त्या कार्यातच गुंतलेले असते त्याप्रमाणे) अशा ध्यानस्थ पुरुषाला स्वतःचे शरीर व जग दोन्ही कदाचि. भासणार नाहीत हे खरे. ही स्थिति म्हणजे एक जागृत सुषुप्तावस्थाच होय, आता, ही स्थिति जगान्मिथ्यात्वाच्या सिद्धीसाठी प्रमाण मानावी काय, हा एक प्रश्न आहे.

तथापि ती जरी क्षणभर प्रमाण मानली तरी ज्याची अशी स्थिति नाही अशा सामान्य माणसासाठी त्याचा देह व सृष्टि सत्यच आहेत, असा समर्थांच्या वरील स्पष्टीकरणाचा निष्कर्ष निघतो. याच दृष्टीने समर्थांनी सामान्य माणसाला दासबोधात इतरत्र सांगितले आहे की—

> आधी प्रपंच करावा नेटका । मग पाहावे परमार्थ विवेका ।
> प्रपंच सोडूनि परमार्थ कराल । तरी तुम्ही कष्टी व्हाल ॥

आता, यावर आक्षेप असा येऊ शकतो की यात तुम्ही काय विशेष शोधले सामान्य माणूस सृष्टीला सत्यच मानतो. यात तत्त्वज्ञान काय आहे? हे तर उघडच आहे.

याला उत्तर असे की तत्त्वज्ञान उघड गोष्टीहून नेहमी निराळेच असले पाहिजे असे नाही. उघड गोष्टी देखील तत्त्वज्ञानात कशा बसू शकतात हेहि

तत्त्वज्ञान सांगते. पण मौज अशी आहे की ही उघड गोष्टहि अमान्य करणारे व जगन्मिथ्यात्वाचा प्रचार सामान्य लोकात करणारे लोक आपल्या देशात व जगात होऊन गेले व आजहि आहेत. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हे तत्त्व तर भारतात सर्वच लहान–मोठयांना तरुण–वृद्धांना इतकी वर्षे सारखे शिकवण्यात आले आहे की, तो भारतीयांच्या जीवनाचा एक भागच होऊन वसला आहे.

समर्थांची 'देहबुद्धि', माया, अविद्या, आभास इ. विषयक विचारसरणी शंकराचार्यांचा अध्यासवाद वा विवर्तवाद यापासून घेतलेली आहे, यात शंका नाही. म्हणून आचार्यांचा अध्यासवाद थोडा तपासून पाहू.

आचार्य म्हणतात,–

अध्यास म्हणजे "स्मृतिरूपः परत्र पूर्वदृष्टावभासः।" (दुसऱ्याच ठिकाणी पूर्वी पाहिलेल्या वस्तूचा स्मृतिरूप आभास) किंवा "अतस्मिंस्तद्बुद्धिः" (जे जसे नाही ते तसे आहे अशी बुद्धि वा कल्पना) उदा. दोरीच्या ठिकाणी अंधारात सर्प वाटणे, किंवा उन्हात चमकणारा शिंपला चांदीचा तुकडा वाटणे इ. आचार्यांचे म्हणणे असे की, जिकडे तिकडे वस्तुतः एक ब्रह्मच भरले आहे; पण जीवात्म्याला त्या ब्रह्माच्या ठिकाणी जगाचा आभास होतो. हाच जीवाचा ब्रह्मावर अध्यास यालाच ते अविद्या किंवा अज्ञानहि म्हणतात.

पण या अध्यासासंबंधी किंवा आभासासंबंधी जे प्रश्न उत्पन्न होतात ते असे :–

१) आभास होण्याकरिता दोन गोष्टींची गरज असते. एक तर आभासाला आश्रय पाहिजे व आभास जर इंद्रियगोचर असेल तर आश्रय वस्तुहि इंद्रियगोचर असली पाहिजे. रज्जूवर सर्पाचा आभास होण्याकरिता एक तर रज्जू असला पाहिजे व तोहि इंद्रियगोचर असला पाहिजे. दुसरे असे की ज्या वस्तूचा आभास होतो ती वस्तु पूर्वी पाहिलेली असली पाहिजे. ज्याने सर्प कधी पाहिलाच नाही त्याला दोरीवर सर्पाचा आभास होणार नाही. ब्रह्म व सृष्टि यांच्या बाबतीत हा निकष लागू होत नाही. कारण ब्रह्म इंद्रियगोचर नाही आणि जीवात्म्याने सृष्टि पूर्वीच पाहिलेली नसते.

२) दुसरे असे की आभासाशी त्याच्या आश्रयाचे सादृश्य असावे लागते. दोरीवर अंधारात सर्पाचा आभास होऊ शकेल, पण एखाद्या उंच उभ्या खांबावर किंवा एखाद्या बैलगाडीवर होऊ शकणार नाही. सृष्टीतील असंख्य प्राणि, वृक्ष, पर्वत, नद्या, सरोवरे, मैदाने, शेते, विहिरी, दगड, धोंडे इ.चे सादृश्य ब्रह्माच्या ठिकाणी आधीचेच असणे शक्य आहे काय ? दररोज नवनवीन उत्पन्न होणाऱ्या व नष्ट होणाऱ्या जीवांच्या व वनस्पतींच्या बाबतीत, तसेच नवीन नवीन वैज्ञानिक

शोध व त्यापासून तयार होणारी यंत्रे, शस्त्रे, अस्त्रे, अवजारे, साधने इ. च्या बाबतीत ते सादृश्य कसे असणार ?

३) आणि तिसरे असे की हा आभास अथवा अध्यास आहे असे मानले तरी तो जीवाला नित्य आहे. त्याचा निरास होत नाही. तो अनादि आहे असे आचार्यहि मानतात. पण तसाच तो अनंतहि आहे. प्रकाशाने दोरीवरील सर्पाच्या आभासाचे निरसन होऊ शकते. पण ब्रह्मज्ञानानेहि जगताचे निरसन होत नाही. स्वप्न हे जागृतीने बाधित होते, पण स्वप्नामुळे जागृतीतील ज्ञानसातत्य व ज्ञानानुसंधान बाधित होत नाहीत. स्वप्न, सुषुप्ति व समाधि या अवस्थात कोणाला कोणतेहि अनुभव येवोत त्यांचा जागृतीत काही उपयोग नसतो. जागृति म्हणजेच जीवन. अर्थात त्यांचा उपयोग नसतो व जीवनाशी त्यांचा संबंध नसतो जोपर्यंत जीवंत देह व शाबूत आणि आज आहेत तशीच (कारण इंद्रियात बदल झाला, तर जग वेगळेच दिसेल) इंद्रिये आहेत तोपर्यंत जग हे आहे तसेच दिसणे अपरिहार्यच आहे, मग तो मनुष्य ज्ञानी असो की अज्ञानी असो आणि त्याच्या जगाच्या उत्पत्ति स्थिति लया संबंधीच्या श्रद्धा कोणत्याहि असोत. आधुनिक वैज्ञानिकांनी जगाची रचना इलेक्ट्रॉन्स्नी (विद्युत्कणांनी) झालेली आहे असा शोध लावला आहे. त्यांना सर्व वस्तु इलेक्ट्रॉनरूपच दिसतात असे म्हणतात. परंतु एकाद्या वैज्ञानिकाने जेवायच्या वेळी अन्नाच्या ताटा [(डिश) तील अन्न टाकून ताटच खाल्ले असे होत नाही. नाही म्हणायला विचारात मग्न असलेला माणूस अनेकदा वेड्यासारखा वागत असतो हे खरे. पण तो त्याचा वेडेपणा त्याच्या लवकरच लक्षात येतो आणि वस्तुस्थिति पाहून तो भानावरहि येत असतो.

वरील आभासाची अथवा अध्यासाची विचारसरणी श्रीसमर्थांसारख्या पुरुषाने अनुसरावी हे काहीसे आश्चर्य आहे. समर्थांची भूमिका केवळ गतानुगतिकत्वाची खासच नव्हती. ही विचारसरणी ऐहिक कर्तृत्वाला निरोधक व विरोधक आहे. आचार्य तर म्हणतात की कर्मनिष्ठा व ज्ञाननिष्ठा यात तमःप्रकाशवत् विरोध आहे. दोन्ही एकत्र नांदू शकत नाहीत. बरोबरच आहे. ज्याला जग स्वप्नवत् मिथ्या वाटते तो जगातील कामे कशाला करील ? पण स्वतः शंकराचार्य आणि समर्थ रामदास स्वामी यांनी तर आपल्या आयुष्यात केवढे महान कार्य केले आहे ? आचार्यांनी सर्व भरतखंडभर विजय मिळवीत हिंडून भारताच्या चारही बाजूंना धर्मपीठे स्थापन केली. तर समर्थांनी महाराष्ट्रात ! ठिकठिकाणी मठस्थापना केली, धर्मजागृति केली, राजकारणात लक्ष घातले, लोकांना व्यावहारिक मार्गदर्शन केले, लोकांच्या भोळसट समजुतींचा आणि मूर्खपणाच्या आचारांचा कठोर शब्दात निषेध केला, [आणि महंतांना लोकात कसे वागावे याचा उपदेश केला. या त्यांच्या वागण्यात जगन्मिथ्यात्व उतरलेले दिसत नाही.

बोलण्यात व वागण्यात ही विसंगति नाही काय ? असा प्रश्न उपस्थित होतो आणि याला उत्तर हेच असू शकते की जगन्मिथ्यात्व जर मानलेच तर ते केवळ पारमार्थिक म्हणजे तात्त्विक व अंतिम (वैज्ञानिकांच्या इलेक्ट्रॉन्सप्रमाणे) स्वरूपाचे आहे, त्याचा प्रत्यक्षाशी अथवा ऐहिक व्यवहाराशी संबंध नाही. समर्थ म्हणतात त्याप्रमाणे हे जग जर "भगवंताची नानापरी । विचित्र माया ।" आहे तर ती जीवाला देहेन्द्रिये आहेत तोपर्यंत तोडता किंवा ओलांडून जाता येणेहि शक्य नाही. जेव्हा ईश्वर ती आवरील तेव्हाच ती आवरली जाणार. तोपर्यंत जीवाला ईशमायानिर्मित जग सत्य मानूनच आपली कर्तव्ये करावी लागतात हेच वरील दोन्ही महापुरुषांच्या चरित्रांवरून स्पष्ट होते.

शिष्यांशी चर्चा करिताना समर्थांनी जरी माया, अविद्या हे शब्द वापरले असले तरी जग मिथ्या हे सिद्ध करण्याकरिता, त्यांनी त्याच्या नश्वरतेवर विशेष भर दिला आहे. वस्तुतः सृष्टीच्या अनेक अंगांपेक्षा जीव व नरदेह हा जास्त नश्वर आहे. मृत्यु प्रत्येक प्राण्याला अटळ आहे. याचा अर्थ मनुष्य या सृष्टीत प्रवासी म्हणून आलेला आहे व इथून तो जाणार आहे. कोठून आला व कुठे जाणार हे त्याला माहीत नाही. पण, जगातील मनुष्याच्या अल्पकालीन वास्तव्यामुळेच जग मिथ्या ठरू शकते काय ? अर्थातच नाही. मग या नश्वरतेवर एवढा जोर कां ? कारण असे दिसते की ही नश्वरता मनुष्याने लक्षात ठेविली तर तो आपल्या काम, क्रोध, मोह इ. विकारांच्या बाबतीत संयम, मर्यादा व विवेक ठेवू शकेल. आगगाडीच्या डब्यात बसलेल्या माणसाने तो डबा आपले कायमचे मालकीचे घर आहे असे समजून वागू नये; यात शहाणपण आहे. पण त्यामुळे आगगाडी मिथ्या आहे असे मानून उदास होण्याचे व तेथील जीवनाकडे वा कर्तव्यांकडे दुर्लक्ष करण्याचे कारण नाही. समर्थ म्हणतात—

संसार त्याग न करितां । प्रपंच उपाधि न सांडतां ।
जनामध्ये सार्थकता । विचारेंचि होय ।। ६–९–२४

शिवाय नश्वरता ही गोष्ट सरसहा वाईट मानणेहि बरोबर नाही. मनुष्य जर फारच दीर्घजीवी झाला तर तो स्वतःला व दुसऱ्यांनाहि नकोसा होईल. भस्मासुर, चेंगिझखान, तैमूरलंग, नीरो, हिटलर इ. लोक जर अमर असते तर जगाची काय दशा झाली असती ! मृत्यूमुळे जीवन्तपणाला मोल आहे. मृत्यु हा गणेशाप्रमाणे सुखकारक व दुखःहारकहि आहे.

सारांश, नश्वरतेच्या कारणासाठी जग मिथ्या मानून निराश व विरागी होण्याचे कारण नाही. नश्वरतेलाहि दोन बाजू आहेत.

आल्बर्ट श्वाइटझर (Albert Schwitzer) हा प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ आपल्या 'Indian Thought and Development' या पुस्तकात

म्हणतो की भारतीय तत्वज्ञान हे नेहमीच जगाला नाकारणारे (World-negative) राहिले आहे, जगाला मानणारे (worldaffirmative) नाही, व त्यामुळे या तत्वज्ञानात नीतिधर्माला (Morality) महत्वाचे स्थान नाही.

या विधानाचा दुसरा भाग जरी फारसा खरा नसला तरी पहिला भाग नाकारता येणार नाही. गेल्या हजारो वर्षात प्रत्यक्ष आमचा आचार जरी भिन्न असला तरी–

कोऽहं कस्त्वं कुत आयातः, का मे जननी को मे तातः ।

इति परिभावय सर्वमसारं, विश्वं त्यक्त्वा स्वप्नविचारम् ।।

(मी कोण, तू कोण, कुठून आलास, माझी आई कोण, पिता कोण ! स्वप्नासारखे असलेले हे सर्व विश्व असार आहे हे समजून घे.) या विचाराला विरोध करण्याचा प्रयत्न आम्ही केला नाही व क्वचित कोणी केलाच तर तो असाच भक्तीसारखा दुसरा समधर्मी विचार मांडण्याकरिता.

शिष्यांच्या दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना समर्थांनी जरा समन्वयात्मक विचारसरणीचा अवलंब केला आहे, असे आपणाला दिसेल. शिष्यांचा दुसरा प्रश्न असा होता की 'सृष्टि मिथ्या आहे' असे सांगूनहि "सगुण भजावा निश्चित" असे आपण कसे म्हणता ? शिष्य विचारतात,–

"जे प्रत्यक्ष नाशवंत । त्यासि भजावे किंनिमित्त ।
सत्य सांडून असत्य । कोणे भजावे ।। ६–७–४
स्वामीचे भिडेने वोलवेना । येऱ्हवी कांहीच मानेना ।
साध्यचि (ज्ञान) झालीया साधना । कां प्रवर्तावें ।।" ६–७–८

शिष्यांचे "काहीच मानेना" हे शब्द लक्ष देण्यासारखे आहेत. वरील प्रश्न शिष्याने फार "निर्बुजलेपणे" केला व त्याला समर्थांनी फार मजेदार उत्तरे दिली आहेत. समर्थांचे पहिले रागाचे उत्तर असे आहे की "माझी आज्ञा, म्हणून तुम्ही सगुण भजन करा."

"गुरूचे वचन प्रतिपालन । हे मुख्य परमार्थाचे लक्षण ।
वचनभंग करिता विलक्षण । सहजचि झालें ।। ६–७–१०
म्हणोनि आज्ञेसि वंदावें । सगुण भजन मानावें ।।"

यावर पुन्हा शिष्य म्हणतो––

"स्वामींची आज्ञा प्रमाण । कोण करील अप्रमाण ।
परंतु याचा काय गुण । मज निरूपावा ।।" ६–७–१४

तेव्हा समर्थ उत्तर देतात–'ज्ञान झाले तरी तुला काही करावे लागतेच की नाही ? भोजन, उदकप्राशन, मलमूत्रत्याग, आपला परका ओळखणे इ. गोष्टी जर सुटत नाहीत, तर मग भजनच कां सोडावे ?'

"ज्ञानविवेकें मिथ्या झालें । परंतु अवघें नाही टाकिलें ।
तरी मग भजनेंचि काय केलें । सांग वापा ।। ६–७–१८
मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोनि जातें ।
कृपा केलिया रघुनाथें । प्रतीति येते ।। ६–७–३०
देहास लागली उपासना । आपण विवेकें उरेना ।
ऐशी स्थिति सज्जना । अंतरींची ।।" ६–७–४२

यात मनुष्य ज्ञानी झाला म्हणजेच त्याची 'देहबुद्धि' गेली तरी देहकर्मे त्याला करावीच लागतात आणि त्याने सगुणोपासना सोडू नये असे समर्थ म्हणतात शिवाय रघुनाथ भजनापासून ऐहिक लाभहि सांगितला आहे.

तात्पर्य समर्थांचा देहबुद्धि त्याग किंवा जगन्मिथ्यात्वज्ञान म्हणजे आचार्यां-प्रमाणे 'सर्वकर्मसंन्यास' नव्हे. उलट समर्थ सांगतात–

"रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । तें तत्कालचि सिद्धि पावे ।
कर्ता राम हें असावें । अभ्यन्तरीं ।।" ६–७–३३

याप्रमाणे अभिमान व अभिनिवेश न ठेविता कामे करावी असा उपदेश समर्थ करितात. समर्थांच्या थोर कार्याकडे पाहिले म्हणजे सगुणाची उपासना ही मानवकल्याणाची उपासनाहि होऊ शकते, असे दिसते.

शिष्यांच्या दोन्ही प्रश्नांना समर्थांनी दिलेली उत्तरे आपण पाहिली. त्यांच्या विवेचनात मनुष्याची देहबुद्धि आणि सृष्टीची नश्वरता यांचा सयुक्तिक व बुद्धीला पटणारा अर्थ कोणता असू शकतो तेहि आपण पाहिले. त्यावरून पहिल्य लेखाच्या शेवटी जगन्मिथ्यात्ववादासंबंधी जीवनरूक्षता, औदासीन्य इ. आक्षेप जे आपण नमूद केले होते त्यांचे अर्धे निराकरण झाले. बाकीचे अर्धे निराकरण करण्याकरिता अद्वैतसिद्धान्ताविषयी चर्चा करणे आवश्यक आहे.

अनुक्रमणिका

क्षणोक्षणी मी जगतो मरतो

तबक करीचे तुझ्या कमलिनी
स्तबक विलोभित आज मिरवितो
अर्धभाग तव यशात माझ्या
प्रचीति येउन आज तडफतो !
नीटनेटका भांग मनोमय
निढिलावर नित रविचा उदय
दो बाजुस तरि तारा पुंज
घनमालेतुन कसे निसटले
अभिनव सौंदर्याचा विस्मय !
सरल नासिका इवली जिवणी
कवळे कवळे लाडिक ओठ
निंबाचे नव तांबुस किसलय
करांगुली कमळाचे देठ
नकळत त्यावर फिरत राहते
विशाल काळे भोर नयन अन्
पलक तयाचे वर थरथरते

कुठले स्वप्निल दृश्य पाहसी
मुग्धनावऱ्या भावतरंगी
त्या स्वप्नाचे घेउन रेशिम
प्रत्यक्षातिल विणिले जीवन
सोन्याऱ्या अंगी तन्वंगी
स्फूर्तीची मम होती रूमझुम
आज अरत्री आणि परत्री
कोठेंही दिव्यत्व दिसेना
साथ कराया मात्र धावते
भिटल्या नयनीं अश्रु–सेना
तबक करीचें तुझ्याच नलिनी
स्तबक विलोभित आज मिरवितो
मुग्ध करूण गंधात भिजूनी
क्षणोक्षणी मी जगतो मरतो

—यादव मुकुंद पाठक

शि शि र रा त्र

झुळझुळ गारठ्याच्या शिशिरामधील रात्री
माळुनी चंद्रकिरणे आलीस चारूगात्री
दंवबेड पाकळ्यांचे लेवूनिया कपोली
मधुरात्र चांदण्यांची ओठी तरंगलेली

धनगर्द कुंतलांच्या झुलुपामधूनि वारा
का आज चालवितो गंधावरी पहारा
नयनांत वाहणारे संगीत भावनांचे
गात्रात तेज माचे निशिकान्त तारकांचे

डोळे न खास सत्ये ! रविचंद्र दोन्ही साक्षी
गगनास वेढणाऱ्या प्रीतिचिया गवाक्षी
फूलपंखी पाखरांचे तूं रंग रंग ल्यावे
निश्वासुनी फुलांनी दवबिंदुनी न्हावे

श्वासात श्वास जावा मिसळूनि चारूगात्री
झुळझूळ गारठ्याच्या शिशिरामधील रात्री !

—कृष्णा चौधरी

हस्तलिखितांच्या शोधात

(उत्तरार्ध)

—प्रा. के. रा. जोशी

[या लेखाचा पूर्वार्ध 'युगवाणी'च्या डिसेंबर १९६४ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे.—**संपादक**]

तिरूनेलवेल्ली

मदुरेहून तिरूनेरवेल्लीला आलो. पत्याप्रमाणे श्रीनटराजन या गृहस्थाचा शोध केला. ते घरी नव्हते. त्यांचे बंधु श्री. सुंदरम् हे भेटले. हे गृहस्थ मच्छली पट्टम येथील लाइफ इन्शुरन्स कार्पोरेशनचे डिव्हिजनल मॅनेजर होते. कांही कामानिमित्त ते सुटीवर आले होते. त्यांनी विचारपूस केली व पालामडईचा पत्ता सांगितला. आणखीहि कांही चर्चा केली. सायंकाळ होत आली होती. मी जवळ जवळ भारताच्या दक्षिण टोकास पोहोचलो होतो. तेथून कन्याकुमारी जवळ-पास ५० मैल होती. तेव्हा रात्री कन्याकुमारीला मुक्काम केला. सकाळी समुद्रस्नान व कन्याकुमारीचे दर्शन घेऊन दुपारी १–१॥ चे सुमारास तिरुनेलवेल्ली येथे आलो. सामान अमानती घरात स्टेशनवर ठेवले व पालामडईचा शोध करीत निघालो.

पालामडई

तिरूनेलवेल्लीपासून हे ठिकाण ६ मैलावर आहे. शहर बसच्या शेवटल्या स्टॉपवर उतरून सुमारे पाऊण मैल पायी जावयाचे होते. तामिलनाडमधून खड्यातून अगदी एकटे हिंडण्याचा हा प्रसंग जाणवणारा होता. बरोबर कुणीच नाही. ठिकाण शहरापासून सहा मैल दूर. वेळ ४॥ ची. माझ्याबरोबरच एक दाढीवाला गृहस्थ बसमधून उतरला. कंडक्टरने मला दिशा दाखविली. त्या गृहस्थालाहि तिकडेच जावयाचे होते. कंडक्टरने तामिळमधून मलाहि घेऊन जाण्याचे सुचविले. आम्ही निघालो. कांही दूर सडक होती. मग पायवाटेने गेलो. दुरुन नारळीच्या सावलीत पाचपंचवीस घरे दिसत होती. वरोबरच्या गृहस्थाने खुणेने दाखविले 'पालामडई'. गृहस्थ अशिक्षित पण बरा होता. त्याने तामीळ-मधून चौकशी केली. माझे तामिळचे ज्ञान अकटो विकट. जेवढे समजले तेवढ्याची ए काक्षरी उत्तरे दिली. त्याने विचारले 'आलासि कुठून' 'नागपूरहून'—उत्तर.

अनुक्रमणिका

'नागपूर कुठे आहे'—प्रश्न. 'उत्तरेला'. 'हिंदी येते'—मी विचारले. 'येते'. त्यालाहि आनंद झाला. नंतर तो मोडक्या तोडक्या हिंदीत बोलत होता. पूर्वी सेनेत शिपाई असल्यामुळे त्याला हिंदी आले होते. पण तो आता विसरला होता. त्याला जेथे जायचे होते ते गाव बाजूला असले तरी अगदी पालामडई पर्यंत त्याने मुद्दाम सोबत केली. तो म्हणाला—'आम्ही नेहमी या गावात जात नाही. क्वचित यात्राप्रसंगी जातो. या रस्त्याने पुढे जा' रस्ता गावाला वळसा घालून गेला होता. घरे मोठी होती. पण माणसे कुणी दिसत नव्हती. एक बाई दिसली. तिला विचारलं, 'विश्वनाथ शास्त्री आहेत' ? तिने रस्त्याकडे बोट दाखवून म्हटले 'पो'. त्या गावात कुणीतरी नवखा शिरल्याची बातमी लवकरच पसरली. कारण दोन-तीन पोरे व एक म्हातारा गावात शिरताच समोर आले. पोरे खेळत होती. गाव म्हणजे मधून एकच रस्ता व दोन्ही बाजूला १०–२० घरे एवढेच लहानसे होते. गावाच्या तीन बाजूला शेत जमीन व एका बाजूला ताम्रपर्णी नदीचा प्रवाह वाहत होता. घरापैकी एक दोन घरे पडली होती व कांही पडण्याची वाट पाहत होती. अनेक घरांना भली मोठी कुलपे लागली होती. विश्वनाथ शास्त्रींच्या नावाचा जप करीत निघालो. एक पौढ गृहस्थ समोर आले. त्यांना इंग्रजीतून विचारले. त्यानी विश्वनाथ शास्त्रींचे घर दाखविले. बाया मंडळी व मुले घरात होती. एक मुलगा समोर आला. त्याने विश्वनाथ शास्त्री येत असल्याचे सांगितले. हे गृहस्थ नीळकंठांच्या समाधिस्थानाचे पुजारी पुरोहित होते. त्या गावातले सर्वच नीळकठवंशीय म्हणवत असल्यामुळे हेहि त्यापैकीच एक होते. ते आल्यावर त्यांनी विचारपूस केली. नाव शास्त्री असल्यामुळे संस्कृत येत असावे असे वाटून संस्कृतातून आरंभ केला. ते बोलेनात म्हणून विचारले. ते म्हणाले, 'संस्कृत बोलता येत नाहीत. ग्रंथम् येतात. थोडे संस्कृत येते.' कांही संस्कृत शब्द ते उच्चारत होते. पण त्यांना बोलणे जमत नसावे. मग त्यांच्या मुलाने दुभाष्याचे काम केले. प्रश्न इंग्रजीत विचारला म्हणजे मुलगा तामिळमध्ये वडलांना सांगावयाचा. मुलाला संस्कृत येत नव्हते. तो विज्ञान शाखेचा विद्यार्थी होता. प्रथम मी कोण, उद्देश काय यावद्दल तपासणी झाली. इतक्यात भले मोठे भांडे भरून कॉफी बाहेर आली. मद्रासी कॉफीचा कडवटपणा इतरे जनांच्या कायम लक्षात राहील असा असतो. संस्कृत बोलणारा व तामीळ न येणारा कुणीतरी नवखा तरूण गावात आला ही वार्ता पसरून माझ्या संबंधीचे कुतुहल वाटून आणखी दोघे तिघे (बहुधा पुरुषाची हजर संख्या तेवढीच असावी.) जमले. येथून 'हालास्य महात्म्यम्'ची दुर्मिळ प्रत परत करण्याच्या अटीवर मिळाली. 'शिवलीलार्णव काव्य' या माहात्म्यावर आधारलेले म्हणत पण त्याची छापील प्रत मिळाली नव्हती. येथे नीलकंठाविषयी त्यांचे गोत्र भारद्वाज, द्राह्यायण सूत्र व ते सामवेदी अस-

त्याची निश्चित माहिती लाभली. इतक्यात श्री सुंदरम् व श्री नटराजन् हे दोघेहि तिरुनेरवेल्लीवरून मोटारने आले. मग चर्चा थोडीशी रंगली. पण ऐतिहासिक ताम्रशासन किंवा एखादा पुरालेख असा पुरावा मिळाला नाही. त्या दोघांना पाहून श्री विश्वनाथ शास्त्रींना मात्र बराच धीर आला. सायंकाळ झाली. दर्शनासाठी त्यांच्या सांगण्यावरून मी प्रथेप्रमाणे कपडे काढले. जवळच ताम्रपर्णीचा प्रसन्न प्रवाह दुथडी भरून वाहत होता. हातपाय धुण्यासाठी तिकडे गेलो. लहानसा काळ्या दगडाचा घाट आपल्या स्वरूपावरून आपण फार दिवसांपासून तेथे असल्याचे सुचवीत होता. घाटाजवळ खूप उंच वाढलेली दोन झाडे स्थान प्राचीन असल्याची साक्ष देत होती नारळीची झाडे मोठ्या डौलाने त्या घाटावरून छांटेखानी गावांवर चौऱ्या ढाळीत होती. त्या ठिकाणचे उन्मुक्त वारे म्हणजे खरोखर एक देणगी होती. वातावरणातल्या नीरव शांततेत फक्त वाऱ्याचाच आवाज कानी येत होता. बाकी सर्व शांत निवात होते. महाकवि नीलकंठांनी संन्यासाश्रम घेतल्यावर राहण्यासाठी निवडलेले ते ठिकाण त्यांच्या रसज्ञतेची साक्ष अजून देत आहे.

एक आख्यायिका

बोलताना श्री सुंदरम् यांनी या गावा विषयी एक आठवण सांगितली. ते म्हणाले श्री नीलकंठ उत्तर आयुष्यात जेव्हा तिरुमल राजाला सोडून जावयास निघाले तेव्हा तिरुमलाला वाईट वाटले. तो म्हणाला –'महाराज, मी आपणासाठी काय करू.' नीलकंठ म्हणाले, 'मला कांही नको. मी जेथे राहीन तेथे केवळ कोंबड्यांचा शब्द माझ्या कानावर येऊ नये.' आश्चर्य हे की, आजहि त्या नीळकंठांच्या स्थानी कोंबडा आरवत नाही. कारण कोंबडे पाळणारा शेतकरी वर्ग तेथून अर्धा ते पाऊण मैल अंतरावर राहतो. गावात नीळकंठांच्या संबंधितांशिवाय अन्य कोणीहि राहत नाही. एव्हढेच नव्हे तर आजुबाजूची शेतजमीनहि अद्याप त्यांच्या मालकीची आहे. आपले कर्मठ जीवन निर्बाधपणे घालविता यावे यासाठी त्यांनी केलेली मागणी चातुर्याची व मार्मिक होती यात शंका नाही· अजूनहि इतर लोक तेथे सहसा जात नाहीत याची साक्ष सुरवातीच्या वाटाड्याने दिली होती.

नीलकंठ समुद्रन्

हात पाय धुतल्यावर सायंसंध्या झाली. नंतर प्रथेप्रमाणे आम्ही सर्वजण भस्म विलेपन करून मंगलांबिकेच्या मंदिरात गेलो. ही मंगलांबिका व जवळचे शिवलिंग यांची नीलकंठांनी स्वतः स्थापना केली, व त्यांची ते स्वतः पूजा करीत अशी माहिती कळाली. देवळाची रचना अगदी जुनी, साधी व ठेंगणी वाटली.

तेथून श्री शंकराच्या पूजेपाशी गेलो. नंतर श्री नीलकंठांच्या समाधि स्थानाजवळ आलो. श्री नीलकंठ आता शिवलिंगाच्या रूपाने विद्यमान आहेत. त्यावरचे मंदिर नीलकंठांच्या वंशजांनी नव्याने बांधले आहे. देवीच्या नवरात्रात येथे मोठा उत्सव होतो. बाकी नीलकंठांची पुण्यतिथि वगैरे सर्वांचा येथील वंशजांना विसर पडला आहे. इतर जागृति नवी दिसते. हे ठिकाण नीलकंठ समुद्रम् म्हणून ओळखले जाते.

कोडत्तूर

येथूनच ताम्रपर्णीच्या वरच्या भागाला ८।९ मैल दूर कोडत्तूर हे अग्रहाराचे गाव असून तेथेहि नीलकंठांचे वंशज राहत असल्याचे समजले. नीलकंठांना श्री अप्पय्य दीक्षिताकडून मिळालेले बाणलिंग व देवीमाहात्म्य अजून त्यांच्याजवळ सुरक्षित असल्याचे समजले. पण तेथे जाण्याचा उपाय हस्तगत न झाल्यामुळे प्रत्यक्ष पाहता आले नाही. त्या दिवशी नीलकंठ समुद्रम मध्ये आलेल्या दोघांहि नीलकंठांच्या भाविक वंशजांनी भक्तिभावाने पूजा, रुद्राभिषेक पार पाडली. रात्री भस्म, कुंकुमाच्या प्रसादाने पावन होऊन आम्ही निघालो. मोटार असल्यामुळे परत जाणे सोयीचे झाले. स्टेशनजवळ त्यांनी मला निरोप दिला व ते पुढे निघून गेले.

पराशक्तीचे अवतार

श्री नीलकंठ दीक्षित हे पराशक्तीचे अवतार असल्याचा एक समज रूढ आहे. श्री अप्पय्य दीक्षितांना श्री शंकराचे अवतार समजत. त्यासंबंधीची एक गमतीची आख्यायिका प्रथम श्री महालिंगशास्त्री यांनी उल्लेखिली होती. तिची पुष्टि पालामडई येथे झाली. दीक्षितांचा वंशविस्तार हा फार मोठा आहे. अप्पय्य दीक्षितांचे सख्खे बंधु आच्चा दीक्षित होते. त्याच्या शाखेत नीलकंठ जन्मले. अप्पय्या दीक्षितांच्या शाखेचा विस्तार निराळा आहे. त्या शाखेत जन्मलेल्या लोकांपैकी एक म्हणजे सध्याचे श्री महालिंगशास्त्री होत. श्री अप्पय्य दीक्षित हे शिवाचे अवतार व शिवभक्त म्हणजे कडकडीत वैराग्याची मूर्ति. त्यांच्या शाखेवर सरस्वती कटाक्ष व नीलकण्ठ हे पराशक्तीचे अवतार व श्री मीनाक्षीचे भक्त असून त्यांच्या शाखेवर लक्ष्मीचा कटाक्ष असल्याचे समजले जाते. आज त्याचे एक प्रत्यंतर म्हणजे अप्पय्य दीक्षितांच्या शाखेत विद्येची उपासना अव्याहत टिकवून ठेवणारी पण लक्ष्मीच्या कृपाकटाक्षापासून काहीशी वंचित अशी अनेक मंडळी आढळते. पण नीलकंठांच्या शाखेतले बहुतेक सर्व वंशज हे उच्च पदस्थ असून लक्ष्मी त्यांच्याकडे नांदत आहे. माझा स्वतःचाहि अनुभव असाच आहे व नीलकंठाच्या शाखेतले श्री. पी. एस्. कृष्णन् यांनीहि बोलण्याच्या ओघात नागपूरला

असे सांगितले. (आपल्याकडे घराण्यांचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करून कुल वृत्तांत लिहिण्याची पद्धत अजून विशेष सुरू झाली नाही. पश्चिम महाराष्ट्रात तसा प्रयत्न करण्यात आला आहे. अप्पय्य दीक्षिताच्या घराण्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आल्यास कितीतरी उद्बोधक माहिती सापडण्याचा संभव आहे.) दुर्दैवाची गोष्ट अशी की या शाखेत संस्कृत विद्येचा व्यासंग मात्र फारसा कोणी करीत नाही. एकाला त्याविषयी विचारले तेव्हा तो नुसता हसला.

पुनश्च मदुरा

तेथून मदुरेला परत आलो. यावेळी रामेश्वर संस्थानाच्या संस्कृत पाठशालेचे प्रधानाध्यापक श्रीकांत शास्त्री यांची भेट घेतली. थोडे बोलणे झाले. नंतर तेथून रामेश्वरास जाऊन तंजावरला परतलो. दीक्षित मंडळी ही शैव असल्यामुळे शैवस्थान साक्षात् पाहिल्याशिवाय शिवभक्त व त्याच्या उत्कट भक्तीची काहीहि कल्पना येणार नाही. त्याशिवाय श्री नीलकंठांनी ठिकठिकाणी काढलेले उद्गार व शिवालयाची वर्णने याचे स्वारस्य कळणे दुरापास्त आहे. मदुरेच्या श्रीसुंदरेश्वर मीनाक्षीच्या अद्भुत मंदिराबरोबर रामेश्वरचे अतिप्रचंड शिवालय, कांचीचे एकाम्बरेश्वराचे रमणीय मंदिर ही मंदिरे पाहण्यासारखी आहेत. उत्तरेत राहणाऱ्या व्यक्तीला दक्षिणेतल्या मंदिराच्या भव्यतेची व अद्भुत शिल्पाची कल्पना करणे केवळ अशक्य आहे. लहान लहान गावातूनहि एवढी प्रचंड मंदिरे आहेत की उत्तरेतील भव्यतम मंदिरेहि त्यासमोर पारवळ वाटावी! त्यादृष्टीने श्रीकाली व कालाहस्ती येथील शिवमंदिरे प्रेक्षणीय आहेत.

तंजावरहून परत

प्रवासात गोळा केलेल्या माहितीच्या अनुरोधाने पुन्हा कांही पुस्तकांचा सरस्वती महाल ग्रंथालयात शोध केला. तेथील काम पूर्ण झाल्यावर तंजावरच्या मंडळींचा निरोप घेऊन मद्रासच्या दिशेने निघालो. अप्पय्य दीक्षिताच्या संबंधी माहिती असणाऱ्या लोकांत कांचीपीठाच्या शंकराचार्यांचे नाव ऐकून माहीत झाले. कांचीकामकोटिपीठ हे आद्य शंकराचार्यांनी स्थापिलेल्या पीठांपैकी एक असून त्या पीठावर ब्रह्मचर्यातून संन्यासाश्रम घेणाऱ्या व्यक्तीनी पीठाधीश व्हावे असा संकेत असल्याचे समजले. त्याप्रमाणे सध्याचे आचार्य प. पू. जगद्गुरु श्री चन्द्रशेखर सरस्वती आपली तपश्चर्या, समाजहितदृष्टि, विद्वत्ता व बहुभाषाज्ञता यामुळे जगद्विख्यात आहेत. श्री पॉल ब्रंटन प्रभृति युरोपीय लेखकांनी त्यांच्याविषयी गौरवोद्गार काढले आहेत. त्यांनी पुढाकार घेऊन श्री अप्पय्य दीक्षिताचे स्थान जे अडयप्पलम् तेथ श्री अप्पय्यांनी स्थापन केलेल्या नीलकंठेश्वर या शिवमंदिराचा जीर्णोद्धार केला. त्या सुमारास त्यांनी केलेले भाषण मुद्रित होऊन प्रकाशित होणाऱ्या

सुप्रसिद्ध धर्मयुग साप्ताहिकाच्या अंकात मी वाचले होते. त्यांना भेटावे ही इच्छा बऱ्याच दिवसापासून मनात वसत होती. परतु, श्री आचार्य ३० वर्षापेक्षा अधिक वर्षापासून विशेषत: तामिलनाड मध्ये सर्वदूर पदयात्रा करीत असतात असे कानावर आल्यामुळे त्यांच्या भेटीसाठी काय करावे हे सुचत नव्हते. चौकशी करता आचार्य सध्या कांचीला आहेत असे कळाल्यामुळे तंजावरहून चिंगलपेठ मार्गाने कांचीला गेलो. त्यावेळी आचार्यांचा मुक्काम कांचीपासून सुमारे पाच मैलावर अंबी या खेड्यावर असल्याचे समजले. कांचीला उतरावे कोठे हा विचार आला परतु अनिकेत आद्य शंकराचार्यांनी मठस्थापना ही समाजासाठी केली व आचार्यपीठ तर प्रत्येक भारतीयाला आपले वाटावे असे स्थान, त्यामुळे आचार्य मठात जाऊन पाहू या असा विचार करून सरळ सामान घेऊन तेथे गेलो.

कांचीचा मठ

हा मठ चांगला विशाल व सोयीस्कर आहे. सध्याच्या पीठाधीशांनी आद्य श्री शंकराचार्य व त्याचे ४ सच्छिष्य यांच्या संगमरवरी मूर्ति तेथे नव्याने स्थापन केल्या आहेत. त्या स्थानाची भव्यता व वातावरण याचा एक अनुकूल परिणाम मनावर होतो. अनुमानाप्रमाणे व्यवस्थापकानी जागा दिली. मठातल्या द वाखान्याच्या सचालक वैद्यराजांचे स्निग्ध, आतिथ्यपूर्ण व मोकळेपणाचे वागणे सदैव लक्षात राहील असे हाते.

रात्री मठात थांबलो. दुसरे दिवशी सकाळी उठून सामान मठात ठेवले; व स्नान वगैरे आटोपून स्वामीजींचे दर्शन घ्यावे म्हणून निघालो. ते दिवस वरदराज स्वामींच्या रथयात्रेचे होते. रथयात्रेमुळे प्रचंड गर्दी होती. दोन मोटारी चुकल्या. तिसरी मिळाली सुमारे १०॥ ते ११ च्या सुमारास अबी या खेड्यात पोहचलो. वाटेत एका कलकत्त्याच्या गृहस्थाची गाठ पडली. तोहि आचार्यांच्या दर्शनासाठी निघाला होता. आचार्य त्यावेळी पूजेत होते.

शिष्यस्वामींची भेट

तेव्हा प्रथम शिष्यस्वामींचे दर्शन घ्यावे असे या सद्गृहस्थांचे मत पडले. तेथल्या प्रथप्रमाणे आम्ही कपडे काढले व भस्म लावले. एक रुपया देऊन अर्चना सामग्री घेतली. ही सामग्री म्हणजे २ नारळ, ५–७ केळी, पाने व सुपारी ठेवलेला एक परडी. मठात एक रुपया भरला की हे साहित्य मिळते. तिला येथे अर्चना-प्लेट म्हणतात. रिक्त-हस्ताने गुरूजनांना भेटू नये असा संकेत आहे. त्याप्रमाणे हे साहित्य घेऊन श्री शिष्यस्वामीकडे आम्ही गेलो. आत काही भक्तमंडळी दर्शनासाठी आली होती म्हणून बाहेर दर्शनार्थीच्या रांगेत आम्ही आपला क्रम लावला. आमचा क्रमांक येताच आम्ही आत गेलो. शिष्यस्वामी एका

व्याघ्राजिनावर बसले होते. सुमारे ३०–३५ च्या वयाचे ते वाटत होते. त्यांच्या समोर एक लहान लाकडी चौरंगाच्या आकाराचा बैठा टेबल होता जवळ काही जाडजूड ग्रंथ होते. समोर भस्म, कुंकू व अक्षता मरून लाकडी तबके ठे ली होती. खोली लहान होती. समोर कांही मंडळी अंग चोरून उभी होती. माझ्या बरो-बरीच्या गृहस्थाने ॐ नमो नारायणाय असे म्हणून तीनदा आडवा साष्टांग प्रणिपात केला. मागोमाग मीहि त्याचे अनुकरण केले. स्वामीजींनी क्रमशः माझे नाव विचारले. बोलावे कोणत्या भाषेत असा क्षणभर विचार पडला. कारण सर्वजण तामीळं मध्ये बोलत. श्री शंकराचार्यांच्या स्थानी संस्कृत वापरायचे नाही तर कुठे असा विचार करून संस्कृतातून आपले नाव सांगितले. त्याचा थोडा परिणाम झाला असे वाटले स्वामींनी मला थांबवून बसावयास सांगितले. त्यांनी दक्षि-णेत येण्याच्या उद्देशाविषयी विचारपूस केली. मीहि सर्व माहिती सांगितली, व धर्मयुग पत्रात प्रसिद्ध झालेल्या ज्येष्ठ स्वामीजींच्या भाषणावरून श्री नीळकंठां-विषयी कांही माहिती मिळेल या अपेक्षेने मी आलो आहे असे म्हणालो त्यांनी नीलकंठाच्या ग्रंथाविषयी माहिती विचारली. मला सापडलेल्या माहितीत कित्येक गोष्टी नव्या होत्या. तेव्हा ज्येष्ठ स्वामीजींची अवश्य भेट घ्यावी असे ते म्हणाले व मठाच्या एका कारभारी अधिकाऱ्यास माझी आचार्यांशी भेट करून देण्यास सांगितले.

आचार्यांचे दर्शन

तेथून निघून ज्येष्ठ आचार्य जेथे पूजा करीत होते तेथे आलो. देवगृहाची दारे बंद होती. त्या स्थानासमोर मोठा मंडप टाकला होता. खाली जमिनीवर मऊ वाळू पसरली होती. तिच्यावर दर्शनार्थी लोक घोळके करून बसले होते. त्यात मीहि जाऊन बसलो. इतक्यात दारे उघडली. पूजा आटोपली. आरती झाली. मंगलदर्शन झाले. बाहेर दर्शनार्थी भक्त आचार्यांची वाट पाहत उभे होते. आचार्य बाहेर आले. त्यांच्या अंगावरील वस्त्रे भगवी होती. गळ्यात जाड स्फटिक व रुद्राक्षाच्या माळा होत्या. डोक्यावरहि रुद्राक्षमाळा धारण केल्या होत्या. हातात दंड होता. भस्मचर्चित आचार्यांची मूर्ति कृश, ठेंगणी व गौर होती. डोळे विशाल व तेजस्वी होते. परंतु हे तेज दाहक वाटत नव्हते. त्यात सौम्यपणा होता. आचार्यांच्या करुण दृष्टीचा प्रभाव इतरांना जाणवत होता. त्यात एक गूढ आकर्षण होते असे वाटून गेले आचार्य समोर येताच दर्शनाची अहमहमिका सुरू झाली. बाजूला एका कोपऱ्यात मी उभा होतो. दर्शनार्थी समोर जात, अर्चनेची परडी समोर ठेवीत दुरून प्रणाम करीत व आचार्यांनी प्रसन्न दृष्टीने पाहिले की मागे जात. त्यांचा वरदहस्त लोकांचे प्रणाम स्वीकारण्या-साठी सारखा हलत होता. तामिळनाडमध्ये आचार्यांविषयी अतोनात आदर.

त्यांना लोक फिरता परमेश्वर Moving God म्हणून संबोधतात. त्यांचा मुक्काम असेल तेथे लोकांची रीघ असते. शेवटी मीहि पुढे जाऊन परडी ठेवली व प्रणाम केला. बोलण्याची सोय नव्हती. सामान्यत: आचार्य बोलले नाहीत. लग्नप्रसंगी आचार्यांकडून मंगलाक्षता व मंगळसूत्र घेण्याची एक प्रथा तामिळनाडमध्ये रूढ असावी असे दिसले. लोक मंगळसूत्रासह परडी आचार्यांसमोर ठेवीत, विवाहाची वार्ता ऐकवीत व आशीर्वाद मागत. त्याप्रसंगी कांही शब्द बोलत. ते संस्कृत असावे असा माझा समज झाला. त्यानंतर लगेच आचार्य आत गेले. पुन्हा नंतरच्या पूजेची सिद्धता करण्यासाठी त्यांना स्नानादि आटोपावयाचे होते. यानंतर बाणलिंगावर दुधाने सहस्रधाराभिषेक असतो. आचार्यांच्या स्थानी अशा चार पूजा रोज चालत असल्याचे कळले. चंद्रमौलीश्वराची ही पूजा तीन वाजेपर्यंत चालणार होती त्यानंतर तीर्थवितरण होते. इतक्यात मठाचे अधिकारी आले. व त्यांनी महाप्रसाद ग्रहण करावयास चलण्याची सूचना केली. १२–१ चा सुमार असेल. नाही म्हणवेना. आचार्यांच्या दर्शनासाठी येणारा कुणीहि उपाशी राहत नाही. त्यांच्या बरोबर प्रसाद ग्रहण करून पुन्हा आचार्यांची वाट पाहू लागलो.

अभिषेक आरती झाली. आचार्यांनी स्वहस्ते तीर्थ वितरण केले. तीर्थ ते साक्षात देत नसत. एका लाकडी लांब पळीने तीर्थ घेत, ते जवळ बसलेल्या गृहस्थाच्या हातात असलेल्या सोन्याच्या वाटीत टाकत व मग ते समोरच्या माणसाला दिले जाई. यावेळी कांही मंडळींशी बोलत होते. त्यानंतर ते उठून आत गेले. यापुढे स्वामीजींचा भिक्षाग्रहणाचा कार्यक्रम होता. यावेळी ते थोडा लाह्यांचा आहार घेत असे समजले. त्यानंतर कांही वेळ विश्रांति अशी माहिती मिळाली. आचार्य कांहीतरी बोलतील व विचारतील ही इच्छा अजून फलद्रूप झाली नव्हती. सकाळी निघून आचार्यांचे दर्शन घ्यावे, बोलावे व परत जावे अशी इच्छा होती. पण आचार्यांसारख्या विभूतीपुढे इतरांच्या इच्छा त्या काय होत त्या दिवशीचा योग असा की आचार्य सायंकाळी ६ पर्यंत बाहेरच आले नाहीत. संध्याकाळी पुन्हा दर्शनेच्छूंची दाटी झाली. त्यात भारतीय विद्याभवनाचे श्रीवेंकटेश दीक्षितार, दिल्लीचे संस्कृत विभागातील ज्यूनिअर ऑफिसर श्रीस्वामीनाथन्, मुंबईचे कुणी अॅडव्होकेट असे अनेक मंडळी होती. मी उत्तरेकडचा व संस्कृतभाषी म्हणून कुतूहलाचा विषय होतो. त्यामुळे अनेकांच्या ओळखी सहज झाल्या. संध्याकाळी ६। च्या सुमारास निरोप आला की आचार्यांचे दर्शन होऊ शकते.

आचार्यांचे पुनर्दर्शन

घराच्या मागच्या बाजूस ताटयांच्या कंपाउंडाशेजारी एक खाट उलटी टाकलेली होती. तिला एक लाकडी पाटी टेकवून स्वामीजी पाय लांबवून बसले

होतं. आजुबाजूची जागा शेतजमीन असून ढेकळं उकरलेली पडली होती. दर्शनार्थ मंडळी क्रमशः पुढे गेली. लहान मोठे सर्वजण प्रथेप्रमाणे कपडे काढून व भस्म लावून आले होते. बायका मुलासह त्यांनी अंगाला धूळ लागेल वा खडे बोचतील याची चिंता न करता नमो नारायणाय म्हणून साष्टांग प्रणिपात केले. ते पाहून त्यांच्या भावनेबद्दल मी मनातल्या मनात आश्चर्य करीत होतो. सगळ्यांचे आटोपल्यावर मीहि नमस्कार करून कोपऱ्यात जाऊन बसलो. आचार्यांचे तमीळ बोलणे यावेळी ऐकू आले. थोड्या वेळानंतर गजसेवा व संध्यावंदनाची वेळ झाली. आचार्य उठले, चंद्रमौलीश्वरा समोर एक हत्ती सोंडेत चवरी धरून वारा घालीत उभा होता. त्याच्या कपाळी भस्माचा टिळा लावला होता. आचार्य बाजूला उभे राहिले. स्तोत्रपाठ चालला होता. दृश्य चांगले होते. शेवटी हत्तीने विशिष्ट चीत्कार करून प्रणाम केला. नंतर आचार्यांना वंदन केले. नैवेद्य घेतला व तो निघून गेला. आचार्य आत गेले. मीहि तेथून निघालो. थोडासा अंधार पडू लागला होता. इतक्यात आचार्यासारखी एक व्यक्ति मला दिसली. मी नमस्कार केला. वर पाहतो तो शिष्य स्वामी उभे होते. त्यांनी आचार्यांच्या भेटीविषयी विचारले. बोलणे झाले नाही असे कळाल्यामुळे त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या एका वृद्ध संन्याशांना माझ्याबद्दल आचार्यांना सांगण्यासाठी त्यांनी पुन्हा सांगितले. मद्रासच्या हिंदु हायस्कुलातले एक प्रधान संस्कृत पंडित सुटीत आचार्यांजवळ होते. त्यांची भेट झाली ते म्हणाले-'यापुढे आचार्य दिसले की संकोच सोडून खुशाल नांव व काम सांगा.' आता संधि सापडली की हिय्या करायचाच या विचाराने वाट पाहू लागलो. पुन्हा दर्शनेच्छु वाढू लागले होते. ७॥-८ चा सुमार असेल, आचार्य संध्यावंदन आटोपून बाहेर आले व घरातील एका पडवीत बसले होते. बातमी बाहेर येताच पुन्हा गर्दी झाली. इतक्यात शिष्य स्वामींनी ज्या संन्याशी वृद्ध गृहस्थांना माझेबद्दल आचार्यांना सांगण्यास सांगितले होते ते आचार्यांच्या जवळ पाहून मी पुढे सरकलो. नमस्कार करून इतराप्रमाणे पटकन् आपले नाव संस्कृतातून सांगितले. त्याच संधीला त्या संन्याशी गृहस्थांनी माझी माहिती आचार्यांना सांगितली. तमीळ भाषेच्या गलक्यात संस्कृत शब्द उच्चारला जाताच एक प्रकारचे नावीन्य निर्माण झाले. मीहि माझ्या कामाचे स्वरूप थोडक्यात सांगितले. आचार्य क्षणैक थांबले. पण कांही बोलले नाहीत. सर्वांना 'पो' म्हणून त्यांनी निरोप दिला; व ते उठून गेले. पुन्हा थोडा निराश होऊनच मी बाहेर आलो. यानंतर रात्रीच्या आरती पूजेसाठी सर्वजण जमले. रात्रीची पूजा शिष्य स्वामींनी केली. नंतर आचार्य आत गेले ते बाहेर आलेच नाहीत.

रात्रीचा मुक्काम

रात्री ८॥-९ चा सुमार झाला होता. मजजवळ एक कागदपत्राची पिशवी व टॉवेल सोडला तर कोणतंहि सामान नव्हते. इतक्यात तेथील एक आचार्यभक्त

मद्रासचे शास्त्री जवळ आले व त्यांनी भेटीबद्दल विचारले. मी त्यांना घडलेला वृत्तांत सांगितला. त्यांचे म्हणणे पडले की आचार्य कोणत्याहि हेतूने आपल्याकडे येणाऱ्यास विमुख पाठवीत नाहीत. तुमचे म्हणणे त्यांच्या ध्यानी आले असावे. आजची रात्र थांबून पाहा. आचार्यांशी बोलण्याची उत्सुकता मला होती. पाहूया एकदा पुन्हा प्रयत्न करून. मी थांबावयाचे ठरविले. परंतु, झोपायचे कसे. जवळ कांहीच नाही. कांही भक्त सरळ तेथे घरासमोरील मंडपात पसरलेल्या खुल्या वाळूवर आडवे झाले होते. मीहि आपली व्यवस्था एका घराच्या ओट्याच्या कडस खाली टावेल पसरून केली. टावेलचा असा उपयोग होतो व करावा लागेल ही गोष्ट ध्यानी मनीहि नव्हती.

पहाटेची भेट

रात्री ३–३॥ चा सुमार असेल. कुणीतरी हाक मारली म्हणून जाग आली. पाहतो तो मद्रासचे स्वामीजींचे एक संस्कृतज्ञ शिष्य जवळ उभे होते. ते म्हणाले 'यावेळी आचार्यांची भेट होऊ शकते'. मी विचारले–'मग यावेळी स्नान वगैरे करावे लागेल काय? त्यांनी सांगितले–'ते आवश्यक नाही, चला.' मी लगेच उठलो व त्यांच्या मागोमाग गेलो. स्वामीजी एका लहानशा झोपडीत पूर्वी प्रमाणे उलट्या खाटेवर लाकडी पाटीला टेकून बसले होते. समोर कुणीतरी एक दोघे प्रौढ पुरुष भक्त आचार्यांशी बोलत होते. कोपऱ्यात एक मोठी विजेरी (टॉर्च) उजळून ठेवली होती. बाहेर काळोख होता. मी गेलो व पद्धतीप्रमाणे नमस्कार केला व नांव सांगितले. आचार्यांनी मला बसावयास सांगितले व इतर मंडळीशी थोडे बोलून निरोप दिला. आचार्य सुमारे १४ भाषा जाणतात हे मी ऐकले होते. संस्कृतवर तर त्यांचा विशेष अधिकार असे म्हणत. पण आचार्यांनी सुरवात केली ती तामीळमधून. अर्थातच त्यांचे भाषणाचा अनुवाद त्यांचे जवळ असलेले एक शास्त्री संस्कृतातून करीत. माझ्या संस्कृत भाषणाचा आशय तामीळमधून ते अनुवादक स्वामीजींना सांगत; व त्यांचे तामीळ मला संस्कृत मधून ऐकवीत. स्वामीजींना ऐकण्याच्या दृष्टीने वयोमानाप्रमाणे अडचण जाणवत असावी असे मला वाटत होते. ते अगदी शांत व संथपणे बोलत. मधूनच त्यांच्या बोलण्यात एक प्रकारची चमक वाटे. प्रसन्नता व खेळकरपणाहि होता. सुरवातीला त्यांनी नाव विचारले. मी नाव सांगितले. त्यांनी पूर्ण नाव विचारले तेव्हा संस्कृतच्या अमुक कुलजन्मा, अमुकसुतः, अमुकशर्मा असे म्हणालो. स्वामीजी किंचित् हसून म्हणाले ही पद्धत म्हणजे 'चैनाजिन कुशोत्तरम्' अशी आहे. नंतर त्यांनी विचारले 'वेदशिक्षण झाले काय ?' मी म्हणालो, 'थोडेसे झाले.' 'कुणाजवळ' 'श्री रामभाऊ देशकर गुरुजीजवळ.' 'वडील काय करतात'–'पौरोहित्य.' 'वेद त्यांच्याजवळ कां शकला नाही.' मी सांगितले की 'प्राथमिक शिक्षण आटोपल्यानंतर संस्कृत–

शिक्षणासाठी नागपूरला भोसला वेदशास्त्र महाविद्यालयात ठेवण्यात आले. त्यामुळे त्यांच्याकडे शिकण्याची संधि लाभली नाही.' 'तेथे काय शिकला.' 'साहित्य व्याकरण.' 'गुरुजी कोण' मी श्री पांडे गुरुजी व श्री सहस्त्रबुद्धे अशी नावे सांगितली. 'पुढे कुठे शिकलात' मी म्हणालो– काशीला सांग वेद विद्यालयांत श्री हरिराम शास्त्री शुक्लांच्या जवळ.' आचार्यांनी विचारले–'कधी शांकर पाठशाळेत शिकलात काय ?' मी नकार दर्शविला तेव्हा त्यांनी हसून विचारले–'काशीला संकेश्वर पाठशाळेचा कधी संबंध आला काय' मी थोडा चूप राहिलो. वस्तुत: त्या शाळेचा संबंध माझ्याशी आला नव्हता. परंतु ती शाळा सांगवेद विद्यालयात समाविष्ट होती व त्या शाळेशी आमचे गुरुजी श्री हरिरामशास्त्री शुक्लांचा नाममात्र संबंधहि होता. एकदा स्याद्वाद महाविद्यालयातील संस्कृत वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्यासाठी माझे नाव सांगवेद विद्यालयाचा प्रतिनिधि म्हणून दुसऱ्याची निवड झाल्यामुळे संकेश्वर शांकर पाठशाळेचे प्रतिनिधि म्हणून पाठविण्यात आल्याची एक आठवण झाली. नंतर, आचार्यांनी विचारले–'तुम्हाला खणंग हे नाव माहीत आहे काय ?' श्री रामचंद्रशास्त्री खणंग हे न्याय मीमांसेचे प्रसिद्ध विद्वान आमच्या गुरुजींचे बालमित्र. मी हो म्हणालो त्यांनी विचारले, खणंगांनी तुम्हाला कधी शिकविले होते काय ? मला त्यांनी शिकविल्याचे खरोखरीच स्मरण नव्हते. जवळपास १७ वर्षांचा काळ लोटलेला, मी नाही म्हणालो. त्यांनी पुन्हा जोर देऊन विचारले. 'एखादा दिवस तरी, कधी गुरुजी उपस्थित नसताना वगैरे.' अंधुक अशी आठवण मनात चमकली, कधी तरी एकदा त्यांनी पाठ घेतला असावा कांही पुरेसे आठवत नव्हते. ते किंचित् हसले. मी पुष्कळ काळ लोटला आहे एवढेच उत्तर दिले.

पुढे त्यांनी विचारले, काल तुमची जयेंद्र सरस्वतीशी भेट झाली होती काय ? मी म्हणालो माझी ज्यांच्याशी भेट झाली त्यांत हे नाव कुणाचे असल्याचे माझ्या लक्षात नाही. इतक्यात अनुवादकाने विचारले, शिष्यस्वामीशी भेट झाली होती काय ? मी होकार दिला. स्वामीजींनी विचारले, 'बोलणे झाले काय, झाले असल्यास कोणत्या भाषेतून' मी म्हणालो, 'बोलणे संस्कृतातून झाले. स्वामीजींनी लगेच विचारले, त्यांच्या बोलण्यात काही अवद्ध (अशुद्ध) होते काय ?' मी थांबलो मठात भेटलेल्या सर्व मंडळीत शिष्यस्वामी सर्वात संस्कृत बरे बोलले होते. त्यात इतरांच्या तुलनेत जाणवणारे अशुद्ध प्रयोग आढळले नाहीत. पण अनभ्यासवशात थोडे इकडे तिकडे झाले नव्हते असे नव्हते. म्हणून मी किंचित् थांबून म्हणालो, त्यांच्यासारख्यांचे बोलणे आम्हाला गंगौघासारखे आहे. त्याकडे या दृष्टीने आम्ही पाहणे योग्य नव्हे' लगेच त्यांनी दुसरा प्रश्न टाकला, अनुवादकाच्या बोलण्यात कांही अवद्ध आहे काय ?' आता थोडा पेच पडला. खरे सांगावे

अनुक्रमणिका

तर त्या गृहस्थाला कदाचित् बरे वाटले नसते. दुसरे कांही सांगावे तर स्वामीजी जाणत होते. तेव्हा मी इतकेच म्हणालो, ते गृहस्थ चांगले बोलतात. त्याविषयी मी बोलावे हे बरे नव्हे. स्वामीजी हसून म्हणाले–'दोषज्ञत्व हे विद्वानाचे लक्षण आहे असे म्हणतात ना.' मी म्हणालो–'हो दोषज्ञ म्हणजे विद्वान खरा, पण दोषदर्शित्व हे पुरोभागित्व ठरू नये.

नंतर स्वामीजींनी गव्यूति शब्दाच्या व्युत्पत्तीविषयी विचारले. मी व्याकरणाच्या दृष्टीने उत्तर दिले. तो शब्द कसा प्रचारात आला असेल याचे भाषा शास्त्राच्या दृष्टीने त्यांनी विवेचन केले. नंतर त्यांनी विचारले–तामीळ समजते काय ? मी म्हणालो संस्कृतज्ञ माणसाचे तामीळ संस्कृत शब्दांचा भरणा ज्या प्रमाणात असेल त्या प्रमाणावरून अंदाजाने कळते. आशय समजतो, सर्व कळत नाही.' ते म्हणाले, 'श्री अप्पय दीक्षित व श्री नीलकंठ दीक्षित हीच भाषा वापरीत.' मी उत्तरलो–'म्हणूनच ती भाषा स्वतः ऐकावी यासाठी मी दक्षिणेत आलो आहे. येथून भाषण दीक्षिताकडे वळले. स्वामीजींनी विचारले–श्री नीलकंठांचे कोणते ग्रंथ वाचले आहेत.' मी नावे सांगितली. त्यानंतर त्यांच्या समकालीन कवी विषयी श्री कुप्पुस्वामी शास्त्रींच्या प्रस्तावनेचा उल्लेख त्यांनी केला. मी ती वाचल्याचे त्यांना सांगितले. या संदर्भात कुणाकुणाला भेटला ही चौकशी त्यांनी केली. मी श्री महालिंग शास्त्री प्रभृतींची नांवे सांगितली.

सध्या कोणत्या माहितीच्या शोधासाठी फिरता आहात असा त्यांचा प्रश्न होता. मी त्यांना श्री नीलकंठाचे अप्रसिद्ध ग्रंथ व विशेषतः श्री नीलकंठाच्या मंत्रित्वासंबंधी कांही ऐतिहासिक प्रमाण अथवा त्यांच्याविषयी अन्य कोणताहि अधिकृत उल्लेख यासाठी फिरत असल्याचे उत्तर दिले. स्वामीजी म्हणाले, आतापर्यंत जे ग्रंथ सापडले आहेत त्याहून अधिक ग्रंथ सापडण्याचा संभव दिसत नाही. ऐतिहासिक प्रमाणाविषयी त्यांनी मदुरेचे गॅझेटियर, टेलरचे Translation of old valuable Mss. ही पुस्तके वाचली किंवा काय या विषयी चौकशी केली. मला ही पुस्तके सापडली नव्हती. तेव्हा यांचा शोध कनिमरा लायब्ररी वा इतर लायब्ररीतून केला पाहिजे असे ते म्हणाले. मठातहि बघून घ्या असा सल्ला त्यांनी दिला.

त्यानंतर त्यांनी विचारले की–नीलकंठांच्या गुरुविषयी कांही माहिती आहे काय. मी त्यांना अप्पय्य दीक्षित, वेंकटेश्वरमखी व श्री गीर्वाण योगीन्द्र असे तिघे जण त्यांच्या गुरुत्वाचे मानकरी सापडतात असे उत्तर दिले. ते म्हणाले, यासंबंधी अंतर्गत प्रमाणांच्या आधारे कांही निष्कर्ष काढता येतो काय ? मी गीर्वाण योगीन्द्राचा व वेंकटेश्वर मखींचा गुरु म्हणून उल्लेख करणारी वचने सुचविली. आचार्य स्पष्टीकरण करताना म्हणाले की, 'अप्पय्य दीक्षिताविषयी

नीलकंठाचे उल्लेख सुचवितात की अप्पय्या पासून त्यांना साक्षात् शि.ष्याची संधि मिळाली नसावी. कारण नीलकंठ म्हणतात--

यंविष्म इति यद्ग्रन्थानभ्यस्यामोऽखिलानिति ।
यस्य शिष्याः स्म इति च श्लाघन्ते स्वं विपश्चितः ।।

पण वेंकटेश्वर मरवी विषयी त्यांनी लिहिले आहे–

वार्तिका भरण ग्रन्थ निर्माण व्यक्त नैपुणः ।
श्री वेंकटेश्वर मरवी शिष्ये मय्यनुकल्पते ।।
भान्ति यस्य पुरः शिष्याहस्तविन्यस्त पुस्तकाः ।
यत्सूक्ति जान्हवी पूरत्रासेनेव घृतप्लवाः ।।

येथे त्यांनी पुस्तके तालपत्र रचित असल्यामुळे त्यांचे प्लवाशी सादृश्य कसे जमते याचा उल्लेख केला.

गीर्वाण योगीन्द्रा विषयी मी श्लोकाचे शेवटचे दोन चरण सुचविले. पहिले दोन लगेच स्मरत नव्हते. स्वामीजी क्षणैक शांत झाले व त्यांनीं श्लोक पूर्ण केला.

अर्धे तनोरद्रिसुतात्मकोऽस्मीत्यद्भुता किं फल गादियूना ।
सर्वात्मना शैलसुतात्मकोयो गीर्वाण योगीन्द्रमुपास्महे तम् ।।

'या गीर्वाण योगीन्द्राचा प्रपंचस्तरसंग्रह ग्रंथ तुम्ही पाहिला काय' आचार्यांनी विचारले. मी होकार दिला. हा ग्रंथ सरस्वती महाल ग्रंथालयाने नुकताच छापून प्रसिद्ध केला आहे. त्यानी विचारले, 'तो वाचला आहे काय ?' मी नकार दर्शविला. मी फक्त प्रस्तावना वाचली होती. तो मंत्रशास्त्राचे विवेचन करणारा एक जाडजूड ग्रंथ आहे. आचार्यांनी विचारले 'प्रपंच सार' हा ग्रंथ केवढा आहे हे तुम्हांला माहीत आहे काय ? मला माहीत नव्हते. प्रपंचसार हा ग्रंथ मूळात ३०-३२ पानांचा श्री शंकराचार्यांनी लिहिला आहे व त्यावर संग्रह म्हणून अजस्त्र टीका श्री गीर्वाण योगीन्द्राने लिहिली ही गोष्ट आचार्यांनी सांगितली. त्यानंतर श्री नीलकंठांनी गीर्वाण योगीन्द्रावर लिहिलेल्या गुरुराजस्तवाचा मी उल्लेख केला. व ती प्रत अड्यार, ग्रंथालयात असल्याचे सांगितले. शेवटी आचार्य म्हणाले येथे येऊन तुम्ही रिक्त हस्ते परत जात आहात की कांही लाभ तुम्हाला झाला असे वाटते. मी म्हणालो, आपले दर्शन झाल्यानंतर मी रिक्त हस्ते परत जाईन हे कसे काय शक्य आहे. आपले आशीर्वाद मला हवे आहेत' तर आगमनं दर्शनमात्र फलम् झाले म्हणता तर, स्वामीजी उद्गारले. मी म्हणालो मला यशाची खात्री वाटते. स्वामीजी म्हणाले–तुम्ही तरुण आहात. बरीच खटपट करीत आहात. 'सिद्धिरस्तु' असे म्हणून त्यानी जवळ येण्यास सांगितले व

अनुक्रमणिका

स्वहस्ते मंगलाक्षता व श्रीफळ दिले. मी प्रसन्न मनाने वंदन केले. तेथून शिष्य-स्वामींकडे गलो. त्याना प्रणाम केला त्यांनीहि दिलेल्या मंत्राक्षता व मठाने प्रसिद्ध केलेले आनंद सागरस्तव मला दिले. सकाळ झाली होती. इतर मंडळीचा निरोप घेऊन अबीहून परत कांचीला आलो. मठात स्नानादि आटोपले. आयुर्वेदिक औषधालयाचे वैद्यराजांनी केलेले आतिथ्य साभार स्वीकारले व तेथून दुपारी मोटारने निघून मद्रासला आलो.

रेकॉर्ड ऑफिस

मद्रासला आल्यानंतर प्रथम मद्रासचे रेकॉर्ड ऑफिस बघावे. त्यातून तिरुमलनायकाच्या वेळचे कांही कागदपत्र वा टेलरने भाषांतरित केलेली जुनी हस्तलिखिते व त्यांचे भाषांतर मिळवावे अशी इच्छा होती. हे ऑफिस इगमोर स्टेशनजवळ आहे. आत गेल्यावर क्युरेटरांची भेट घेतली व त्याना येण्याचा हेतु सांगितला. परंतु त्यांनी टेलरच्या पुस्तकाचे प्रकाशनवर्ष सापडल्यास त्याचा शोध लागेल असे सांगितले. हे एक अजस्र कार्यालय आहे. इ. स. १६५० पासून पुढचे सर्व कागदपत्र व मद्रास इलाख्यात प्रसिद्ध झालेली पुस्तके याचा संग्रह जपून सांभाळण्याचे व टिकविण्याचे काम येथे सतत चालले असते. तिरुमलनायकाचा वृत्तांत १६५० पूर्वीचा असल्यामुळे तो रेकॉर्ड उपलब्ध होणार नाही असे ते म्हणाले. येथल्या पुस्तकांची व अभिलेखांची सूची प्रकाशन–वर्षानुक्रमे असल्याचे कळाले.

कनिमरा ग्रंथालय

तेथून निघून थेट सरकारी वस्तुसंग्रहालयाजवळील त्या अतिप्रचंड राष्ट्रीय ग्रंथालयात गेलो. येथले सहायक ग्रंथपाल हे स्वतः मदुरेचे राहणारे होते. मदुरेच्या तिरुमल नायकासंबंधी पृच्छा चालली आहे असे पाहून त्यांनी आत्मीयतेने त्यासंबंधीची कांही पुस्तके सुचविली व दाखविली. येथे सापडलेले महत्त्वाचे अतिशय प्राचीन पुस्तक म्हणजे मदुरेच्या गॅझेटियरची जुनी प्रत होय. अगदी जीर्ण स्वरूपात का होईना हा विशाल ग्रंथ येथे टिकवून ठेवण्यात आला आहे. तिरुमल नायकासंबंधी बरीच माहिती त्यात एकत्रित केलेली आढळली. त्यानंतर सापडलेले दुसरे महत्त्वाचे पुस्तक म्हणजे टेलरने केलेले जुन्या हस्तलिखितांचे भाषांतर होय. एकूण ३ भाग आहेत. त्यामध्ये मदुमण्डपात विष्णूची एकपादमूर्ति स्थापन करीत असता जो शैव वैष्णवाचा बखेडा निर्माण झाला होता त्यासंबंधीचा वृत्तांत मला हवा होता. श्री कुप्पुस्वामींनी त्याचा उल्लेख केला आहे. पण तो मला सापडू शकला नाही. पृष्ठ क्रमांकात चूक होती कि वा काय न कळे. ते विशाल काय भाग पूर्णपणे त्या अवकाशात शोधणे हे कठीण काम होते. संदर्भसूचीत

तिरुमल नायकाचा उल्लेख जेथे जेथे आढळला त्या त्या स्थळी शोध केला. पण नीलकंठासंबंधीचा उल्लेख हाताशी लागला नाही.

अड्यार ग्रंथालयास पुन्हा भेट

येथून काम संपवून अड्यार ग्रंथालयात गेलो. गुरुराजस्तव या स्तोत्राची प्रत तयार करणे आवश्यक होते. पण स्तोत्र ग्रंथलिपीत असल्यामुळे कुणाचे तरी साहाय्य हवे होते तेथे एक तरुण केरळी पंडित असत. अन्यांहि काही मंडळी होती या ग्रंथालयात स्त्री ग्रंथपाल आहेत. त्यांना विचारले असता त्या म्हणाल्या 'आमच्या येथे कर्मचारी पंडित अपुरे आहेत. त्यांना त्यांची कामे आहेत येथे संपादनाचे काम चालते. हे काम लिपिलेखकाचे आहे.' ही मदत करण्यास उचित मोबदला आपण सुचवाल तितका मी द्यावयास सिद्ध आहे असे सांगूनहि उपयोग झाला नाही. ग्रंथालयातून त्याची अधिकृत नक्कल विशिष्ट दराने मिळू शकेल असे सांगण्यात आले सुमारे ३० श्लोकाच्या त्या स्तोत्रासाठी एकूण रु. १० पडतील असे ग्रंथपालिका म्हणाल्या. नुसत्या नागरी लिपीत लिहिण्यासाठी हा दर बराच मोठा होता. शेवटी त्या केरळी तरुण पंडितानी एका नकलनवीसाला विचारून ३० श्लोक वाचण्यासाठी चार रुपये द्यावे असे सुचविले. प्रतीची नक्कल मी उतरवून घेणार होतो. काम सुरु झाले पण त्याना भरभर वाचणे जमेना; शब्द सुटू लागले. वास्तव शेवटी हा विचार रद्द करून ग्रंथालयातून अधिकृत प्रत मिळविण्यासाठी एक आवेदनपत्र लिहिले. एवढ्या मोठ्या ग्रंथालयात ग्रंथलिपीतला मजकूर संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सांगण्याची सोय नाही ही खेदाची गोष्ट आहे. इतर ठिकाणाहून येणाऱ्या वाचकाना ग्रंथलिपीची कल्पना नसते तेव्हा त्यांच्यासाठी विनामूल्य शक्य नसल्यास उचित दर घेऊन कां होईना वाचून दाखविण्याची सोय झाल्यास ग्रंथालयाचा अधिक चांगला उपयोग होऊ शकेल. मुकुंद विलासाची प्रत नागरीत असल्यामुळे काही सर्ग मी उतरवून घेतले व उरलेल्याची प्रत मिळविण्यासाठी आवेदनपत्र दिले नतर ग्रंथपाल व तेथील पंडित याचा निरोप घेऊन परत आलो. वेळ १२ ची होती. जनता एक्सप्रेसने निघावयाचे ठरविले. सामान घेऊन स्टेशनवर आलो व दि. ७ जूनला नागपूर गाठले.

ॐ ॐ ॐ

'सतराव्या शतकातील क्रिस्ती भक्तविजय'

—डॉ. वि. बा. प्रभुदेसाई,

परदेशातून आलेल्या क्रिस्ती मिशनऱ्यांनी हिंदुस्थानातील निरनिराळ्या भागात राहून स्थानिक भाषांचा अभ्यास केला तो मुख्यतः धर्मप्रसारासाठीच होय. देशी भाषांतून त्यानी केलेली ग्रंथनिर्मितीहि याच उद्देशाने झालेली आहे. पोर्तुगीजानी १५१० साली गोवा जिंकून घेतल्यावर नंतरच्या काळात जे अनेक परदेशी धर्मप्रसारक या देशात आले, त्यापैकी जेजुइत पंथाचे पाद्री प्रमुख होते. गोमंतकात राहून मराठी भाषेत ग्रंथनिर्मिति करणाऱ्या जेजुइत पंथीयांपैकी 'क्रिस्तपुराणा'चा कर्ता फादर स्टिफन्स हा जन्माने इंग्रज होता, सेंट पीटरच्या जीवनावर पुराण रचणारा पाद्री क्रुवा हा फ्रेंच होता तर 'सांतु आंतोनिची जीविंवकथा' लिहिणारा पाद्री सालदांज हा पोर्तुगीज होता. यावरून युरोपातील निरनिराळ्या देशांतून आलेल्या या मिशनऱ्यानी मराठीतील ग्रंथनिर्मितीच्या बाबतीत सारखाच उत्साह प्रगट केला, असे दिसून येते.

ही सगळी ग्रंथनिर्मिति मुख्यतः क्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठीच करायची असल्यामुळे या धर्मातील देवादिकांचा आणि साधुसंतांचा महिमा वर्णन करण्यावर भर दिला जाई. स्टिफन्सने बायबलचा जुना करार आणि नवा करार यावर आधारून येशू क्रिस्ताची महती गाइली तर पाद्री क्रुवाने सेंट पीटरचे श्रेष्ठत्व वर्णन करीत असताना हिंदु धर्मातील देवदेवतांच्या निंदानालस्तीची हौस पुरेपूर भागवून घेतली ! पाद्री सालदांज याने मात्र आपल्या काव्यग्रंथात मुख्यतः भर दिला आहे तो सांतु आंतोनिने केलेल्या चमत्कारांवर. हा संत जन्माने पोर्तुगीज असला तरी इटली देशातील पादुवा नांवाच्या शहरात त्याचा अधिक काळ व्यतीत झालेला असल्यामुळे 'पादुवाचा सांतु आंतोनी' म्हणूनच तो अधिक ख्यातनाम आहे. या संताच्या जीवनावर पाद्री सालदांज याने रचलेले ओवीबद्ध मराठी पुराण प्रथमतः १६५५ साली गोव्याला प्रसिद्ध झाले. मूळ रोमन लिपीतील हा ग्रंथ देवनागरीत लिप्यंतर करून मुंबईच्या मराठी संशोधन मंडळातर्फे १९५६ साली प्रकाशित करण्यात आला आहे. आपल्याकडील 'भक्तविजया' सारख्या ग्रंथातील महाराष्ट्रीय संतांचे चमत्कार आणि 'सांतु आंतोनिची जीवित्व-कथा' या ग्रंथात वर्णन केलेले चमत्कार यातील साधर्म्य ध्यानात घेऊनच प्रस्तुत दुसऱ्या आवृत्तीचे संपादक प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी या ग्रंथाला 'सतराव्या शतकातील क्रिस्ती भक्तविजय' असे म्हटले आहे, ते अन्वर्थक वाटते.

अनुक्रमणिका

देशी भाषांमधून ग्रंथरचना करण्याच्या बाबतीत परदेशी मिशनऱ्यांनी दाखविलेला उत्साह खरोखरीच कौतुकास्पद असला तरी एतद्देशियाच्या मदती-शिवाय ही गोष्ट त्यांना साध्य झाली नसती. नवख्रिस्त्यांसाठी सुरुवातीला तयार करण्यात आलेल्या क्रिस्ती धर्माच्या प्रश्नोत्तरावली या स्थानिक बोलीत होत्या. पण जुन्या (हिंदु) धर्मातील कथा पुराणे ऐकण्यावाचण्याची सवय झालेल्या या नवख्रिस्त्यांचे तेवढ्याने समाधान होईना. जुन्या कथापुराणावर तर सक्त बंदी घालण्यात आली होती ! म्हणून नवख्रिस्त्यांच्या मागणीवरूनच ही ग्रांथिक मराठीतील 'प्रतिपुस्तके' (पुराणे) तयार करण्यात आली. [स्टिफन्सच्या 'क्रिस्त-पुराणा'त या घटनेचे प्रत्ययकारी वर्णन केलेले आढळते. पहा पहले पुराण, अवस्वरू १, ओ. १३४–१४५] अर्थात् हा उद्योग करीत असताना या ग्रंथकारांना नवख्रिस्त्यां'च्या जोडीलाच जुन्या मराठी–संस्कृत कथापुराणाचीहि मदत झाली होती, यात तिळमात्र शंका नाही. स्टिफन्सने आपल्या क्रिस्त पुराणाला लिहि-लेल्या गद्यातील प्रस्तावनेत 'मागिलेआं कवेस्वरांचा' उल्लेख केलाच आहे. तसेच 'जैसी हरळामाजि रत्नकिळा' इ. मराठी भाषेच्या प्रशस्तिपर सुप्रसिद्ध ओव्या रचीत असतांना त्याच्यासमोर 'योगवासिष्ट' हा जुना मराठी काव्यग्रंथ असावा हें स्पष्टच दिसते. फादर क्रुवाच्या लिस्बन येथे असलेल्या 'पीटर–पुराणा'च्या एका प्रतीवर तर एका बाजूला 'आदि पुराण' 'अश्वमेघ', 'भागवत', 'गीता', 'हरिश्चंद्र पुराण' इ. अनेक भारतीय काव्यग्रंथांची यादी दिलेली आढळते. याशिवाय जेजुइतांच्या रायतूर (गोवा) येथील कॉलेजच्या मालकीच्या एका बाडांतहि अनेक जुन्या मराठीतील काव्यांचे रोमन लिपीतील उतारे आढळतात.

स्टिफन्स आणि क्रुवा यांनी आपल्या काव्यग्रंथासाठी या उपरिनिर्दिष्ट निरनिराळ्या साधनांचा उपयोग करून घेतला तसा तो 'सांतु आंतोनिची जीवित्वकथा' रचणाऱ्या सालदांजनेहि करून घेतला असावा. पण त्याहिपेक्षा स्टिफन्स आणि क्रुवा यांनी रचलेली पुराणे समोर ठेवूनच सालदांजने आपला काव्यग्रंथ निर्माण केला असला पाहिजे, असे वाटायला लागते. या दृष्टीने प्रस्तुत तिन्ही ग्रंथकारांच्या पुराणातील सुरूवातीच्या ईशस्तवनाचे परीक्षण करणे उद्बोधक होईल.

पाद्री सालदांज याने आपल्या इष्ट देवतांचे स्तवन पहिल्या तीन ओव्यात केले आहे ते असेः–

"नमन माजें परमेस्वरा : स्वर्गसुस्टिचेआ रचणारा
क्रुपाशेंधु करुणाकरा : मुग्तिराया १

नमो मरिये स्वामिणी : तुं स्वर्गासंसाराची राणी
सास्टांगे तुजा चरणी : प्रणिपातु माजा २

तुजेआ देवपुत्राचे वरुदान : मज देवविजे मतिग्न्यान
तुजे कृपेस्तव सागैन : सांतु आंतोनिची कथा ३"

आता वरील वर्णनाशी साधर्म्य दाखविणाऱ्या स्टिफन्स आणि क्रुवा यांच्या पुराणातील पुढील काही ओव्या पहा:–

(१) वो नमो....परमेस्वरा सत्यवंता ।
स्वर्ग प्रथुमिचेआ रचणारा ॥ –क्रि. पु. १–१–१
स्वर्ग–सृस्टिचेआ रचस्तकरा । नमन माजें ॥ –क्रि. पु. १–१–८

(२) तूं शेंघु कृपे करुणेचा । –सें. पी. पु. १–१–१–९
कृपानिधीं करुणाकरु । तूं सर्व सुखाचा सागरु ॥ –क्रि. पु. १–१–२

(३) नमन माजें मुग्तिनाथा । –सें. पी. पु. १–१–१–८

(४) ....देवमाता तूं स्वामिणी ।
....तुजां चरणी । नमस्कारु माजा ॥–क्रि. पु. १–१–४८
दुजी वंदिली सांत मरी । ...देवमाता स्वामिणी ॥
–सें. पी. पु. १–१–१–१३
सास्टांगें प्रणिपातु आतां । तुजां चरणीं ॥ –सें. पी. पु १–१–१–८

(५) ग्न्यानमति देईं स्वामी क्रिस्ता । तुजी कथा वर्नावेया ॥
–क्रि. पु. १–१–४०
आतां प्रसण होउनि कृपा करि । स्वामिणी मज ॥–क्रि. पु. १–१–५०
आरंभावेया कवित्वविस्पति । मज देइजे ग्न्याम मति ॥
–सें. पी पु. १–१–१–१२
मजकारणें मरिये स्वामिणी । करि पुत्रासि विनवणी ॥
देवविजे ग्न्यानसांटवणी । कवित्व सिधी पावावेया ॥
–सें. पी. पु. १–१–१–१४

आतापर्यंतच्या उदाहरणांवरून शब्दरचना आणि वर्णनपद्धति यांच्या बाबतीत सालदांजने केलेले स्वदर्थाय ग्रंथकारांचे अनुकरण ध्यानात येईल. याशिवाय स्टिफन्सच्या क्रिस्तपुराणात जसा 'पाद्री गुरुसि' 'प्रस्टन्' (प्रश्न) विचारून माहिती मिळवणारा ब्राह्मण' आहे तसाच 'सांतु आंतोनिच्या जीवितकथे'तहि 'ब्राह्मणु' आणि 'विप्र' आलेला आहे. पहा:–

ती अचर्यकथना आइकुनु : उठिला येकु ब्राह्मणु
काये बोले नमस्कारु करुनु : पाद्रीपासीं –सां. आं. जी. २४१
तेआ विप्राचेआ बोला : पाद्रि गुरु मानवला –सां. आं. जी. २४४
दुजें अपुर्व सागैन या वरि : परियेसैं विप्रा –सां. आं. जी. ४५०

या ब्राह्मणा'चा किंवा 'विप्रा'चा कांही वेळा 'क्रिस्ताव' असाहि निर्देश केलेला आढळतोः—

तव उठिला सभे भितुरि **क्रिस्तावं येकु** —सां. आं. जी. ४२६
आइकोनि तेयाचा **प्रुस्ट्ण** विचारु : संतोसु पातला पाद्रिगुरु
म्हणे भला भला विचारु केलासि तुवां —सां. आं. जी. ४२९

या वर्णनाशी साम्य दाखवणाऱ्या 'क्रिस्तपुराणां'तील ओव्या अशा आहेतः—

तव तेआ **क्रिस्तावांचेआ** बोला । पाद्रि गुरु उलासला ।।
म्हणे तूं भला रे भला । प्रुस्ट्नु केलासि चांगु ।।—क्रि. पु. १—१—१४६

आपल्या जुन्या कथापुराणात आढळणारे देवधर्म आणि तत्त्वज्ञानविषयक कितीतरी पारिभाषिक शब्द सालदांजने जसेच्या तसे वापरलेले दिसतात. उदा. हरणार्थ, निजस्थानीं (४), गुणप्रकृति (१०), तारुण्यधातुचे (१२), भवजाळा (१५), अरत्रपरत्र (२२९), स्वधर्मासि (२२१), नाभिकारु (२६२), नाभिकार वचन (२६५), अम्रुतकळा (३२२), स्वर्गिचे अमृतें (३४५), कोटि सूर्ये प्रकासकळा (३४८), करसंपुस्ट जोडोनि (३५०), त्रिलोकिंचा चक्रवती (३५५), सुक्रुताचेआ लख्यकोटी (३५३), नास्ती (३८९).

या शब्दांच्या जोडीलाच जेथे ग्रंथकाराला देशी शब्द सुचले नाहीत, तेथे पोर्तुगीज भाषेतील शब्दांचाही मुक्तहस्ताने वापर केलेला आढळतो. त्यामुळे पोर्तुगीज किंवा लॅटिन भाषांचा परिचय नसलेल्या वाचकांना अशी काही स्थळे दुर्बोध वाटल्यास नवल नाही.

प्रस्तुत ग्रंथात नमस्कार करण्याच्या पद्धतीचे वर्णन तीन ठिकाणी आले आहे ते असेः—

तव जोडुनि आपापुले कर : भुमी सवाट घातले नमस्कार
खेमा करा जी अपराध समग्र : आमां अग्न्यानार्थे—सां. आं. जीं. २०७
करसंपुस्ट जोडोनि म्हणे : स्वामिआ तुजेआ पवित्र दरुसेणें
धन्य सुफळ जाहले जिणें : आजि मार्जे—सां. आं. जी. ३५०
आतां त्राहीं त्राही गा जेजु राया : दिव्य बाळका क्रिस्ता स्वामिया
सहस्र संख्या तुजेआं पायां : प्रणिपात माजा—सां. आं. जी. ३५८

हात जोडून भूमीवर साष्टांग नमस्कार घालणें, 'त्राही त्राहीं' म्हणणे, सहस्रशः पायांना प्रणिपात करणे, करसंपुस्ट जोडणे, इ. वर्णने भारतीय कथा-पुराणांचे अनुकरण करण्याच्या संदर्भात लक्षणीय वाटतात. प्रतिभावन्त कवि हा आपला प्रतिपाद्य विषय वाचकांच्या मनावर परिणामकारक रीतीने बिंबवण्या-साठी निरनिराळ्या भावनांच्या परिपोषाच्या जोडीलाच समर्पक अर्थालंकारांचाहि उपयोग करीत असतो. प्रस्तुत काव्यग्रंथात या दृष्टीने फारसे अर्थालंकार

आढळत नसले तरी जी काही निवडक रमणीय स्थळे आढळतात ती अशी आहेत:–

अमोलिक भांडार–ठेवणी : जैसी गेलेया अंतरुनि
तैसा गेलेया सांतु आंतोनि : सांडोनि येथे (४९)

तेआ भग्ताचें पठणवच्ना : आइकतां स्तुते जनां
अग्नी समाने भेदताये मना : कथना तेयाची (१३७)

तंव द्रुहितां हेरेजां सकळां : कोमावलि तेयांचि मुखकमळां
अदोवदनी भुमंडळा : पाहांते जाहाले (२०५)

म्हणे तुजीं अमृत उतरां : आइकोनि मदुरां रुचिकरां
पोंवताये माजा आत्मा साधरा : अन्नतलाहारीं (२१४)

तो सदैवु भग्तु पुण्यसिळु : दिपका सारिखा निर्मळु
तैसा सदैवा आंगढाळु दिसे प्रज्ञळितु (५०५)

स्वामिया तूं करुणेचा साधरु : मुग्तिराजा परमेस्वरू
तूं विस्वदिपकु दिनकरू : स्वर्गासंसाराचा (३५१)

पाद्री सालदांज याने रचलेल्या या ग्रांथिक मराठीतील पुराणात सांतु आंतोनीचे आईवडील, त्याचे कुळ, शिक्षण, जीवनक्रम जन्ममृत्यु इत्यादि माहिती आलेली असल्यामुळे या ग्रंथाला दिलेले 'सांतु आंतोनिची जीवित्वकथा' हे नाव समर्पक वाटते. पण हा त्याचा मुख्य ग्रंथ नसून गोमंतकी बोलीत गद्यात रचलेला या विषयावरचा त्याचा दुसरा ग्रंथच अधिक महत्त्वाचा आणि विस्तारानेहि मोठा आहे. या ग्रंथात सांतु आंतोनी संबंधीच्या चमत्कारांचे वर्णन करताना मानवी स्वभावातील हर्षामर्ष, प्रीति, असूया, ईर्षा इत्यादि बऱ्यावाईट वैशिष्टचांचे लेखकाने घडविलेले दर्शन मनोज्ञ वाटते. गोमंतकी बोलीतील गद्य शैलीत वर्णन केलेले हे 'सांतु आंतोनिचे चमत्कार' भाषांतरित किंवा रूपांतरित आहेत, हे मुद्दाम सांगूनहि खरे वाटणार नाही इतके त्यांचे चित्रण जिवंत आणि रसरशीत वठले आहे.

× × ×

[संक्षेपांचे स्पष्टीकरण:–(१) सां. आं. जी. –सांतु आंतोनिची जीवित्वकथा. (२) क्रि. पु.–फादर स्टिफन्सचे क्रिस्तपुराण. (३) सें. पी. पु.–पाद्री क्रुवाचें सेंट पीटर पुराण. कंसात दिलेले क्रमांक ओव्यांचे आहेत.]

मराठी शारदेचं इंग्रजी मंदिर
(उत्तरार्ध)

—प्रा. सुरेश म. डोळके

अव्वल इंग्रजीतील लेखनपद्धतीचं स्वरूप तत्कालीन पाठ्यपुस्तकांप्रमाणेच, त्यांना मार्गदर्शक होणाऱ्या कोशव्याकरणादि ग्रंथांतही सांपडतं. आज उपलब्ध असणाऱ्या मराठी व्याकरणांत जुन्यातलं जुनं व्याकरण म्हणजे जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके व बाळशास्त्री घगवे या शास्त्रीत्रयांनी तयार केलेले 'महराष्ट्र भाषेचे व्याकरण' हे होय. 'हैंदशाळा शाळा पुस्तक मंडळी' अस्तित्वात आल्यावर, प्रमाण (Standard) मराठी कशी ठरवावी व बोधभाषेचं स्वरूप काय असावं याचा विचार करण्याकरिता संस्थेच्या चालकांनी एक कमिटी नेमली. या कमिटीच्या सूचनेवरून, 'मंडळींचे सेक्रेटरी जॉर्ज जर्व्हिस यांच्या 'कारखान्या'तील तीन पंडितांनी 'संस्कृत व्याकरणाध्ययन बलेकरून' 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण' एक वर्षांत तयार केले. याच व्याकरणावरून इ. स. १८२५ पासून १८३६ पर्यंत शिकविण्याचे काम चालले. या ग्रंथात पुणे प्रांतीची भाषा मुख्य घरली आहे. इंग्रजी व्याकरणाचा ज्याच्यावर परिणाम झालेला नाही, असे हे मराठीचे आद्य व्याकरण होय.

पंडितमंडळीच्या या व्याकरणावरून साधारणत: १८२५ ते १८३६ पर्यंतच्या मराठी लेखनपद्धतीचे काही ठळक विशेष पुढीलप्रमाणे दिसतात—

(१) तालव्य च, ज, झ यांहून दन्ततालव्य च, ज, झ निराळे दाखविण्यासाठी, त्यांच्या शिरोरेषेचे आरंभी बिंदु देण्याची पद्धति होती. उदा.—ॱच, ॱज, ॱझ.

(२) "अनुनासिक स्वराचे चिन्ह त्या अक्षरावर एक वांकडी रेघ आणि तीजवर एक बिंदू (ँ) असे असते. उदाहरण—अँ, आँ, इँ, ईँ, उँ, ऊँ, काँ, कँ, हाँ, हुँ,"[१८] इत्यादिक

"अनुस्वार आणि विसर्ग हे दोन स्वराश्रित आहेत. म्हणून ते कधींही अक्षरावांचून राहात नाहीत. त्यांत अनुस्वार म्हणजे अक्षराचे वर एक बिंदू (ं)

---

[१८] पंडितमंडळीचे 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' [संपादक— अ. का. प्रियोळकर], पृ. ११

असतो. त्याचा उच्चार नासिकेचा आश्रयें होतो. यांजकरिता त्यांचें नासिका-स्थान होय."

"विसर्ग म्हणजे अक्षरापुढें दोन उभे बिंदू (:) असतात. त्या विसर्गाचा उच्चार कंठाचे आश्रयानें होतो. म्हणून त्याचें कंठस्थान आणि जा स्वरापुढे असतो त्या स्वराचें स्थानही होय. अः—पुनः—पुनःपुनः"—[१९]

शास्त्रीमंडळीच्या व्याकरणावरून रामचंद्रशास्त्री जन्हवेकर यांनी एक प्रश्नोत्तररूप व्याकरण लिहिले. ही दोनही पुस्तके छापली गेली नव्हती. शाळेतले विद्यार्थी या व्याकरणांच्या नकला करीत व त्यावरूनच विद्यार्थ्यांचा व्याकरणाभ्यास होई. या दोनही हस्तलिखित व्याकरणांचा उपयोग करून व "मूळच्या व्याकरणातील ग्राह्यांश किती व त्याज्यांश किती व नवीन विषय कोणते पाहिजेत यांचा विचार करून"[२०] गंगाधरशास्त्री फडके यांनी गुरुशिष्यसंवादरूप एक व्याकरण केले व ते १ जानेवारी १८३६ रोजी छापले. हेच मराठीचं अव्वल इंग्रजीतील पहिलं मुद्रित व्याकरण होय. याच वर्षी बाळशास्त्री जांभेकर यांचं 'बालव्याकरण'ही प्रसिद्ध झालं. मुंबई सरकारचा तत्कालीन चीफ सेक्रेटरी वॉर्थेन हा मात्र मोल्स्वर्थच्या पावलावर पाऊल टाकून, 'बालव्याकरणा'चं कर्तृत्व, बाळशास्त्र्यांबरोबरच, स्वतःकडेही घ्यावयाला चुकला नाही.[२१]

१८३६ हे साल मराठी व्याकरणाच्या बाबतीत आणखी एका दृष्टीनं फार महत्त्वाचं आहे. मराठीचे पाणिनी दादोबा पांडुरंग यांचंही व्याकरण याच साली प्रसिद्ध झालं. मराठी व्याकरणाला पूर्णता आणि मराठी लेखनाला शुद्धता आणण्यासाठी दादोबांनी केलेले परिश्रम केवळ अतुल होत. 'दादोकृत महाराष्ट्र व्याकरण' हाच, "Which is deservedly esteemed as the best work on the subject"[२२] या बाळशास्त्री जांभेकर यांच्या चिकित्सक अभिप्रायानुसार, स्वतंत्र बुद्धीने लिहिलेला मराठीतील पहिला मौलिक ग्रंथ होय.

दादोबांच्या पूर्वीची मराठी व्याकरणं संस्कृतात प्रवीण असलेल्या शास्त्री-पंडितांनी संस्कृतच्या धर्तीवर रचली होती. दादोबांनी मात्र इंग्रजी व्याकरणाच्या पद्धतीनं व इंग्रजी भाषेचा अभ्यास करण्यास विद्यार्थ्यास सुलभ व्हावे या हेतूनं

---

[१९] पंडितमंडळीचे 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण', पृ. १२

[२०] गंगाधरशास्त्री फडके यांचे 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण', आवृत्ति चवथी (१८५०) 'प्रस्तावना'

[२१] G. D. vol. 10/342; 1836, P. 150.

[२२] 'मराठी भाषेचे व्याकरण', आ. ७ वी (१८७९). 'प्रस्तावना'

आपलं व्याकरण तयार केलं. दादोवांनीही, लेखनाची प्रमाण (Standard) भाषा म्हणून पुणे प्रांतीच्याच विद्वानांची भाषा निवडली आहे. "या व्याकरणांत-महाराष्ट्र देशाचा मध्यभाग जो पुणे प्रांत, त्यांत जी भाषा राजकीय आणि विद्वान् लोक बोलतात तिचे अनुसरण केलें आहे"[११] असे दादोवा म्हणतात.

विद्यार्थ्यांना आपल्या व्याकरणाचा उपयोग व्हावा हा तर दादोवांचा हेतु होताच, पण मराठी भाषेचे 'नियम बांधणे' व अशा प्रकारे मराठीचे व्याकरण—शास्त्र तयार करणे, हीही त्यांची महत्त्वाकांक्षा होती. भाषेतील शुद्धाशुद्ध आणि भाषेचं व्याकरण यांच्या अन्योन्यसंबंधाची जाणीव, मराठीत तरी, दादोवांनीच पहिल्यांदा दाखविली. दादोवांनी मराठी भाषेला 'नियमात' आणण्याचा व तिला लेखनासाठी 'प्रमाण' भाषा करण्याचा पहिला शास्त्रीय प्रयत्न केला.

मराठी लिहिण्यातली अव्यवस्था मोडून, सर्वांची लेखनपद्धति सारखी करावी या तळमळीनं दादोवांनी आपलं व्याकरण लिहिलं. लेखनपद्धति व शुद्धलेखन यांबाबत दादोवांनी सांगितलेले काही विशेष, दादोवांच्या काळा इतकेच आजही उपयुक्त असल्यामुळे, पुढे दिले आहेत—

(१) सामान्यरूपाचा अन्त्य स्वर अनेकवचनीं अनुनासिक होतो; जसें—देवां, हत्तीं, काठ्यां, सास्वां, स्त्रियां, इ. (महाराष्ट्र भाषेचें व्याकरण,' आवृत्ति ३ री; पृ. ६८)

(२) त्याणें, तिणें, त्यांणीं, यांचीं—ही रूपें, 'सर्वमान्य अशा लोकव्यवहारानुसार,' प्रशस्त; त्यानें, तिनें इ. अप्रशस्त. (पृ. १२२–१२३)

(३) म्यां, त्वां ही मी आणि तू या शब्दांची तृतीयेची रूपें व्याकरण रीतीने शुद्ध आहेत. "परंतु महाराष्ट्र देशरूप वर्तुळाचा मध्यबिंदु जें पुणें, त्यांत व सारा कोंकण प्रांत यांत मीं, तूं, या सर्वनामांचीं तृतीयेचीं रूपें फिरत नाहींत, म्हणोन मीं या व्याकरणांत त्याच रीतीस अनुसरून मीं, तूं, या तृतीयेच्या रूपांस पहिलें स्थान दिलें आहे. (पृ. १२३)

—तरी, 'म्यां,' 'त्वां' या रूपांचा प्रचार 'लिहिण्यांत तरी पडावा' अशी इच्छाही दादोबांनी व्यक्त केली आहे.

(४) कीं—कि : जेथे बोलणाऱ्याचा आशय अन्वयार्थाने अथवा स्वेच्छेने ज्यावर नेट देऊन बोलावयाचा नसेल ते अव्यय ऱ्हस्व लिहावे, आणि ज्यावर नेट देऊन बोलावयाचे असेल ते दीर्घ लिहावे. उदा.—'ती संख्या कोणती कि जीस प्याचांनी गुणिलें असता वीस होतात'; आणि 'तो सांगेल की तुम्ही....' इ.

---

[११] 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण', आ. ३ री (१८५७), 'प्रस्तावना', पृ. ११

(५) हि–ही : वरीलप्रमाणेच. उदा.–'त्यांचेहि काम झाले' आणि 'तुझे काम तर झालेच, पण माझेही झालें.'

(६) च, हि, वा–ही शुद्ध शब्दयोगी अव्यये तोडून लिहू नयेत; ज्या शब्दांशी त्यांचा योग असतो त्यांशी जोडून लिहावी. उदा.–चतुष्पदांत हत्तीसच सोंड आढळल्ये,' 'तूहि ये' इ. (पृ. ३२५)

(७) 'ही' हे अव्यय सर्वत्र दीर्घ लिहावे.

(८) 'पाहणे,' 'राहणे' ही रूपें शुद्ध (पृ. २४९)

(९) 'करवितो,' 'बोलवितो' ही प्रयोजक रूपें ग्राह्य; करिवितो, बोलिवितो किंवा करिवतो, बोलिवतो ही रूपे अग्राह्य (पृ. १५७)

(१०) अनुनासिक उच्चारणें व अनुस्वार देणें हे ज्याच्या त्याच्या इच्छेवर, म्हणजेच वैकल्पिक. मात्र नपुं. रूपें असतां, किंवा अर्थविपर्यास होत असतां हा विकल्प कदापि समजू नये.

उदा.–तें–ते; तीं–ती; केलें–केले (नपुं.)
गाईस–गाईंस; वाघास–वाघांस (वचन)

(११) करिता–करता करिता='कर' धातूचे वर्त. धा. सा. अव्यय; करता=साठीं.

(१२) म्हणून–म्हणोन :
म्हणून–'म्हण' धातूचे पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यय
म्हणोन–यास्तव इ. इतर वहुत अर्थी

उदा.–'असें म्हणून तो गेला'; 'व्याकरण म्हणोन एक शास्त्र आहे.

(१३) 'करत आहे,' 'करतो' इ. रूपें शुद्ध.

(१४) स्त्रीलिंगी प्रथम पुरुषी–असत्यें, करित्यें, जात्यें, येत असत्यें, ही रूपें ग्राह्य. "स्त्रियांच्या भाषणांत जितका नाजुकपणा आणि मार्दव तितका तो त्यांस अलंकार होय. तो या पेक्षां त्यें यांत कांहीं मार्दवविशेष आहे, म्हणोन सर्वांहीं 'मीं असत्यें, करित्यें,' हींच रूपें स्त्रीलिंगी घेतलीं असतां चांगलें आहे." (पृ, १८५)

(१५) वाक्यार्थ स्पष्ट होण्याकरिता विरामचिन्हांचा उपयोग फार आवश्यक आहे. (पृ. ३२६)

व्याकरणाच्या व्यासंगात दादोबांनी आपल्या आयुष्याची चार तपे घालविली व १८३६ पासून १८८१ पर्यंत आपल्या व्याकरणाच्या 'पूरणिके'सह सात आवृत्या त्यांनी स्वतः सुधारून व वाढवून प्रसिद्ध केल्या. दादोबांच्या पूर्वी मराठीत व्याकरणे नव्हती असं नाही; पण वापुशास्त्री शुक्ल यांच्या अभिप्रायानुसार, ती

सारी 'भुसकट'[१४] होती. मराठीतील व्याकरण-शास्त्राचा व मराठीतील शास्त्रीय लेखनपद्धतीचाही पाया घालणारे दादोबा हेच पहिले वैयाकरणी, मराठीला 'नियमात' आणण्याचा पोटतिडिकीने प्रयत्न करणारे पहिले स्वतंत्र-प्रज्ञ ग्रंथकार. 'येथे दाक्षिणात्य पंडित आपणास महाराष्ट्र भाषेचे पाणिनी असे समजतात'[१५] असं जे काशीतील एका पंडितानं दादोबांना पत्र पाठवून कळविलं होतं ते अगदी यथार्थ आहे, असंच कुणीही म्हणेल. दादोबांनी केलेल्या या वेदांगाच्या अविरत व्यासंगामुळेच लोकहितवादींनी त्यांना 'ऋषि' म्हणून गौरविलं आहे.

मराठी भाषेला नियमबद्धता व एकरूपता आणून देण्याचा, दादोबांप्रमाणंच आणखी कुणी कसोशीनं व निष्ठापूर्वक प्रयत्न केला असेल, तर तो मेजर कँडी यांनी. कँडीसाहेबांनी मराठीचं स्वतंत्र व्याकरण रचलं नाही हे खरं; पण, मराठी-भाषा व्याकरणनियमांच्या चौकटीत बसवावी व त्या नियमांप्रमाणेच तिचं लेखन व्हावं याकरिता त्यांनी आमरण धडपड केली. अव्वल इंग्रजी अमदानीत मराठीत कोश–व्याकरणादिकांची जी रचना झाली व प्रमाण बोधभाषेचं स्वरूप कसं असावं हे ठरविण्याकरिता जे प्रयत्न झाले, त्यांत मेजर कँडी यांचं कर्तृत्व फार मोठं आहे. १८३७ साली पुणे कॉलेजचे सुपरिंटेंडेंट व विशेषतः १८४७ मध्ये मराठी ट्रान्सलेटर व रेफरी म्हणून सरकारी नेमणूक झाल्यापासून तो १८७६ साली नोकरीचा राजीनामा देईपर्यंत कँडीसाहेबांनी मराठीतलं प्रायः प्रत्येक पुस्तक डोळ्यांत तेल घालून तपासलं, आपल्या कल्पनेनुसार इयत्तावार क्रमिक पुस्तकं लिहिली व लिहवून घेतली, भाषान्तरं तपासून दिली, सरकारी पुरस्कार मागणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या प्रत्येक पुस्तकात भाषिक फेरबदल केले व त्यांतील लेखनाची दुरुस्तीही सुचविली. मेजर कँडी यांनी पाहिल्याशिवाय मराठीतलं कोणतंही पुस्तक छापावयाचं नाही असा जणु दंडकच ठरून गेला होता. अशा रीतीनं मराठीतल्या प्रायः प्रत्येक पुस्तकाला कँडीसाहेबांच्या शोधक नियंत्रणाखालून जावं लागल्यामुळं, एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील मराठी पुस्तकांची भाषिक घडण कँडीसाहेबांनीच घडविली, असं म्हटल्यास त्यात यत्किंचितही अतिशयोक्ति व्हायची नाही. या दृष्टीनं, लक्ष्मणराव चिपळूणकर यांनी 'महाराष्ट्र भाषागुरू' असं म्हणून मेजर कँडींचा जो गौरव केला, तो अगदी यथार्थ आहे असं वाटतं.

नवलाची गोष्ट अशी की, एतद्देशीय मराठी विद्वान् मराठी इंग्रजी वळणाचं लिहीत व कँडीसाहेब त्यांना मराठीसारखं कां लिहीत नाही म्हणून बोल लावीत. मराठी शुद्धाशुद्धाविषयी व मराठीच्या प्रमाण लेखनपद्धती विषयी कँडीसाहेबांची

---

[१४] दादोबांचे 'आत्मचरित्र,' पृ. ३६

[१५] मो. के. दामले : शास्त्रीय मराठी व्याकरण, 'उपक्रम,' पृ. १

अनुक्रमणिका

काही निश्चित मतं होती व ही मतं अभ्यासावर आधारलेली होती. पण कँडी-साहेबांनी जिचा अभ्यास केला होता ती मराठी केवळ कोश-व्याकरणादि ग्रंथांत स्थिररूप पावलेली अशीच असल्यामुळं रोजच्या व्यवहारातील जिवंत बोलभाषेची व तिच्यात पडणाऱ्या फरकांची त्यांना कल्पना नव्हती. लोकव्यवहारापेक्षा व्याकरणनियमांनाच ते अधिक महत्त्व देत आणि त्यामुळंच एतद्देशीय विद्वानांशी त्यांचे मतभेद होत. दादोबा पांडुरंग, भाऊ महाजन, रामचंद्र भिकाजी गुंजीकर, परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्यासारख्या मी मी म्हणविणाऱ्या विद्वानांच्याही मराठी लिखाणातील चुका दाखवून व त्यांच्याशी व्याकरणविषयक वादविवाद करून या 'साखरेबुवां'नी त्यांना एके काळी सळो की पळो करून सोडलं होतं. बाळशास्त्री जांभेकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विनायक कोंडदेव ओक प्रभृति विद्वान मात्र कँडींच्या मताचे होते असं दिसतं. विनायक कोंडदेव ओकांनी तर 'मला मराठी लिहिण्यास मेजर कँडीसाहेबांनीं शिकविलें' [२६] असं स्पष्ट लिहून ठेवलं आहे.

मेजर कँडी यांची प्रमाण मराठीबाबतची काही मतं पुढीलप्रमाणे सांगता येतील [२७]—

(१) मीं, तूं यांची तृतीयेची एकवचनी रूपें **म्यां, त्वां** अशी करावी. [दादोबांनी 'मीं', 'तूं' या रूपांना अग्रस्थान दिले होते]

(२) 'करीत आहे', 'करितो' इ. रूपे व्याकरण शुद्ध. [दादोबा 'करत आहे', 'करतो' इ. रूपे शुद्ध मानीत असत.]

(३) त्यानें, तिनें इ. रूपे शुद्ध. [दादोबांनीं त्याणें, तिणें इ. रूपे प्रशस्त मानली होती.]

(४) 'आपणास' हे रूप शुद्ध. ['आपल्यास is a vulgarism for आपणास' असे कँडी म्हणतात.]

(५) 'हें तूं चांगलें केलेंस' या प्रयोगा ऐवजी 'हें तूं चांगलें केलें' असा प्रयोग करावा.

(६) 'संपादन करणें', 'रक्षण करणें' इ. ना संयुक्त क्रियापदे म्हणणे चुकीचे आहे. 'राज्यें संपादन करा', 'अब्रू रक्षण करा', 'गोष्ट निवेदन केली',

---

[२६] वि. ज्ञा. विस्तार, पु. ३६, अंक १ (१९०५), पृ. ४३.

[२७] याकरिता डॉ. कृ. भि. कुळकर्णी यांच्या 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति' या ग्रंथातील 'व्याकरण विषयक वादविवाद' या प्रकरणाचा व डॉ. गं. व. ग्रामोपाध्ये यांच्या 'आधुनिक मराठी लेखन पद्धतीचे शिल्पकार' या लेखाचा ('नवभारत', ऑगस्ट १९५९) आधार घेतलेला आहे.

'गोष्ट श्रवण केली' इ. वाक्यांश 'राज्यांचें संपादन करा', 'अन्नूचें रक्षण करा', 'गोष्टीचें निवेदन केलें', 'गोष्टीचें श्रवण केलें' अशा पद्धतीने लिहिले अगर बोलले पाहिजेत.

(७) कर्मणि व भावे या प्रयोगांचे व्याकरणशुद्ध उपयोग करावे.

उदा.–'जहांगीर बादशहानें तिला आपली मुख्य व आवडती राणी केली' ('ज्ञानप्रसारक', जुलै १८५७) या कर्मणि प्रयोगाऐवजी 'जहांगीर बादशहानें तिला.....राणी केलें' असा भावे–प्रयोग करावा.

(८) 'त्याच्यानें दोन ओळी भाषांतर करतां यावयाचें नाहीं' हे वाक्य 'त्याच्यानें करवणार नाहीं' किंवा 'त्यास करतां यावयाचें नाहीं' असे लिहिले पाहिजे

(९) कोकणी प्रयोग व वाक्प्रचार टाळावे.

(१०) विरामचिन्हांचा योग्य उपयोग करावा. [दादोबांनी ही आवश्यकता प्रतिपादन केली होती.]

(११) इंग्रजी वळणाचे मराठी टाळावे 'Avoid writing Marathi in English ideom.'

(१२) "Translators should be careful to be consistent in their orthography. It is very common for a native to write a word in two or three different ways, sometimes even on the same page (as for example काढणें, कहाडणें, काहाडणें) but this is bad. In former days there was the same inattention to spelling in English writing, but now bad spelling is universally considered a mark of defective education." [२८]

कॅंडींनी केलेल्या 'व्याकरणाविषयीं, शब्दांविषयीं व रचनेविषयीं' सुधारणांची कल्पना येण्यासाठी पुढे 'इसपनीतिकथा' (१८२८) या, सदाशिव काशीनाथ छत्रे यांच्या पुस्तकातील कथेचा सुरुवातीचा भाग देऊन, त्यात कॅंडींनी केलेल्या सुधारणा कंसांत दाखविल्या आहेत–

"एक लावी पक्षिण (पक्षीण) शेतांत राहात (राहत) होती. तें शेत पिकलें असतां (तेव्हां) तीस काळजी पडली कीं, माझी पिलीं (पिलें) पांख

[२८] D. P. I. Board of Education, Poona Sanskrit College, (1850) P. 146.

फुटोन (फुटून) चांगलीं उडायास लागायाचे अगोधर (लागायाच्या अगोदर), जर शेतकरी शेत कापायास आला, तर कसें होईल ? मग ती नित्य बाहेर चारा आणायास (आणावयास) जाई तेवेळीं (त्यावेळीं) पिल्यांस (पिलांस) सांगे कीं, माझे मागें कोण काय बोलेल, तितकें सर्व मी घरीं आल्यें (आलें) म्हणजे मला सांगावें (सांगा). एके दिवशीं शेताचा धनी शेतावर येऊन आपल्ये (आपल्या) मुलास म्हणतो, मुला, मला वाटतें कीं हें शेत आतां कापायास झालें (आले); त्यास तूं उद्यां सकाळीं जा आणि आपले इष्टमित्र शेजारी यांस (ह्यांची) शेत कापणीस हात लावाया विशीं (विषयीं) प्रार्थ (प्रार्थना कर). असें तो शेतकरी मुलास बोलिला (बोलला) तें पिल्यांनीं (पिलांनीं) आई घरीं येतांच तीस सांगीतलें (सांगितलें); आणि तिचे भोवतीं (तिच्या भोंवतीं) किलकिल करून म्हणू (म्हणूं) लागलीं, आई, आतां तूं आम्हास (आम्हांस) लवकर येथून दुसरीकडे (दुसऱ्या ठिकाणीं) ने..... [९]

या उताऱ्यावरून, कँडींनी पुरस्कारिलेल्या सुधारणांचा व लेखनपद्धतीचा आधुनिक मराठी भाषेवर किती खोल परिणाम झाला आहे याची कल्पना येते, व 'मराठी भाषेचें नियमन करणारांत अग्रभागीं गणण्यास योग्य' [१०] या शब्दांत विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केलेला मेजर कँडींचा उल्लेख किती यथार्थ होता, हेही मनाला पटते.

कँडींच्या लेखनपद्धतीवर व भाषाविषयक धोरणावर दादोबा पांडुरंग, भाऊ महाजन प्रभृति विद्वानांनी व 'ज्ञानप्रसारक', 'प्रभाकर', 'विविधज्ञान विस्तार' प्रभृति मातबर नियतकालिकांनी कसून हल्ले चढविले व मेजर कँडी यांनीही त्यांना खंबीरपणानं उत्तरं दिली.

–अशा रीतीनं एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी वाङ्मयाचं क्षितिज भाषाविषयक व व्याकरणविषयक 'वातचक्रां'नी गजबजून गेलं होतं.,....

---

[९] 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति' (कृ. भि. कुळकर्णी), पृ. १५२,
[१०] 'निबंधमाला', अंक १०, (ऑक्टोबर १८७४), पृ. १२–१३.

मराठीची बदलती रूपे :
आधुनिक मराठी

–प्रा. श्री. मा. कुलकर्णी

(या भाषणमालेतील हे शेवटचे भाषण. यापूर्वीची भाषणे युगवाणीच्या ऑक्टोबर–नोव्हेंबर व डिसेंबर १९६४ च्या अंकात प्रसिद्ध झाली आहेत. –संपादक.)

मराठी भाषेचा आधुनिक कालखंड अि. स. १८७४ पासून मानला पाहिजे. यावर्षी मराठी भाषेचे शिवाजी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, यांनी निबंधमाला हे मासिक सुरू केलं आणि मराठी भाषेच्या स्वरूपात बदल झाला, तिच्या सामर्थ्यात भर पडली.

हा कालखंड पूर्वीच्या सर्व कालखंडाहून काही बाबतीत निराळा आहे. या कालखंडात मुद्रणकलेचा उत्तरोत्तर विकास होत गेला, प्रसार होत गेला. यामुळे भाषेचं रूप आता मुद्रित ग्रंथातच पाहायला मिळतं. मुद्रित ग्रंथ हे प्रचलित नियमानुसार छापलेले असतात आणि ते नियम सार्वत्रिक असल्याने तसेच त्यांच्यात वारंवार बदल होत नसल्याने शब्दांची रूपे, वाक्यरचना अित्यादीत फारच थोडा बदल या काळात झालेला दिसतो. दुसरे, मुद्रणकलेच्या प्रसारामुळे व विद्यालयीन शिक्षणाच्या वाढीमुळे भाषेला एक सामान्य, मध्यवर्ती, ग्रांथिक असं स्वरूप प्राप्त झालं आणि ते प्रमाण ठरल्यामुळे पुष्कळ अंशी टिकून राहिलं. तिसरे या काल-खंडात पद्य मागे पडले व गद्य पुढे आले. या गद्यात अितके विविध प्रकारचे वाङ्मय निर्माण झाले व होत आहे की त्यात दिसून येणाऱ्या मराठीच्या विविध रूपच्छटांचा ओझरता परिचयहि करून देणं येथे दुरापास्त ठरावं. मात्र शब्दांची रूपे व विभक्तिप्रत्यय, तसेच उच्चारप्रक्रिया व अर्थप्रक्रिया यात गेल्या ९० वर्षांत फारच थोडा फरक झाला असल्यामुळे त्या बाबी मुद्दाम उदाहरणे देऊन स्पष्ट करण्याची, आजच्या श्रोत्यांच्या दृष्टीने, कांही आवश्यकता नाही.

भाषेचे दोन नमूने प्रथम सादर करतो. पहिला अव्वल अिंग्रजीतील लोक-हितवादींच्या शतपत्रामधून घेतला आहे आणि दुसरा विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेतील आहे. या उताऱ्यामुळे पूर्वीच्या काळखंडाहून प्रस्तुत काळखंडातील मराठी भाषेचं रूप कसं निराळं आहे ते सहज ध्यानात येईल.

"...आम्ही जर आता कोणास सांगितले की, तुमची बायको मेली तिच्याशी तुम्ही जाळून घ्यावे, तर कोणी ऐकेल काय? पुरुष कोणी

ऐकणार नाहीत. कारण की, त्यांना बायकापेक्षा काही तरी थोडेसे अधिक कळते. परंतु बायका अंधकारात. त्यांस जसे सांगितले तसे वर्ततात. याजमुळे सती जाण्याचा पाठ पडला. जर बायका शहाण्या व त्यास विद्या वगैरे शिकवावयाची चाल असती, तर जाणी त्यांस प्रथम सती जाण्यास सांगितले त्यांच्या त्यांनी शेंड्या उपटून टाकल्या असत्या. अजूनही जर स्त्रियांस विद्या वगैरे शिकविल्या तर त्या आपला पुर्नविवाह करतील आणि शास्त्री वगैरे जे त्यांस आडवे येतील, त्यास पुसतील की, पुरुषांनी पाहिजे तितकी लग्ने करावी मग स्त्रीने नवरा मेल्यावरही दुसरा नवरा का करू नये! आणि आपणच शास्त्रार्थ देऊन चालू करतील." (लो. ची शतपत्रे, आ. दु. पृ. ३२)

या उताऱ्यातील लक्षणीय शब्दरूपे, प्रत्यय वाक्यरचना आणि वाक्यप्रयोग असे. **तिच्याशी जाळून घ्यावे, वर्ततात, याजमुळे, पाठ पडला, जाणी** (म्हणजे ज्यांनी) **आपला पुर्नविवाह करतील, त्यास पुसतील की, शास्त्रार्थ देऊन चालू करतील.** मराठीचं हे रूप १८४९ मधील आहे. आता १८८० मधील निबंधमालेतील भाषेचं हे रूप पहा.

"...लोकांस अठरा विश्वे दारिद्र्याने गांठले असून खाण्याची सुद्धा दिवसांदिवस भ्रांत होऊ लागली आहे; कोणत्या व्यापारात म्हणून तेजी राहिली नाही; घरी दारी विलायत भरली आहे. सरकारी देण्याने तर लोकांस अगदी टेकीला आणून वरचेवर नव्या बाबी निघतच आहेत-लोकातला वकूब पाहिला तर कोणाच्या अंगी हिंमत नाही, जो तो आपल्यापुरते पाहणारा, दुसऱ्याचे पागोटे माझ्या हाती कसे येईल, वरिष्ठ अधिकाऱ्याकडे चुगली करून दुसऱ्यास पेचात कसा आणीन, पुढे पुढे शेपूट हलवून व बुटांचे पवित्र प्रहार सोसून खुशामत कशी करीन, या विचारांत बहुतेक मंडळी मग्न; शिपाइगिरी लोकात किती राहिली आहे म्हणाल तर शस्त्रास्त्रांची चित्रे पुस्तकांतून पाहावी व त्याचे प्रयोग अितिहासात वाचावे; नुसत्या शरीरसामर्थ्याकडे पाहावे, तर दर पिढीला आत आत पाय येत असून लवकरच हरभऱ्याच्या झाडाला शिडी लावण्याची पाळी येते की काय कोण जाणे असे वाटते!" (निबंधमाला, तिसरी आवृत्ति १९२६ पृ. १०६२.)

हा उतारा ऐकल्या बरोबर तीस वर्षात मराठीचे बदललेले रूप व वाढलेले सामर्थ्य ध्यानात आल्याशिवाय राहणार नाही. हे सामर्थ्य वाढविण्यासाठी चिपळूणकरांनी येथे **वकूब, हिंमत, चुगली** असे काही पूर्वी रूढ असलेले फारशी शब्द निवडून वापरले आहेत आणि, **टेकीला आणणे, दुसऱ्याचे पागोटे आपल्या हाती**

घेणे, आत आत पाय येणे, अशा वाक्प्रयोगांचा अवलंब केला आहे. शिवाय, शेपूट हलविणे, हरभऱ्याच्या झाडाला शिडी लावणे या सारखी अलंकारिक भाषा वापरून व बुटांचे पवित्र प्रहार या सारखे उपहासगर्भ व उपरोधिक प्रयोग करून भाषेचे सामर्थ्य व सौंदर्य वाढविले आहे. लोकहितवादींच्या भाषेपेक्षा ही भाषा अधिक प्रौढ, गंभीर, अधिक ठाकठिकीची, पल्लेदार, धारदार, समर्थ व संपन्न वाटते.

चिपळूणकरांनी वामन–मोरोपंतादि प्राचीन पंडीतकवींचे काव्य व ऐतिहासिक पत्रव्यवहार, बखरी आदि गद्य वाङमय यांचा कमी–अधिक अभ्यास केलेला होता. त्यामुळे त्यांना शब्दसंपत्तीची वाण पडली नाही. दुसरे त्यांच्या समोर, ॲडिसन, स्टील, जॉन्सन, मेकॉले अित्यादि अिंग्रजी निबंधकार व प्रबंधकार आदर्श म्हणून होते आणि त्यांच्या अभिव्यक्ति पद्धतीचा व अभिव्यक्ति सामर्थ्याचा प्रभाव चिपळूणकरांवर पडला होता. आणि तिसरी महत्वाची बाब म्हणजे चिपळूणकरांच्या अंगी स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचा प्रखर अभिमान वसत होता. या तीन्ही गोष्टींचा यथायोग्य परिपाक घडून चिपळूणकरांची भाषा समृद्ध, शैली प्रौढगंभीर व अभिव्यक्ति समर्थ झाली. भाषा हे एक शस्त्र आहे असे लो. टिळकांनी म्हटले आहे ते खरे आहे. चिपळूणकरांनी उपहास, उपरोध यांनी ते धारदार केले. या धारदार शस्त्राचा त्याकाळी अनेकांनी यथायोग्य उपयोग केला आणि स्वतःच्या प्रखर प्रज्ञेचे व पल्लवित प्रतिभेचे पाणी त्याला पाजून ते अधिक तेजस्वी व ओजस्वी केले. टिळक, आगरकर, परांजपे, केळकर, खाडिलकर, कोल्हटकर, सावरकर अशी विचारवंत, ध्येयवादी व भाषाप्रभु मंडळी या काळखंडाच्या आरंभाला मराठी भाषेला लाभली आणि त्यांनी तिचा सर्वांगीण विकास घडवून आणला.

आगरकरांच्या भाषाशैलीतील ओज, आवेश, वक्तृत्व आणि प्रखरता यांचा प्रत्यय पुढील परिच्छेदात कसा येतो ते पहा.

> "…..अेकाद्या दुसऱ्या मनूची आणि पाराशराची कथा काय ! आमच्या अर्वाचीन विचारांस ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटू लागल्या आहेत त्यास शेकडो मनूंचे व सहस्त्रावधी पाराशरांचे आधार दाखविलेत, व त्यांचा प्रसार न व्हावा म्हणून त्यांच्या मार्गात कोट्यवधि लोकांचा मूर्खपणा, वृथा धर्माभिमान….यांचे अडथळे आणून घातलेत तरी ज्या प्रमाणे तुफान वेगाने कड्यावरून पडू लागलेल्या वारिवाहाची गति कुंठित करण्यास कोणीहि धजत नाही त्याप्रमाणे आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतीस लागलेला वणवा कोट्यवधि अजागळ कीटकांच्या क्षुद्र पक्षवाताने किंवा मोठ्या किड्यांच्या शुष्क श्वासवाताने

लक्ष घालीन,' 'माझे स्वत:चे मत असे आहे की,' 'प्रत्येकाने आपल्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत.' अशी कितीतरी अिंग्रजी वळणाची वाक्ये वाचायला व ऐकायला मिळतात. काही जुने शब्द नव्या अर्थाने, अिंग्रजी शब्दांना पर्याय म्हणून, वापरले जात आहेत. भेट देणे (Visit) मर्यादा (Limitations) अधिकार (Right किंवा Power) औपचारिक (Formal) गंभीर (Serious) अित्यादि.

अिंग्रजी प्रमाणेच हिंदीचाहि अयोग्य परिणाम मराठीवर होऊ लागला आहे. हा विशेषत: पूर्व महाराष्ट्रात दिसून येतो. 'ठराव' न म्हणता 'प्रस्ताव' म्हणणे, 'प्रदर्शन' या ऐवजी 'प्रदर्शनी', 'समारंभ' यासाठी 'समारोह' वापरणे 'साजरा होअील' असे न म्हणता 'संपन्न होईल', असे म्हणणे, 'तवल्याची साथ' या ऐवजी 'तवल्याची संगत' करणे, 'स्वातंत्र्य दिन' न म्हणता 'स्वतंत्रता दिवस' म्हणणे, हे सर्व हिंदीच्या प्रभावाचेच द्योतक होय. अलीकडे याहून भयानक असा एक प्रकार सुरू होत आहे तो म्हणजे विभक्तिप्रत्यय किंवा अव्यय लावताना शब्दाचे सामान्यरूप न करणे. 'सतारवर', 'नागपूरमध्ये', 'सायकलवर', 'समाजविज्ञानचा', अि. मी आल्ये, मी गेल्ये, या ऐवजी मी आली, मी गेली हा नागपूराकडील प्रयोग 'मैं आअी', मैं गअी' या हिंदी प्रयोगावरूनच बहुधा आला असावा. 'करून राहिलो', देऊन राहिलो' हे प्रयोगहि उघडच, कर रहा हूँ, दे रहा हूँ, यावरून आलेले वाटतात. असो.

या कांही अनिष्ट बाबी झाल्या. काही इष्ट बाबींचाहि शेवटी उल्लेख करायला हवा. गेल्या अेक–दोन दर्शकात अनेक वर्गातून लेखक पुढे येत आहेत. ते आपल्या बोलीतील शब्दसंपत्ति ग्रांथिक मराठीत आणीत आहेत. प्रादेशिक स्वरूपाचं वाङ्मय निर्माण होत आहे त्यातून प्रादेशिक भाषेचं वैभव मध्यवर्ती मराठीच्या वैभवात भर टाकीत आहे. मराठीची सर्वांगीण वाढ होण्याच्या व तिची अभिव्यक्तिक्षमता वाढण्याच्या दृष्टीने या दोन्ही गोष्टी अिष्ट आहेत. मात्र वर्गीय अगर प्रादेशिक बोलीचा वृथा अभिमान पोसला जाऊ नये याची काळजी घेणे जरूर आहे.

प्रत्येक काळखंडात काही नवे शब्द, शब्दप्रयोग, संकेत, प्रतिमा अि. रूढ होत असतात. यापैकी काही भोवतालच्या समाज स्थितीतून सहजगत्या आलेले असतात तर कांही कवींनी व लेखकांनी जन्माला घातलेले असतात. आजच्या मराठीतहि असे कितीतरी शब्दप्रयोग, संकेत, प्रतिमा अि. आढळतील. उदा छायाचित्रण, प्रकाश टाकणे, नोंद घेणे, डोस पाजणे, बाँब टाकणे, मानवता, मूर्तिभंजन, स्फोटक परिस्थिति, काळाबाजार, आकाशवाणी, ध्वनिमुद्रण, श्रुतिका, लालफीत, लोणकढी थाप, रेशमी बंधन, हृदयाचे पाखरू, चांदण्याचे हात, गालावर

गुलाब फुलणे, अंगावर काटा उभा राहणे, चेहऱ्याची अिस्त्री विघडणे, धागेदोरे हाती लागणे, गाडी रूळावर येणे. पेन्शनीत निघणे, बारा वाजणे अि.

अलीकडे ग्रांथिक भाषा व शिष्टांची बोलभाषा यांच्यातील अंतर कमी कमी होत आहे. 'असे झाले पाहिजे'. या ऐवजी असं झालं पाहिजे, अशी रचना हे याचं एक उदाहरण म्हणून सांगता येअील.

आजच्या मराठीचं रूप हे असं आहे. तिचं साधेपणातील सौंदर्य व यथार्थ अभिव्यक्तीतील सामर्थ्य वाखाणण्या सारखं आहे.

(नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने.)

तुझ्या चिंतनात

गोड खुळी रात्र आज
आहे जरी चवथीची
भांगातले भाग्यचिन्ह
पुनवेचा चंद्र ल्याली

मनातून पाझरल्या
चांदण्यात उभी इथे
उंबऱ्याशी ओठंगून
डोळां साठवून प्राण

क्षणा मागे जाता क्षण
सावरतो शृंगाराला...
नकळत दिठी अडे
समोरच्या वळणाला

वाट अशी पाहताना
चवथीची रात्र निजे
अंधारली दिठी माझी
तुझ्या चिंतनात भिजे

—सरला भोळे

असे कसे घडे आज....

दिस आज काजळला
रात लाजेत बुडाली
गन्धवेड्या प्राजक्ताची
कळी कळी भोवळली—
—भोवळली कळी कळी
प्रात:वारा कुरवाळी
अगतिक अवकाश
अभावित अश्रु ढाळी
अश्रु ढाळी अवकाश
धरतीचा श्वास जड
असे कसे घडे आज
मना; वठलेला पुसे वड—

—दिनकर साळशिंगीकर

परिचय–परामर्ष

लोकसाहित्यसंपदा

लेखक व संपादक : ना. रा. शेंडे
प्रकाशक विदर्भ साहित्य संघ, नागपूर, मूल्य ६ रुपये.

लोकसाहित्याच्या विषयावर गेल्या वर्षी जी कांही पुस्तके प्रसिद्ध झाली त्यात 'लोकसाहित्यसंपदा' या ग्रंथाचे स्थान बरेच महत्वाचे ठरेल. या पुस्तकाचे लेखक श्री. ना. रा. शेंडे विदर्भातील एक कथाकार म्हणून मराठी वाचकांच्या परिचयाचे आहेत. श्री. शेंडे यांच्या कथा कादंबऱ्यावरून ते ग्रामीण वातावरणाशी किती समरस होतात हे कळते तद्वतच त्यांच्या रसिकतेचा आणि कलात्मकतेचा प्रत्ययहि त्यावरून येतो. त्या कथा कादंबऱ्यातून प्रगट होणारी रसिकता व सहृदयता या संकलनात्मक ग्रंथाच्याहि पानापानातून दृग्गोचर होते. पण ही निर्मितिक्षमता, योग्य ते संस्कार वाचकांच्या मनावर घडवू पाहण्याची तत्परता, विदर्भाच्या अस्मितेविषयीचा विलक्षण अभिमान, दलिताविषयीची सहृदयता आणि अभिजात रसिकता हे त्यांच्या अंगचे गुण अशा लोकसाहित्याच्या क्षेत्रात धोक्याच्या कंदिलासारखे जाणवत राहतात. पण बहुधा त्या गुणामुळेच या संग्रहात विविधता आली आहे हे विसरता येत नाही. विदर्भाची अस्मिता जागवू पाहणारी रामटेक, वैनगंगा, आंभोरे, कोंडनपूर, सिंदखेड, मेहुणपूर, चौरागड यावरील गीते दंडार, कलगीतुरा, वाणफल यासारखे करमणुकीचे पुकार, सोनुला–रानुला यासारखी कथागीते आणि सनवाऱ्या, सगुणा यासारख्या लोककथा अशी विविध स्वरूपाची मांडणी या संग्रहात आढळते ती या संग्रहाला भूषणभूत अशीच आहे.

लोकगीतातील वर्षाऋतु

पण श्री. शेंडे यांच्या या ग्रंथात सर्वात प्रथम जाणवणारा विशेष म्हणजे त्यांची 'वर्षागीते' हा होय. 'ऋतूत ऋतू वसंतऋतू' ही शिष्टसंस्कृतीची तर 'ऋतूत श्रेष्ठ वर्षाऋतु' ही लोकसंस्कृतीची आवड. विशेषतः शेतकरी जगाला तर हाच ऋतु फलदायक आणि म्हणूनच मंगलदायक वाटावा. श्री. शेंडे यांनी जी बरहमासी (पृ. १४८) दिली आहे तिची सुरवातच मुळी 'पहिली अखाडी मृगावरी' अशी आहे. पण हा आसाढहि कधीकधी कोरडा जातो. झाडाझुडपांच

अनुक्रमणिका

पाचोरा सुद्धा वाऱ्याने उडवून दिलेला असतो आणि त्यामुळे सारे रान रखरखीत वाटते अशावेळी शेतकऱ्यांनाच नव्हे तर रानीवनीच्या पाखरांनाहि उदास वाटते.

वारा वाहवत झाळाले नाही पान
जंगलच्या पाखराचे उदास जाले मन

तिकडे शेतकरीहि 'ये बाप्पा ये, पावसा ये आणि मृगाना शिरवा टाकून जा' म्हणून पावसाची प्रार्थना करीत असतो. हळुहळु आकाशात मेघ दिसु लागतात. लगेच झाडावरचा पक्षी शेतकऱ्यांना जागे करू लागतो.

सेताच्या बांधाने पणयुराजा बोले
दिस पेरनीचे आले

—आणि मग खेड्यातील बाया धानाची रोवणी करायला पावसातच निघतात आणि एकमेकीला साद घालतात.

चला बायानो बायानो रोवने बसून जाईल
आला सावनाचा मास डोंगर डोंगर चिखल
अरे रोवा घाई घाई बादल गरजते लई
घरामंदी वाट पाहत असल सई जाई ।।

श्रावणाची विविध गीते

श्रावणाच्या पाउसधाराचे व एकंदर उल्हासाचे वर्णन लोकगीतात बऱ्याच ठिकाणी आढळते. श्री. शेंडे यांनी पावसाच्या वर्षावाने जनजीवनात आणि त्यावरोबरच जनमानसात घडून येणाऱ्या प्रभावाचे वर्णन करणारी कितीतरी गीते या संग्रहात दिली आहेत. केवळ एवढेच करून ते थांबत नाहीत तर त्याचे सरस शब्दात रसग्रहणहि ते करतात. ही गीते तरी किती विविध अवस्या दाखविणारी. पावसाच्या वर्षावाने जेव्हा शेतकरी शेतात अडकून पडतो तेव्हा त्याच्या आईच्या मनाला वाटणारी चिंता, आपले झोपडे खचून गेले तर आजारी पतीचे कसे होईल याबद्दलची पत्नीच्या मनाची हुरहूर, नद्यांना पूर येतो तेव्हा आपल्या गाईगुरे सोडवायला मदतीसाठी धावत येणाऱ्या भावांचा वहिणींना वाटणारा अभिमान अशा अवस्थांचे वर्णन या संग्रहातील ओव्यात आणि गीतात आढळते ते सर्वच चटकदार वाटावे. गंमत अशी की याहि परिस्थितीत—'पावसाने जोर केला गांवामंदी कहर जाला' अशाहि अवस्येत एखादी रंगू साजसिंगार करून घाटावर जाते तर दुसरी कुणी गंगू रानात हिंडताना अवचित पावसाने भिजते; ओली होते आणि अशा स्थितीत कुणी पाहील की काय म्हणून लज्जित होते. श्री. शेंडे यांनी वरील 'माही साडीचोळी भिजली' या गीतातील शृंगारिक ध्वनि मोठ्या मनोज्ञ रीतीने उकलून दाखविला आहे.

ग्रामीण गीतातील कल्पनाविलास

पण श्रावणमासांच्या या गीताहून एक वेगळ्या तऱ्हेचे गीत श्री. शेंडे यांनी या संग्रहात दिले आहे ते ग्रामीणांच्या कल्पनाविलासाचे प्रतीक ठरावे असेच आहे.

श्रावण, भाद्रपद आणि वीज हे त्या गीताचे नांव आहे. त्यात श्रावण–भाद्रपद हे भाऊ आणि वीजुळी ही त्यांची वहीण अशी कल्पना करून एक कथा गुंफलेली आहे. विजुलीने श्रावणाजवळ बुट्टीदार चोळी मागितली तेव्हा श्रावण पाताळात गेला. पण तो लवकर येईना तेव्हा भादव घोड्यावरून निघाला; बिजुलीही हट्टाने त्याच्याबरोबर श्रावणाच्या शोधार्थ निघाली. पण–

शोध लावता लावता मेघराजाने अडवले
त्याहीच्या लडाईत विजुलीला आली कळ

घोळा धावत निघाला विजुलीने हाक दिली
तोल सुटून वह्यना गळवळत भुई गेली

वहीण मेली आणि तिच्या वियोगाने भाऊ झुरत–रडत राहिले तेव्हा देवाने त्यांच्या सांत्वनासाठी त्यांच्या पोटी अवतार घेतला.

मेली विजुळी कण्हत सावन भादव रडले
सरगीचे चांदतारे आसू पुसाले धावले

सावन–भादवाचा मासी देव घेते अवतार
गाते त्याहीची कीरत पान्यापावसाची धार

भावांचे वहिणीवरील प्रेम हा लोकसंस्कृतीचा एक आवडता विषय आणि तोहि येथे निसर्गाच्या रूपकात घोळून काढलेला ! त्यामुळे हे गीत अतीव हृदयंगम झाले आहे.

लोकजीवनातील ‘कारुण्य’

लोकजीवनातील कारुण्य भाव हा श्री. शेंडे यांच्या पुस्तकात आढळणारा आणखी एक विशेष.

या दृष्टीने ‘भेटवा माय माझी’ ‘सुनेची कसोटी’ ‘नको झोंबू तान्या’ ‘माझे काळीज हरपले’ ही गीते मूळात पाहण्यासारखी आहेत. आईच्या ओढीने तळमळणारी पोर आणि मुलाविषयीच्या वात्सल्याने गहिवरणारी माय यामध्ये कुणाचा शोक जास्त हृदयंगम ठरेल हे रसिकच सांगू शकतील. ‘गरीबीची ग्रामीण गीते’ या प्रकरणातील सारीच गीते अशीच चटका लावून सोडणारी आहेत. लोकसंस्कृतीतील सर्वात करूण वाटणारा भाग कोणता असेल तर तो स्त्रीजीवन हा होय. बालपणापासून लग्नामुळे घडलेला आईबापांचा वियोग, तरूणपणी

अनुक्रमणिका

सासुरवासाचा तीव्र जाच आणि दारिद्र्यामुळे कधी पतीची तर कधी पुत्राची कायमची ताटातूट होण्याचा प्रसंग हे सारे पाहिले म्हणजे करूणस्य मूर्तिरथवाशरीरिणी विरहव्यथेव' हे भवभूतीने सीतेविषयी काढलेले उद्‌गार गरीब स्त्रीलाहि लागू पडतात असे म्हणावेसे वाटते.

हृदयंगम दूत–काव्य

या स्त्रीजीवनातील एक हृदयंगम दूतकाव्य म्हणून 'रूणझुण पाखरा' या गीताचा निर्देश करावासा वाटतो. या गीताची नायिका बयना सासुरवासाने शिणली आहे. बऱ्याच दिवसापासून तिला आपल्या माहेरची कांहीच वार्ता नाही. म्हणून ती एका रानपाखराला आपल्या आईवापांकडे पाठवते. बहनाचे आईवाप तिला 'येत्या शिवरात्रीला भेटू' म्हणून उलट निरोप पाठवतात. पण बहनाची दुष्ट सासू त्या पाखराला वयनेपर्यंत पोचू न देता मार्गातच मारून टाकते. अखेरीस कांहीच निरोप न कळल्यामुळे कष्टी झालेली वयना आईवापांच्या विरहाच्या दुःखांत झुरणीला येऊन मरते. एकंदरीत हे सारेच गीत हृदयंगम आणि रसाळ आहे.

संस्कृत प्राकृत काव्यात दूतकाव्याची वा संदेशकाव्याची परंपरा वाल्मीकि कालिदासापासून चालू आहे. पण तेथल्या नायिका पति विरहाने दुःखी असतात तर या लोकजीवनातील विरहिणी आईवापांच्या विरहाने कष्टी झालेल्या आढळतात. वयनाची ही कथा मी वाचली तेव्हा मला ज्ञानेश्वरांच्या 'उडरे काऊ उडरे काऊ' या पदाची आठवण झाली आणि लक्षात आले की संतपरंपरेतली ती आद्य विरहिणीहि अशीच माहेराच्या वियोगाने तळमळणारी आहे.

लोकसंस्कृतीतील सत्वनिष्ठा

श्री. शेंडे यांच्या 'साहित्यसंपदेतील सर्वात शेवटचे मला जाणवलेले महत्वाचे वैशिष्टय म्हणजे त्या गीतातून दिसणारी लोकसंस्कृतीची सत्व राखण्याची तळमळ. सनवाऱ्या या गोष्टीच्या उपसंहारातला शेषभक्त सांगतो 'सत् राखलं त पुन्य आन सत् सोललं का मंग पाप लागते' लोकसंस्कृतीच्या पापपुण्याच्या या कल्पना किती ठळक आणि ठसकेदार असतात आणि बहुधा म्हणूनच मलीचे आईबाप मुलीला लग्नानंतर निरोप देताना एकच गोष्ट सांगत असतात की बाई,

जा पोरी सासरी मान राख सासऱ्याचा
सासूचे पाय पुंज वर शब्द झेल तिचा
लाज राख माही नाक ठेव पोरी माहेरचे
जाऊं दे गेला परान् सत राख आवरूचे ॥

ग्रामीण संस्कृतीचा हा कळवळ्याचा उपदेश आजपर्यंत कितीतरी ग्रामवधूंनी पाळला आणि त्यांच्याच पुण्याईने हे जग चालते असा लोकसंस्कृतीचा विश्वास

आहे. किंबहुना अशा पुण्याईनेच रमा महारणीच्या पोटी चोखोबासारखे संत जन्माला आले.

ग्रामवधूंच्या या निष्ठेचे चित्रण 'बयनाबाई' सारख्या एका कष्टाळू सुशील गृहिणी वर लिहिलेल्या गीतात आढळते.

बयनाबाईचे घर निंबाच्या झाडाखाल
दुध्याभोपळयाचे वेल कवलाकवलावर साल
बयनाबाईचं रांधन वास जाते देवाघरी
भोजनाले बलावते राधा इठ्ठल मंदिरी
बयनाबाईची खोली सिक्यावर दूधभात
बयनाबाईचे पाहून सत घरा आले साधुसंत ।।

साधुसंतासारखे थोर पुण्यात्मे बयनाबाईच्या सत्वनिष्ठेला भुलून तिच्या घरी आपण होऊन येतात हा म्हटला तर बयनाबाईचा आणि म्हटला तर त्यांच्या लोकसंस्कृतीचा विजय होय. अशा विजयाची दखल घेणारी या 'लोकसाहित्य-संपदे'तील गीते वाचली म्हणजे श्री. शेंडे यांच्या अडीच तपाच्या परिश्रमांचे कौतुक वाटते आणि सार्थकहि वाटते.

—प्रा. भा. श्री. परांजपे

उघडि नयन

सामाजिक क्षेत्राप्रमाणेच साहित्यक्षेत्रातहि रूढिवाद हा अनर्थकारक ठरत असतो. मनुष्याची परंपराप्रियता याहि ठिकाणी प्रभाव गाजविल्याशिवाय राहात नाही. या परंपराप्रियतेमुळेच एखाद्या साहित्यिकाच्या भाग्यात लोकप्रियतेचे माप आवश्यकतेहून अधिक प्रमाणात आढळून येते. तर काही अभागी साहित्यसेवकांच्या गुणसंभाराचीहि यथायोग्य बूज राखली जात नाही. आधुनिक मराठी कवींचे स्मरण होताच कविवर्य केशवसुत, रे. टिळक, गोविंदाग्रज, विनायक आणि बालकवी यांचीच नावे दृष्टीपुढे उभी होतात. पण याच नामावलीत आपल्या प्रतिभासामर्थ्याने सहज समाविष्ट होऊ शकणारे कविवर्य रेंदाळकरांचे नाव मात्र, मराठी काव्यसमीक्षकांचा अपवाद वगळल्यास, रसिकांच्या सहसा स्मरणात येत नाही ! साहित्यक्षेत्रातील रूढिवादामुळे ज्याचेवर अन्याय झाला आहे अशा कवींत कविवर्य रेंदाळकरांचा समावेश प्रामुख्याने करावासा वाटतो. सुदैवाने महाराष्ट्रा-

तील एक सुप्रसिद्ध कवी आणि काव्यसमीक्षक प्रा. भ. श्री. पंडित यांनी रेंदाळ-करांवरील हा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. रेंदाळकरांच्या विपुल काव्यसंभारातून निवडक अशा एकशे एक कवितांचा संग्रह 'उघडि नयन' * या शीर्षकाखाली त्यांनी नुकताच संपादित केला असून पुण्याच्या विदर्भ-मराठवाडा बुक कंपनीच्या अ. ज. प्रभू ह्यांनी तो प्रकाशित केला आहे. रेंदाळरांच्या काव्याच्या अभ्यासाला या संग्रहाच्या प्रकाशनाद्वारे अशा प्रकारे चालना दिल्याबद्दल उभय-तांना धन्यवाद द्यावे असे कुणा रसिकाला वाटणार नाही ?

याचा अर्थ रेंदाळकरांचे काव्य संग्रहरूपाने आज प्रथमतःच प्रकाशित होत आहे असा नाही. रेंदाळकरांच्या ह्यातीतच मंदारमंजरी, नीतिमंडन, पद्यपुष्पांजली, अन्योक्ति–मुक्तांजली, मोहिनी इत्यादि त्यांची लघुकाव्ये प्रकाशित झालेली होती. १९२० सालच्या २२ नोव्हेंबरला रेंदाळकरांचा मृत्यु वयाच्या केवळ तेहेतीसव्या वर्षी झाला आणि १९२४ मध्ये त्यांचे परममित्र श्री. वामन जनार्दन कुंटे ह्यांनी त्यांच्या कवितेचा प्रथम खंड प्रकाशित करून आपल्या दिवंगत मित्रासंबंधीचे कर्तव्य पार पाडले. तथापी, अजूनहि रेंदाळकरांच्या बऱ्याच कविता अप्रकाशित होत्या. या सर्व कवितांचे संशोधन करून त्यांतील निवडक अशा १०१ कवितांचे संकलन प्रा. भ. श्री. पंडितांनी 'उघडि नयन' मध्ये केले आहे. रेंदाळकरांच्या कवितांचे संपादन करताना ज्या चिकित्सक दृष्टीचा त्यांनी अवलंब केला, ती स्पृहणीय वाटते. संपादकीय निवेदनात त्यांनी आपल्या संपादनाच्या कार्याची जी रूपरेषा दिली त्यावरून रेंदाळकरांच्या काव्यसंग्रहाची सिद्धता करतांना त्यांनी केवढी चिकाटी व परिश्रमशीलता प्रगट केली त्याचा प्रत्यय येतो. रेंदाळकरांच्या चरित्राबद्दल साधार लिहिता यावे यासाठी रेंदाळकरांचे परम स्नेही कविवर्य नागेश गणेश नवरे, आणि त्यांच्या काव्यसंग्रहाचे पहिले संपादक व त्यांचे प्रियमित्र श्री. वामनराव कुंटे इत्यादिकांशी पत्रव्यवहार करून व प्रत्यक्ष भेटून प्रा. पंडितांनी माहिती गोळा केली व रेंदाळकरांच्या जीवनावर अधिक प्रकाश टाकण्याचे महनीय कार्य केले. पन्नास पृष्ठांचे रेंदाळकरांचे चरित्र आणि तेवढेच विस्तृत असे 'रेंदाळ-करांच्या कवितेचे पर्यालोचन' यांची जोड मिळाल्याने प्रस्तुत संग्रह खरोखरीच अत्यंत उपयुक्त झाला आहे. ह्या संग्रहाचे वरवर जरी वाचन केले तरी प्रा. पंडितांच्या सूक्ष्म काव्याभ्यासाचे आणि परिश्रमशीलतेचे दर्शन घडल्यावाचून राहात नाही. आधुनिक मराठी काव्याचे इतिहासकार म्हणून प्रा. पंडित आपल्या काव्यसमा-

---

* उघडि नयन–(रेंदाळकरांच्या १०१ निवडक कविता) संपादक प्रा. भ. श्री. पंडित. प्रकाशक विदर्भ मराठवाडा बुक कंपनी. १३२० शुक्रवार पेठ, पुणे २. पृष्ठे ३०४. मूल्य रु. ६–००

लोचनात्मक ग्रंथाने प्रसिद्धच आहेत. परंतु, काव्यावर अव्यभिचारी निष्ठा असल्याने मराठी काव्यासंबंधीचे त्यांचे संशोधन नेहमी चालूच असते. रे. टिळक, चंद्रशेखर इत्यादिकांच्या काव्यासंबंधी त्यांनी 'युगवाणी' तून प्रसिद्ध केलेले प्रदीर्घ लेख त्यांच्या सखोल अध्ययनाची व मार्मिक टीकादृष्टीची कल्पना यथार्थतेने आणून देतात. त्या त्या कवीच्या कविता प्रकाशित करणाऱ्या वृत्तपत्रांच्या फायली मुळातून वाचण्याचे परिश्रम ते घेतात व त्यामुळे वाचकांना बरेचदा अगदी नवीन अशा माहितीचा लाभ होतो. विनायकांची कविता संपादित करतानाहि त्यांच्या याच प्रवृत्तीचा परिचय घडून आला आहे. प्रस्तुत संग्रहातूनहि त्यांच्या या चिकित्सक वृत्तीचे दर्शन घडते. मासिक मनोरंजन, करमणूक, विविधज्ञानविस्तार इत्यादि नियतकालिकांचे सूक्ष्म अवलोकन करून त्यांनी आपल्या माहितीला साधार बनविले आहे. काव्यरत्नावली, विविधज्ञानविस्तार इत्यादि नियतकालिकातून गाजलेल्या कवितेच्या निर्यमकत्वाबद्दलच्या वादाचा साधार इतिहासहि प्रा. पंडितांच्या या 'पर्यालोचना'तून कळून येतो.

रेंदाळकरांचे नाव, निर्यमक कवितेचा निर्भय पुरस्कर्ता म्हणून प्रामुख्याने घेतले जाते. मात्र निर्यमकतेच्या वादाच्या आखाड्यात स्वतः रेंदाळकर हिरीरीने कधीच उतरले नव्हते. निसर्गतःच नादमधुर पदन्यास टाकीत चालणाऱ्या काव्यदेवीला यमकप्रासादि कृत्रिमांची आवश्यकता नाही असे त्यांचे प्रामाणिक मत होते काव्यदेवीला उद्देशून रेंदाळकर म्हणतात–

> निसर्गमृदु पाद हे रुचिर काव्यदेवी ! तुझे,
> कशास मग सांग या यमकशृंखला घातल्या ?
> तुझी ललित नर्तने कुठुनि चालती स्वैरशी ?
> स्वभावमधुरे ! किमर्थ तुज भूषणांची स्पृहा ?–

भावघन हे काव्याचे सामर्थ्य असून संस्कृतातील निर्यमकतेचा अवलंब काव्याला, स्वाभाविक सौंदर्य प्राप्त करून दिल्याशिवाय राहणार नाही, असा त्यांचा दृष्टिकोण होता. स्वतः रेंदाळकरांची कविता भावमाधुर्याने व पदलालित्याने इतकी ओतप्रोत असे की निर्यमकत्वाचा साधार पुरस्कार न बोलताच ती करून जाई ! यामुळेच डॉक्टर गुणे यांच्यासारख्या भाषाशास्त्रज्ञालाहि निर्यमक रचनेला विरोध करीत असता देखील रेंदाळकरांच्या पदलालित्याचे मुक्तकंठाने कौतुक करावेसे वाटले. सुललित शब्दयोजना हे रेंदाळकरांच्या कवितेचे महत्वाचे वैशिष्टय बघायचे असल्यास त्यांची प्रबोधन ही कविता पहावी.

> उघडि नयन ! रम्य उषा हसत हसत आली !
> अरुणकिरणमय वसना अवनी ही ल्याली !
>
> मंजुमधुर गान करित,
> आनंदे भुवन भरित
> विहगवृंद गगनि उडत या सुरम्य काली !

अनुक्रमणिका

शब्दांतील संगीतसामर्थ्य जाणून त्याचा उपयोग करण्याचे कौशल्य रेंदाळकरांना अप्रतिम साधले होते. त्यांची निर्यमक कविताहि म्हणूनच अत्यंत सुंदर वाटते. काव्यातील नावीन्याचे रेंदाळकर हे पुरस्कर्ते होते. केशवसुतांचा गौरव म्हणूनच ते करतात. इतकेच नव्हे तर स्वतःला केशवसुतांचा शिष्य म्हणवून घेतात. सामाजिक अन्याय त्यांनीहि आपल्या काव्यातून वेशीवर टांगलेला दिसतो. वासनामुक्त स्त्री-पुरुष प्रेमाचा (प्लेटॉनिक लव्ह) त्यांनी पुरस्कार केला आहे. इंग्रजी व बंगाली या भाषांच्या व्यासंगामुळे त्यातील उत्तमोत्तम काव्यांचा भावानुवाद रेंदाळकरांनी कुशलतेने केला असून त्यांचे रूपांतरकौशल्य केशवसुतांच्या कौशल्यापेक्षाहि अधिक उच्च दर्जाचे होते असे प्रा. पंडितांनी एकाच इंग्रजी कवितेचे केशवसुत व रेंदाळकर यांनी केलेल्या भाषांतराच्या (रुपांतराच्या) तुलनेने दाखवून दिले आहे. रेंदाळकरांच्या कवितेचे पर्यालोचन करताना त्यांच्या समग्र कविता दृष्टीसमोर ठेवल्याने प्रा. पंडितांचा हा पन्नास पृष्ठांचा प्रबंध म्हणजे रेंदाळकरांच्या काव्यावरील अधिकृत टीका होय असे म्हणता येईल.

रेंदाळकरांच्या टीकाकारांचाहि परामर्श प्रा. पंडितांनी घेतला आहे. त्यांच्या काव्याचे, तत्कालीन परिस्थितीचे आणि मराठी काव्यक्षेत्रातील काही वादांचे दर्शन घडविणारा हा संग्रह म्हणजे प्रा. पंडितांच्या काव्यविषयक व्यासंगाचा, त्यांच्या चिकित्सक रसिकत्वाचा आणि साहित्यिक श्रद्धेचा पुरावाच होय असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही ! वा. म. जोशी ह्यांनी साहित्यसम्राट न. चिं. केळकरांच्या संदर्भात वापरलेले शब्द याहि ठिकाणी वापरायचे तर प्रा. भ. श्री. पंडित हे साहित्यक्षेत्रातील भक्तियोगी आहेत, हे या संपादनाद्वारे उत्कृष्टपणे कळून येते ! मराठी काव्याच्या रसिकाने सदैव ऋणी राहावे, इतकी ही मोलाची कामगिरी प्रा. पंडितांनी केलेली आहे यात शंका नाही.

प्रा. वसंत वऱ्हाडपांडे

स्वप्नगंधा

लेखक--**सुधीर देव**, प्रकाशक--**निर्मल साहित्य प्रकाशन**, सितावर्डी, नागपूर. पृष्ठें ७४ किंमत तीन रुपये.

पावसाळ्यात नदीला पूर येतो. आणि त्या पुरामुळे नदीचे पाणी गढूळ, होते. हा गढूळपणा रोगराईला कारण होतो. परन्तु शरदात ते पाणी निवळले आणि त्यातला गाळ नाहीसा झाला, म्हणजे मग, त्या नदीचा नितळ तळ स्फटिकाप्रमाणे शुभ्र, स्वच्छ व नितळ शंख दिसू लागतो. नदीचे पाणी मग आरोग्यकारक व निरामय असते. त्याचे सेवन केल्यास रुचिकरपणामुळे आनंद होतो.

साहित्याचे असेच आहे. प्रत्येक पिढीबरोबर साहित्यात परिवर्तन होत असते. नदीची प्रत्येक लहर जशी स्वतंत्र असते व पुढे जाते, तसेच प्रत्येक पिढी-तले साहित्य स्वतंत्र व पुरोगामी असते. अशा रीतीने ते जरी स्वतंत्र व पुरो-गामी असले, तरी परंपरेपासून वेगळे नसते हे लक्षात ठेवले पाहिजे. त्याचा मागील साहित्याशी निकटचा संबंध असतो; आणि पुढील साहित्याचा मार्ग ते खुला करीत असते,–

" पुराणमित्येव न साधु सर्वं । न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ॥
सन्त: परीक्षान्यतरत् भजन्ते । मूर्ख: परप्रत्ययनेयबुद्धि: ॥"

या कालिदासोक्तीचा सारांश हाच आहे. जुने ते सारे सोने हेहि बरोबर नाही, त्याचप्रमाणे नवे ते सारे हवे हेहि बरोबर नाही. शहाणे परीक्षा करतात व जुन्यात जे चांगले आहे त्याचा, व नव्यात जे उत्तम आहे त्याचा, स्वीकार करतात. मूर्ख मात्र प्रचीन परंपरेला चिकटून राहातात.

कांही काळापूर्वी मराठी साहित्यात नवकाव्याला पूर आला होता. या पूरात धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी दुसऱ्या व तिसऱ्या पुरुषार्थाला अवास्तव महत्त्व आले होते. अर्थ व काम याच्याकडे मनुष्यमात्राची स्वाभाविक प्रवृत्ति असते. परंतु धर्म व मोक्ष यांच्याकडे ती बुद्धिपुरस्सर वळवावी लागते. कार्लमार्क्सचा अर्थवाद आणि फ्राइड युंग व ऍडलर यांचा कामवाद यांनी मराठी नवकाव्य फुगले होते. यासाठी नवकवींनी योजलेल्या प्रतिमा अनोळख्या व तिरक्या होत्या. त्याच्यामुळे काव्याचा आशय सुगम होण्याऐवजी उलट अंधुक, अस्पष्ट व संदिग्ध बनला होता. कवींची भाषा व्याकरणाला धाब्यावर बसविणारी व गुंतागुंतीची आणि किचकट झाली होती. त्यामुळे नवकाव्य हा विडंबनाचा विषय झाला होता.

अतिशय आनंदाची गोष्ट आहे की, अगदी अलिकडे नवकवींच्या कवि-तेचे स्वरूप स्वच्छ व सुंदर होत आहे. पुढे जिकडे तिकडे हिरवे हिरवे गार आहे आणि मागे सारे रुक्ष वाळवंट आहे ही नवकवींची समजूत बरोबर नसल्याचे आता त्यांच्या लक्षात येत आहे. असे विधान मी करीत आहे, याला कारण माझ्या समोर टेबलावर पडलेला 'स्वप्नगंधा' हा चिमुकला कवितासंग्रह आहे या कवितासंग्रहातील कवितांचे निर्माते श्रीयुत सुधीर देव हे एक नवोदित तारे आहेत. अजून ते क्षितिजाच्या जवळपास रेंगाळत आहेत. आकाशाच्या मध्य-भागी पोचण्यास अजून वेळ लागेल. सुधीर देवांच्या वाचनात अलिकडील कविता आहेत. तेव्हां त्यांची वहुतेक कविता त्या कवितांच्या धाटणीची आहे. तिच्यात अनुप्रेरणेपेक्षा अनुकरण आणि प्रसारण व पुनरावृत्ति अधिक आहे. अन्य तरुण कवींप्रमाणेच देवांची वृत्ति तंद्राळू व स्वप्नाळू आहे. अर्थात् या साऱ्या गोष्टी

कालसापेक्ष आहेत; परंतु वाढत्या वयाबरोबर या कवींनी व्यासंग वाढवला पाहिजे व अभ्यासाचे व्रत अखंड चालवले पाहिजे. गंगा स्वतंत्र खरी. पण तिला अनेक उपनद्या मिळतात. त्यामुळे तिचे पात्र विशाल होत जाते व भव्यतेमुळे ती पूजनीय वाटते हे विसरून चालणार नाही.

अलिकडच्या कवितेचे वैशिष्ट्य तिच्या वेधक व आकर्षक अभिव्यक्तीत आहे. अभिव्यक्तीच्या दृष्टीने मराठी भाषा किती नवी नवी रूपे धारण करीत आहे हे नवकविता व नवकथा यांच्या समीक्षणाने सहज लक्षात येण्याजोगे आहे. श्रीयुत सुधीर देव यांच्या 'स्वप्नगंधे'त अशी मनोरम स्थळे अनेक आहेत. 'आभाळ' या गीतात ते चांदण्या, चांदणे, रात्र, सुगंध इत्यादिकांचे सौंदर्य आविष्कृत करताना या अभिव्यक्तीची योजना करतात,—

'काळ्या काळ्या आभाळाच्या गोऱ्या गोऱ्या छोरी
हांसतात फेंकुनिया प्रकाशाची जाळी!
काळी काळी रात्र झुले अशा काळ्या वेळीं
क्षितिजांस बांधुनिया सुगंधाची झोळी!
चंदनाचा लावुनिया टिळा काळ्या भाळीं
ऐकताना लागे लोरी ब्रह्मानंदीं टाळी!"

——वरील ओळीत 'वेळीं' बद्दल 'काळी,' 'झोळी' बद्दल 'दोली' आणि 'टिळा काळ्या' बद्दल 'शुभ्र टिळा' या शब्दांची योजना झाली असती, तर अधिक खुलली असती. 'लोरी' हा हिंदी शब्द पुष्कळ मराठी वाचकांना कळणार नाही.

श्रीयुत सुधीर देव यांचे 'वेदना' हे गीत वेदनेइतकेच आर्त आहे. त्या गीतातला भावाविष्कार हृदयस्पर्शी आहे. गीत भावनेने सांद्र व आर्द्र आहे,—

"यातना माझ्या कुणाला सांगुनी कळणार नाहीं!
बोलक्या डोळ्यांत माझ्या, वेदना दिसणार नाही!!
बोलताना शब्द माझा, रे! कधी अडलाच नाही
चालताना पाय माझे, रे! कधी थकलेच नाही"

यांच्यापाशी कवींची भाववृत्ति आहे, तीव्र संवेदन आहे, ते शब्दात साकार करण्याची शक्ति आहे व मोहक अभिव्यक्ति आहे. या नैसर्गिक गुणांना जर परिश्रमांची जोड मिळेल, तर ते मातीतून सुगंध निर्माण करतील अशी मला आशा आहे.

—भवानीशंकर श्रीधर पंडित

संघवार्ता

श्री. गो. स. देहाडराय
सरचिटणीस
वि. सा. संघ, नागपूर

१. भेटी व सत्कार:–मराठीचे श्रेष्ठ साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर ह्यांनी वि. सा. संघास दि. ११–११–६४ रोजी सायंकाळी ६ वाजता भेट दिली. त्यांचा वि. सा. संघाकडून सत्कार करण्यात आला.

मराठी साहित्य महामंडळाचे चिटणीस व प्रसिद्ध पत्रकार श्री. श्री. शं. नवरे ह्यांनी रविवार दिनांक २२–११–६४ रोजी सायंकाळी ७–३० वाजता विदर्भ साहित्य संघास भेट दिली. त्यावेळी त्यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री माननीय श्री. बाळासाहेब देसाई यांनी दिनांक १४–१२–६४ रोजी सायंकाळी वि. सा. संघास भेट दिली. त्यांचे स्वागत करून त्यांना श्री. शिवाजी ग्रंथालयाचे बांधकाम दाखविण्यात आले व त्यासंबंधी सर्व उपयुक्त माहिती त्यांना देण्यात आली.

श्री. आर. वी. उपाख्य बाबासाहेब घोरपडे संपादक–'सकाळ' व सदस्य–विधान परिषद यांनी दि. १९–१२–६४ रोजी वि. सा. संघास सायंकाळी भेट दिली. त्याप्रसंगी त्यांचा सत्कार करण्यात आला.

श्री. कवि यशवंत यांनी वि. सा. संघास दि. ३१–१–६५ रोजी सकाळी ९ वाजता भेट दिली. त्यावेळी समयोचित कविता म्हणून दाखविण्यात आल्या व नंतर त्यांचा सत्कार केला गेला.

निरोप:–श्री. प्रा. श्री. गो. काशीकर, सरचिटणीस यांना अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात प्रथम श्रेणीची बढतीची जागा मिळाल्याबद्दल दिनांक १२–१२–६४ ला त्यांना प्रेमाचा निरोप वि. सा. संघाकडून देण्यात आला. त्याप्रसंगी उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, प्रा. श्री. मा. कुलकर्णी, प्रा. य. गो. मालोदे, श्री. देहाडराय प्रा. माणिक बैतुले यांनी भाषणे करून आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या.

कार्यकारिणी:–दिनांक २७–१२–६४ ला पुसद येथे झालेल्या केंद्रीय कार्यकारिणीच्या सभेत प्रा. काशीकर यांचा राजीनामा मंजूर होऊन श्री. गो. स. देहाडराय यांची सरचिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली. प्रा. काशीकर हे चिटणीस म्हणून नियुक्त करण्यात आले.

अनुक्रमणिका

(३) नाट्यसमितिः—वि. सा. संघाच्या नाट्य समीतीच्या वतीने दरवर्षी-प्रमाणे ह्या वर्षी 'श्री खोलकुटे' ढाल महाविद्यालयीन स्पर्धा घेण्यात आली. श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षते खाली हा समारंभ दि. ९ व १० जाने. १९६५ ला झाला. या स्पर्धेत श्री विश्वेश्वर'य्या इंजिनिअरिंग कॉलेजने ढाळ जिंकली· गतवर्षीहि याच महाविद्यालयाने ढाल जिंकली होती. सतत तीन वर्षे ढाल मिळविल्यास ती ढाल कायमची देण्यांत येईल व तिच्या जागी दुसरी ढाल वि. सा. संघास देण्यांत येईल असे श्री. बाबासाहेब खोलकुटे यांनी आश्वासन दिले. प्रथम क्र. पुरुष भूमिका श्री. नांदे रु. १५/— व स्त्री भूमिका कु. तांबे रु. १५/— अशी पारितोषके देण्यात आली.

बालनाट्य महोत्सव—

विदर्भ साहित्य संघातर्फे बालनाट्य महोत्सव दिनांक ९–१–६५ व १०–१–६५ अशा दोन दिवशी उत्साहाने साजरा करण्यात आला. पहिले बक्षिस श्री. किशोर माटेगावकर रु. ५०/— दुसरे बक्षीस श्री. सुधीर रु. ३०/— तिसरे बक्षिस श्री. म. गो. वेलणकर रु. २०/— अशी पारितोषिके देण्यांत आली. शिवाय खास बक्षिसे अमरनाट्य संस्था रु. २५/— व नॉन गॅझेटेड पोस्ट ऑडिट असोसिएशन रु. ५१/— ही देण्यात आली.

(४) सांस्कृतिक कार्यक्रमः—वि. सा. संघाचा वर्धापनदिन दि. १४–१–६५ रोजी पूर्वाध्यक्ष श्री. डॉ. शं. दा. पेंडसे यांचे अध्यक्षतेखाली साजरा केला. नव्य जुन्याचे संबंध स्नेहाचे असले तरच साहित्य व साहित्यसंघ हे पुढे पाऊल टाकू शकेल असे श्री. पेंडसे यांनी प्रतिपादन केले. साहित्यविषयक चर्चा व जुन्या आठवणी सांगणे असा कार्यक्रम झाला. चर्चेत श्री. गो. स. देहाडराय, श्री. वसंत खेर्डीकर, श्री. गोवर्धनदासजी अग्रवाल, श्री. वा. के. अत्रे, श्री. ह. मा. उपाध्ये आदिनी भाग घेतला.

कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला

यंदा वि. सा. संघ, धनवटे रंगमंदिरांत ही व्याख्यानमाला दि. १९–१–६५ ते २१–१–६५ पर्यंत दररोज सायंकाळी ६ वाजता महामहोपाध्याय श्री. बाळ-शास्त्री हरदास यांनी 'विजय नगरचे वैभवशाली हिंदु साम्राज्य' ह्या विषयावर गुंफली. व्याख्याने माहितीपूर्ण व उद्‌बोधक झाली.

गडकरी स्मृतिदिन

प्रतिवर्षाप्रमाणे कै. राम गणेश गडकरी यांचा स्मृतिदिन दि. २३ व २४ जानेवारी १९६५ या दोन दिवशी साजरा करण्यात आला. दि. २३ रोजी सावनेर येथे नियोजित वक्ते प्रा. म. ना. लोही यांचे गडकऱ्यांच्या वाङ्मयावर

उद्बोधक भाषण झाले. तत्पूर्वी गडकरी स्मारक समितीचे आमंत्रक श्री. र. वि. कुलकर्णी यांनी गडकऱ्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला व स्थानिक कार्यक्रमाचे आयोजक श्री. यादवराव उपाध्ये यांनी प्रास्ताविक भाषण केले. अध्यक्षस्थानी डॉ. देशमुख होते.

दि. २४ रोजी नागपूरला वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली स्मृतिदिन समारंभ साजरा झाला. या प्रसंगी प्रा. म. ना. लोही यांनी "नाटककार गडकऱ्यांची प्रेरणा व प्रतिभा' या विषयावर अभ्यासपूर्ण प्रबंध वाचला. त्यानंतर श्री. शरद सुतवणे यांनी कै. गडकरी यांच्या निवडक कविता गाऊन दाखविल्या.

(५) शोकसभाः–विदर्भ साहित्य संघातर्फे गडकरी सभागृहांत दिनांक १८–२–६५ रोजी कै. आनंदराव टेकाडे यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यासाठी एक खास सभा घेण्यात येऊन मृतात्म्याला मक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रस्तुत दुखवट्याचा ठराव त्यांच्या कुटुंबियांकडे पाठविण्यात आला.

(६) वि. सा. संघाची त्रैवार्षिक निवडणूकः–वि. सा. संघाची त्रैवार्षिक (सन १९६५ ते १९६८) निवडणूक होऊन तिचा निकाल दिनांक २१–२–६५ रोजी निर्वाचन अधिकारी श्री. मु. ह. मुंजे यांनी जाहीर केला. श्री. वा. कृ. चोरघडे हे अध्यक्ष म्हणून निवडून आले. कार्यकारिणीवर पुढील १६ सदस्य निवडून आले.

१. श्री. म. रा. खोलकुटे, २. श्री. बाबुराव चिमोटे, ३. श्री. पु. व्यं. दारव्हेकर, ४. श्री. शं. बा. शास्त्री, ५. श्री. म. ल. देशमुख, ६. सौ. सरलाबाई भावे, ७. श्री. भाऊ मांडवकर, ८. श्री. तु. ना. काटकर, ९. श्री. ग. स. देशपांडे, १०. श्री. मा. नी. गलगलीकर, ११. श्री. व्ही. ए. तारे, १२. श्री. वा. के. अत्रे, १३. श्री. वा. गो. चोरघडे, १४. श्री. पुंडलिकराव घुमाळे, १५. श्री. ना. रा. हार्डीकर, १६. श्री. गोपाळराव पाठक

निकाल जाहिर झाल्यानंतर सरचिटणीस श्री. देहाडराय यांनी सर्वांचे अभिनंदन केले व निर्वाचनाधिकारी अॅड्. मु. ह. मुंजे यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे आभार मानले.

नवीन पदाधिकारी

विदर्भ साहित्य संघाच्या नवीन निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा शनिवार दि. ७–३.६५ रोजी सकाळी ८ वाजता श्री. शं. बा. शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी सभेचे प्रयोजन सांगितले. सभेत खालील पदाधिकारी निवडण्यांत आले.

(१) उपाध्यक्ष-श्री. शं. बा. शास्त्री, (२) सरचिटणीस-श्री. बाबुराव चिमोटे, (३) चिटणीस-श्री. तु. ना. काटकर, श्री. भाऊ मांडवकर, श्री. म. ल. देशमुख, (४) कोषाध्यक्ष-सौ. सरलाबाई मावे, (५) संपादक-'युगवाणी'- श्री. मा. नी. गलगलीकर, (६) संचालक, परिक्षा समिती-श्री. ग. स. देशपांडे

वरील कार्यकारी मंडळाच्या सभेनंतर कै. श्री. गणपतराव जोशी यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्री. दारव्हेकर यांचे भाषण झाले व सभेने आपली आदरांजली अर्पण केली.

आजीव सभासद:-श्री. सखाराम नारायण खर्डेकर, नागपूर यांनी वि. सा. संघास रु. १००/- देऊन आजीव सभासद झाल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

शाखावृत्त

(१) **बुलढाणा**:-विदर्भ साहित्य संघाच्या बुलढाणा शाखेच्या मदतीसाठी शनिवार दिनांक ३ ऑक्टोबर १९६४ रोजी रात्रौ ९ वाजता टिळक नाटयक्रीडा-मंदरात येथील हौशी कलावंतांनी कै. शं. प. जोशी कृत 'खडाष्टक' या विनोदी नाटकाचा यशस्वी प्रयोग सादर केला.

(२) **काटोल**:-विदर्भ साहित्य संघाच्या काटोल शाखेच्या सभासदांची कार्यकारिणी दिनांक २२-१०-६४ रोजी १९६४-६५ सालाकरिता खालील प्रमाणे निवडण्यांत आली.

(१) अध्यक्ष-श्री. जीवनलालजी चांडक, (२) उपाध्यक्ष-प्राचार्य श्री. एम्. के. देशपांडे, (३) चिटणीस-श्री. वैकुंठराव ग. इंगळे, (४) सहचिटणीस- प्रा. चिं. गो. गर्गे, (५) कोषाध्यक्ष-श्री. गो. अ. उपाख्य आप्पासाहेब भांडारकर, (६) परीक्षा विभाग प्रमुख-श्री. क. भ. हरजाल

कार्यकारीणीचे सभासद-प्राचार्य श्री. ना. ए. घासकडबी, श्रीमती श. माघनकर, श्री. गोखले, श्री. वसंतराव कडू, श्री. अविनाश वरोकर, श्री. सुरेंद्र-बाबू देशमुख, श्री. रमणलालजी चांडक, श्री. वाघे गुरूजी, श्री. ढोक गुरूजी, श्री. ढोकणे गुरूजी, श्री. वारई गुरूजी, श्री. वेखंडे गुरूजी

(३) **कुही**:-विदर्भ साहित्य संघाच्या कुही शाखेच्या सभासदांची सभा दिनांक २-१०-६४ ला होऊन खालील कार्यकारिणी निवडून आली.

अध्यक्ष-श्री. डॉ. वा. ना. मेश्राम, उपाध्यक्ष--श्री. मा. शि. लेंडे, सरचिटणीस-श्री. दे. भ. गायगवरी, चिटणीस-श्री. म. सा. येरणे, कोषाध्यक्ष- श्री. वी. एस्. लांजेवार

अनुक्रमणिका

सदस्य–(१) श्री. पांडुरंग गायकवाड, (२) श्री. दौलतराव चव्हाण, (३) श्री. सोमाजी लेंडे, (४) श्री. घनश्याम तांबे, (५) श्री. भगवानजी देशमुख, (६) श्री. टोंगे गुरूजी,

(४) अमरावती–शाखेच्या सभासदांची सभा दि. ४–२–१९६५ ला होऊन तीत खालील कार्यकारिणी निवडून आली.

अध्यक्ष—श्री. बाबासाहेब खापर्डे, उपाध्यक्ष—डॉ. वि. भि. कोलते, कोषाध्यक्ष–श्रीमती दिवाणजी, चिटणीस–प्रा. आष्टीकर आणि श्री. प्र. वि. कर्पे

सदस्य–प्रा. प्रभाकर घनागरे, श्री. द. श. फडके, प्रा. भाऊ मांडवकर प्रा. श्री. गो. काशीकर

अध्यक्षांच्या वतीने प्रा. कृ. व्यं. पेशकार यांची कार्यकारी मंडळावर सभासद म्हणून नियुक्ति करण्यात आली.

(५) गोंदिया:–विदर्भ साहित्य संघ, शाखा गोंदिया येथील निवडणूक होऊन खालील कार्यकारिणी निवडून आली.

अध्यक्ष—श्री. भैय्यासाहेब घोटे, उपाध्यक्ष—श्री. वा. का. देशमुख कोषाध्यक्ष–श्री. प्र. रा. तनखीवाले, चिटणीस–श्री. प्र. श. अत्रे,

सदस्य–१. श्री. वसंतराव देव, २. श्री. वसंतराव मातुरकर, ३. श्री. मधुकरराव पुराणकर, ४. श्री. बाळासाहेब आकोत, ५. श्री. प्रा. खंडलकर

वणी शाखा–

शाखेचे अध्यक्ष श्री. धुं. गो. उपाख्य बाबासाहेब देशमुख, यांचे दिनांक ११–१–६५ रोजी हृदयविकाराने निधन झाले. या घटनेबद्दल दुःख व्यक्त करण्यासाठी शाखेने दि. १३–१–६५ ला एक सभा घेतली तीत कै. बाबा साहेबांच्या निधनाबद्दल दुखवटयाचा ठराव संमत करण्यात आला.

Statement about ownership and other particulars about newspaper (Yugwani) to be published in the first issue every year after the last day of February.

FORM IV

(See Rule 8)

1.	Place of Publication :	Vidarbha Sahitya Sangh, Nagpur-1.
2.	Periodicity of its Publication	Monthly.
3.	Printer's Name	Shri M. G. Saraf
	Nationality	Indian
	Address	Asstt. Manager, Nagpur Times Press, Nagpur-1.
4.	Publisher's Name	Shri S. M. Kulkarni
	Nationality	Indian
	Address	Vidarbha Sahitya Sangh, Nagpur-1.
5.	Editor's Name	Shri S. M. Kulkarni
	Nationality	Indian
	Address	Vidarbha Sahitya Sangh, Nagpur-1.
6.	Name and address of individuals who own the newspaper and partners or share-holders holding more than one per cent of the total capital.	Vidarbha Sahitya Sangh, Nagpur-1.

I, S. M. Kulkarni hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Dated 25-3-63 **Sd/- S. M. Kulkarni.**

अनुक्रमणिका

हे मासिक एम्. जी. सराफ यांनी नागपूर टाइम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर–१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता, संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका